म. ग्रं. सं. ठाणे
विषय - चरित्र
सं. नं. ३८…

[redacted]

# जॉन्सन्



[redacted] ब्लिशिंग हाउस, पुणे.

REFBK-0003055

ग्रंथ १.

किं. ८ आ.

प्रो० द. वा. पोतदार.

Krishnaji Hari J
Standa
Thana

मालाकार

# चिपळोणकरकृत
# जॉन्सनूचें चरित्र

REFBK-0003055

प्रो० दत्तो वामन पोतदार, बी. ए.
न्यू पूना कॉलेज, पुणें.

3044

प्रकाशक
विश्वनाथ गणेश आणि मंडळी,
बुकसेलर्स् अँड पब्लिशर्स्, पुणें.

## मालाकार

# चिपळोणकरकृत 'जॉन्सन्चें चरित्र'

सुप्रसिद्ध निबंधमालाकार कै. विष्णुशास्त्री चिपळोणकर यांनीं निबंध-मालेंत प्रख्यात इंग्रजी पंडित जान्सन् यांचें चरित्र लिहिलें आहे. हें चरित्र अनेक दृष्टींनीं बोधप्रद आहे. जान्सनच्या वेळीं लेखकांना इंग्लंडांत सुद्धां आजकालच्यासारखा मानसन्मान नव्हता. अशा कठिण काळांत कष्ट सोसून जान्सन्प्रभृतींनीं लेखनद्वारा कशी चिरस्थायी लोकसेवा केली हा वृत्तांत उदयोन्मुख महाराष्ट्राला सादर करावा हा शास्त्रीबोवांचा हेतु. एका दृष्टीनें जान्सन्-सारख्यांचीं चरित्रें मनःपूर्वक वाचून शास्त्रीबोवांनीं त्यांपासून काय बोध घेतला व त्या संस्काराप्रमाणें स्वभाषेची महनीय सेवा प्रत्यक्ष कशी करून दाखविली हें तरुण महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनीं अवश्य ध्यानांत धरलें पाहिजे. या दृष्टीनें अशा विद्यार्थ्यांस लहानपणीं या तेजस्वी चरित्राचा अभ्यास घडल्यास तो त्यांस व महाराष्ट्रास उपकारक झाल्यावांचून रहाणार नाहीं.

जान्सन्चें चरित्र हा विषय सर्वमान्य आहे. विद्यार्थ्यांचे दृष्टीनें मूळ निबंधाचा आवश्यक व त्यांना झेपेल तेवढाच भाग ठेविला आहे. क्वचित् स्थळीं याच धोरणानें किंचित् दुरुस्ती-पुस्ती केली आहे. परंतु मूळाचे स्वरूपास धाका येऊं दिला नाहीं. विद्यार्थ्यांकरितां, मुलांसाठीं, वगैरे ॲडप्टेशन्-पाठावृत्ति-काढण्याची प्रशस्त रीतीच येथें अनुसरली आहे. हें धोरण काळजीनें अंमलांत आणलें तर उपलब्ध मराठी ग्रंथांतून उपयुक्त अशीं पुष्कळ पुस्तकें विद्यार्थ्यां-साठीं सहज तयार करतां येतील; आणि 'मराठींत पुस्तकें आहेत कोठें?', या आक्षेपास खासें उत्तर देतां येईल.

ग्रं. नं. ३८४



जान्सन्‌चें चरित्र हा निबंधमालाकारांच्या सरस व स्फूर्तिदायी लेखणीचा एक अनुपम प्रसाद आहे व अशा प्रासादिक वाणीचा परिचय तरुणांस घडेल तर स्वभाषेविषयीं पूज्य भावना त्यांचे ठायीं सहजच जागृत राहील.

मूळांत कांहीं टीपा प्रासंगिक आहेत. विद्यार्थ्यांसाठीं निराळी दृष्टि स्वीकारणें इष्ट असल्यामुळें टीपा कांहीं जुन्या ठेवल्या आहेत व कांहीं नवीन जोडल्या आहेत. शिक्षकांना मूळ पडताळ्यासाठीं पाहतां येण्यासारखें आहेच.

बॉस्वेल्‌चा इंग्रजी चरित्रग्रंथही शिक्षकांनीं हें चरित्र शिकवितांना मुलांचे नजरेस यथाप्रसंग आणावा म्हणजे थोरांचीं चरित्रें साक्षेपानें तयार कशीं करितात व करावीं हें त्यांस समजून येईल.

कै० वि. कों. ओक यांचेंही एक जान्सन्‌चें चरित्र आहे; परंतु तें त्यांच्या इतर पुस्तकांप्रमाणें अगदींच बालबोध आहे. असो. रा० वि. ग. ताम्हनकर आणि मंडळी यांनीं माझे पाठिशीं लागून ही सेवा मजकडून करवून घेतली याबद्दल त्यांचे आभार मानितों. हा प्रयत्न विद्यार्थ्यांस व शिक्षकांस पसंत पडला तर याच धर्तीवर अधिक पुस्तकें तयार करून त्यांचे हातीं देतां येतील.

पुणें,
कार्तिक वद्य १२ शके १८४६ | **दत्तो वामन पोतदार,**
संपादक.

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

सदर संक्षिप्त आवृत्तीची दुसरी आवृत्ति पहिल्या आवृत्तीबरोबरच विक्रीला निघत आहे. सदर आवृत्ति युनिव्हर्सिटी टेक्स्ट्‌बुक्‌ कमिटीच्या शिफारशीप्रमाणें सुधारून काढली आहे. हें पुस्तक १९२७ च्या मॅट्रिकला मुंबई युनिव्हर्सिटीनें टेक्स्ट्‌बुक्‌ म्हणून नेमलें आहे. हरिभाऊंच्या कांहीं कादंबऱ्यांच्या अशाच पाठावृत्ति काढण्याचा मानस आहे.

ता. १ जून १९२६. | **प्रकाशक.**

श्री

# कै. विष्णुशास्त्री चिपळोणकर

## यांचें

# अल्प चरित्र.

चिपळोणकर घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील पावसचें राहाणारें. पुढें श्रीहर्ष किल्ल्याची फडनिशी या घराण्यांत येऊन तें नाइक नांवानें प्रसिद्धि पावलें. पेशवाई गेली तेव्हां या घराण्यांतील हरिपंत यांस फार गरिबी आली, आणि पुण्यांत एक अफूचें दुकान काढून काळ कंठावा लागला. सन १८२४ सालीं हरिपंतांचे पोटीं कृष्णशास्त्री जन्मले. हे पुढें जाडे संस्कृत पंडित झाले. पंचविशीच्या पुढें इंग्रजी शिकून यांनीं नव्या व जुन्या दोन्ही विद्वानांचा पुढारीपण मिळविला. सरकारांतही यांची मोठी मान्यता होती. यांचीं रासेलस, साक्रेतिस वगैरे पुस्तकें मोठीं सरस उतरलीं आहेत. यांच्या गोड अन्योक्ति अद्यापि प्रसिद्ध आहेत.

विष्णुशास्त्री हे कृष्णशास्त्री यांचे वडील पुत्र. यांचा जन्म पुण्यास २० मे १८५० रोजीं झाला. यांना यांचे आजे हरिपंतमामा व आजी भागीरथी आमी यांचाच लळा व शिक्षण असे. कृष्णशास्त्री यांचें मुलावर फारसें लक्ष नसे. प्रथम घरीं, मग इन्फंट् स्कुलांत, मग एका गांवठी शाळेंत, तेथून पुनः इंग्रजी शाळेंत आणि अखेर (१८६१) पुनः पूना हायस्कुलांत असें विष्णुशास्त्री यांचें शिक्षण होऊन १८६५ चे शेवटीं ते म्याट्रिक्युलेशन् झाले आणि पुढील सालीं त्यांचें लग्नही झालें!

पहिल्यापासून विष्णुशास्त्री यांस भाषाविषयांची आवड चांगली असे. ते बुद्धीनें तरतरीत परंतु निबोले आणि संथ स्वभावाचे असे होते. ते घरांतील

विद्यार्थिमंडळाचे ' म्होरक्ये ' असत. त्यांचें वर्तन अगदीं निर्मळ आणि चोख असे आणि त्यामुळें त्यांची सर्वांवर छाप राही.

इ. स. १८६६ त ते पूना कॉलेजांत—यालाच पुढें डेक्कन कॉलेज म्हणूं लागले—गेले. तेथें त्यांस अवांतर वाचनाचा भारी नाद लागला. अनेक संस्कृत, मराठी वगैरे पुस्तकें त्यांनीं मोठ्या भक्तीनें या वेळीं वाचलीं. गणित त्यांस फार नडे, त्यामुळें त्यांस एकदोन गोते खावे लागले. अखेर ते १८७१ त बी. ए. पास झाले. सुप्रसिद्ध प्रि. वर्डस्वथ्, केरोपंत छत्रे, अनंतशास्त्री पेंढारकर अशा विद्वान् गुरूंच्यापासून जेवढें मिळवितां येईल तेवढें ज्ञान विष्णुशास्त्री यांनीं सावकाश-पणें मिळविण्यांत कसूर केली नाहीं. रा. ब. महाजनी हे त्यांचे या वेळचे परम प्रेमां-तले स्नेही. मध्यें कांहीं महिने त्यांनीं बाबा गोखल्यांचे शाळेंत शिक्षकाचें काम केलें.

मराठी लिहिण्याची दीक्षा विष्णुशास्त्री यांना त्यांच्या वडिलांनीं दिली; मराठी शाळापत्रक म्हणून सरकारी मासिक प्रि. कृष्णशास्त्री हे चालवीत. १८६८ त रासेलसाचे भाषांतराचा कांहीं भाग वडिलांनीं चिरंजिवांकडून या मासिकासाठीं करवून घेतला. तो त्यांस पसंत पडला. याप्रमाणें अठरावे वर्षापासून मराठी लिहिण्याचें काम शास्त्रीबुवा करूं लागले. वडिलांकडे पुष्कळ मराठी पुस्तकें अभिप्रायासाठीं येत. पुष्कळ विद्वान् मंडळी जमून चर्चाही घरीं चाले; त्या सर्वांचा फायदा विष्णु-शास्त्री यांस विशेष झाला यांत संशय नाहीं. 'सर्वसंग्रह' मासिकानें त्यांस मराठी कवितांचा अभ्यास करण्याची उत्तम संधि दिली. हें मासिक माधव चंद्रोबा काढीत व त्यांस 'नवनीत'कर्ते परशुरामपंत तात्या गोडबोले यांची मदत असे. तसेंच पन्हाळगडकरबुवा यांच्या रसाळ कीर्तनामुळेंही त्यांचें मराठी कवितेवरील प्रेम फार वाढलें.

बी. ए. होतांच मराठी शालापत्रकाचें काम विष्णुशास्त्री यांनीं मोठ्या उमे-दीनें चालू केलें आणि संस्कृत कविपंचक ही सुंदर निबंधावलि लिहिली. विद्याखात्याचे मुख्यांचा कृष्णशास्त्री यांजवर मोठा लोभ होता त्यामुळें त्यांनीं आपण होऊन विष्णुशास्त्री यांस रा. म. मो. कुंटे यांचे हाताखालीं सरकारी हायस्कुलांत पुण्यास शिक्षकाची जागा दिली. कुंटे यांची विद्वत्ता अगाध आणि वक्तृत्व विल-क्षण; परंतु ते फार विक्षिप्त, त्यामुळें विष्णुशास्त्री यांचें व त्यांचें पटेना.

१८७३ साली एकदां मित्रमंडळीसह सहज आळंदीस गेले असतां **निबंधमाला** नांवाचें स्वतंत्र मासिक काढण्याचा विष्णुशास्त्री यांचा विचार कायम ठरला. आणि त्या कामास ते मोठ्या उत्साहानें लागले आणि त्यांनीं अशी निबंधमाला गुंफिली कीं त्यांची कीर्ति त्यामुळें महाराष्ट्रांत अजरामर झाली आहे.

निबंधमालेचा एक मोठा विशेष म्हटला म्हणजे तींतील **सर्व मजकूर एकट्या विष्णुशास्त्र्यांचा असे** आणि म्हणून तो एकजात सुंदर उतरला आहे. निबंधमालेंतील नवे विचार आणि अतिशय चटकदार, आवेशी भाषा यांची छाप लोकांवर फारच पडली. विष्णुशास्त्री यांनीं कोणाकडेही मागणीशिवाय माला पाठविली नाहीं, तरी ती फार खपून त्यांत शास्त्रीबोवांस थोडी किफायतही राहत असे. विलक्षण आणि पराक्रमी लेखणीचा असा अनुभव महाराष्ट्रांत हा पहिलाच होय. आतां 'मराठी भिकार, कुचकामाची, लेचीपेची आणि पोरासोरांची भाषा' हा जुना चुकीचा समज दूर होत गेला, आणि मराठीचें वाचन आणि अध्ययन अधिक लोकप्रिय व प्रतिष्ठित समजण्यांत येऊं लागलें. एकंदर ८४ अंकांत मिळून विष्णुशास्त्री यांनीं जे निबंध लिहिले त्यांपैकीं भाषाविषयकच बरेचसे आहेत. त्यांत डॉक्टर जॉन्सन्‌चें चरित्र हा एक अत्युत्कृष्टांपैकीं एक आहे. हा निबंध वाचींत असतां जॉन्सन्‌चें उज्वल उदाहरण विष्णुशास्त्री यांनीं आपले डोळ्यांसमोर ठेवून, त्या महापंडितानें जसा एकट्यानें कोश केला, एकट्यानें कविचरित्रें लिहिलीं, तद्वतच निबंधमाला एकट्याचे बळावर चालवावी आणि तसा कित्ता लोकांसमोर मांडावा असा शास्त्रीबोवांचा तळमळीचा हेतू स्पष्ट दिसून येतो. हेतूप्रमाणें प्रत्यक्ष कृति करून अवघ्या बत्तीस वर्षांचे अल्प आयुष्यांत त्यांनीं आपलें नांव करून ठेविलें यांत शंका नाहीं. शास्त्रीबोवांची भाषा अत्यंत चटकदार असल्यानें त्यांचा लेख वाचतांना कंटाळा अगदीं येत नाहीं. प्रौढ शब्द, स्पष्ट, निर्भीड विचार, सुंदर कल्पना यांचे योगें त्यांनीं आपले लेख अत्यंत नटविले असून त्यांचे लेखणीचा जिवंतपणा आणि झळाळी कांहीं वेगळीच आहे. त्यामुळें जसा सोन्याचा तुकडा सदा उजळ आणि तेजस्वी दिसतो तसे शास्त्रीबोवांचे लेख मोठे उजळ आणि तेजस्वी दिसतात. त्यांच्या मालेंतील पुष्पांची टवटवी आज चाळीस वर्षें झालीं तरी कांहीं कमी झालेली दिसत नाहीं.

असा क्रम चालू असतां १८७५ सालीं शाळापत्रकांत 'मराठी कविता' या विषयावर लिहिलेला कांहीं मजकूर नापसंत होऊन सरकारनें अखेर तें मासिकच बंद केलें ! विष्णुशास्त्री यांची निबंधमाला मात्र इकडे अधिकाधिक रंगत चालली. कोणी हरिशास्त्री पंडित नांवाचे एक वृद्ध गृहस्थ पेशवाईंतील व मराठशाहींतील जुन्या आख्यायिका मोठ्या खुलवून सांगत. असा कोणी भेटला म्हणजे तेथें विष्णुशास्त्री हटकून चिकटावयाचेच. तसेंच जुने पोवाडे म्हणणारे गोंधळी यांचे-पासून जुने पोवाडे ऐकण्याचाही शास्त्रीबोवांस नाद फार होता. तर याप्रमाणें रसाळ कीर्तनें, थरारून सोडणारे पोवाडे आणि गुंगवून टाकणाऱ्या आख्यायिका यांत शास्त्रीबोवा अतिशयच रमत व डुंबत आणि त्यामुळें त्यांचे ठिकाणीं आपला देश आणि त्याचा पूर्वीचा वैभवकाळ यांविषयीं अभिमान अग्निसारखा धडधडत राही.

आतांपर्यंत मालेंत भाषादूषण, मराठी भाषा इ० विषय आले होते. त्यांतील इतिहासविषयावरील स्पष्ट व कडक लिहिणें कित्येकांस फार झोंबलें व त्यासंबंधानें गवगवा फार होऊन त्याचा परिणाम त्यांची पुण्याहून रत्नागिरीस (१८७७) बदली होण्यांत झाला. तेथें शास्त्रीबोवा कांहीं दिवस राहिले. या सुमारास रा. शंकरराव शालिग्राम यांचा त्यांचा परिचय पुण्यास झाला होता. या गृहस्थांस जुने पोवाडे वगैरे जमविण्याचा नाद असे. रा. काशिनाथपंत साने, बी. ए. यांसही जुन्या बखरींचा नाद होता. मग शास्त्रीबोवा, साने, मोडक आणि शालिग्राम यांनीं मिळून **काव्येतिहाससंग्रह** नांवाचें मासिक काढून जुनी मराठी कविता, ऐतिहासिक बखरी, संस्कृत कविता, हीं त्यांतून छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. तसेंच रा. बाळकृष्णपंत जोशी या हुशार गृहस्थास थोडें भांडवल पुरवून रंगीत चित्रें—जीं कोठेंच छापविण्याची आपलेकडे सोय नव्हती—तीं छाप-ण्यासाठीं **चित्रशाळा** स्थापण्याचा उद्योग करण्याचें ठरलें. तोंच ही रत्नागिरीच्या बदलीची घालमेल निघाली. याच वेळीं निबंधमालेंत जान्सन्चें चरित्र चालू होतें. एव्हांपासून शास्त्रीबोवा मोठमोठे निबंध लिहूं लागले. जान्सन्चा विषय आठ अंक चालला होता. पुढें मोरोपंतांची कविता, लोकहितवादी वगैरे निबंध असेच मोठे झालेले आहेत. सरकारी बुकडेपो जळाल्यामुळें बुकांचें एक नवें दुकान काढावें व तेथें आपलीं, वडिलांचीं व इतर पुस्तकें व नवीन चित्रशाळेंतील चित्रें वगैरे विक-ल्यास किफायत होईल या कल्पनेनें शास्त्रीबुवांनीं एक **किताबखाना** चालू केला.

इतक्यांत १८७८ (२० मे) रोजीं कृष्णशास्त्री वारले. महायात्रेस गेल्यापासून त्यांची प्रकृती ढांसळलीच होती. वडिलांच्या मृत्यूपासून घरांतील स्वास्थ्य बिघडून धुसफूस सुरूं होऊन शास्त्रीबोवांस फार त्रास झाला. पण त्यांनीं धैर्य न सोडतां आपले उद्योग तसेच नेटानें चालविले.

सरकारी नोकरीची ताबेदारी आपणांस नको, आपण स्वतंत्र उद्योग करून लोकांस नवा रस्ता दाखविणार, असे विचार शास्त्रीबोवांचे मनांत अलीकडे फार येत. आणि त्यांचा जोर होऊन त्यांनीं कोणाचाही विचार न घेतां सरकारी नोकरीचा राजिनामा दिला आणि पुण्यास येऊन रा. टिळक, रा. आगरकर, रा. आपटे, रा. नामजोशी इत्यादिकांच्या मदतीनें **न्यू इंग्लिश स्कूलची** स्थापना केली [१ जाने. १८८०]. त्यापूर्वीं निबंधमाला, चित्रशाळा आणि किताबखाना हे तीन स्वतंत्र उद्योग त्यांनीं आरंभिले होते.

१८८० त **आर्यभूषण** छापखाना शास्त्रीबोवा व त्यांचे सहकारी यांनीं स्थापला आणि पुढें **केसरी** व **मराठा** या नांवाचीं, एक मराठी व एक इंग्रजी, अशीं वर्तमानपत्रें चालू केलीं. म्हणजे नोकरी सोडल्यापासून दोन तीन वर्षांचे आंत शास्त्रीबोवांनीं आपला उद्योग अफाट वाढविला. देशाची भाषा सुधारून त्यांत वाङ्मय वाढावें म्हणून निबंधमाला, देशांतील मुलांस योग्य असें शिक्षण मिळावें म्हणून न्यू इंग्लिश स्कूल, पूर्वजांचा अभिमान वाढावा म्हणून काव्येतिहाससंग्रह आणि चित्रशाळा, लोकशिक्षणासाठीं वर्तमानपत्रें व या सर्वांचे जोडीला छापखाना आणि किताबखाना अशा सात आठ संस्था काढून त्या भरभराटीस आणून शास्त्रीबोवांनीं जें भरीव देशकार्य केलें तें अपूर्व होय. या यशाचे भरांत त्यांनीं जुन्या पिढींतील सन्माननीय पुढाऱ्यांवर जोराचे हल्ले चढविले त्यामुळें पुष्कळांस वाईट वाटलें. हें त्यांचें लिहिणें फार कडक होतें. तथापि जशास तसें या न्यायानें शास्त्रीबोवांचे बाजूनें त्याचें समर्थन करितां येतें. आज इतक्या वर्षांनीं उभय पक्षांतील गुणावगुणांचें नीट मापन आपणांस करितां येतें आणि त्यामुळें लोकहितवादी, रानडे, भांडारकरप्रभृति जुन्या पिढींतील थोर पुरुष आणि विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर वगैरे पुढील पिढींतील कर्ते पुरुष या सर्वांचा योग्य तो गौरव आपणांस निःपक्षपातानें करितां येतो.

येणेंप्रमाणें असा मोठा नवा उद्योग—ज्याला खुद्द शास्त्रीबोवांनीं नवी सृष्टि म्हटलें आहे तें अगदीं सार्थ आहे—आरंभून शास्त्रीबोवांनीं लोकांस चकित केलें. आतां निबंधमाला बंद करून पुढें **ग्रंथमाला** काढावयाची, न्यू इंग्लिश स्कुलाचें कदाचित् कॉलेज करावयाचें असा पुढील बेत शास्त्रीबोवा योजीत असतील तोंच एकाएकीं फोटोसाठीं उन्हांत फाजील उभें राहिल्याचें निमित्त होऊन शास्त्रीबोवा आजारी पडले आणि गुरुवार ता. १७ मार्च १८८२ रोजीं सकाळीं त्यांचें देहावसान झालें. साऱ्या पुण्यांत आणि महाराष्ट्रांत हाहाःकार उडाला! 'मराठी भाषेचा आधार गेला!' 'आमचा हिरा लोपला' असा आक्रोश लोक करूं लागले! अवघ्या ३२ वर्षांचे वयांत एवढी थोर कामगिरी करून लोकांस कायमचा चटका लावून गेलेला असा अलौकिक पुरुष देशाचे भाग्यानेंच त्यास लाभतो यांत संशय नाहीं.

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| वेणुसुधा–वनसुधा | | ०–८–० |
| विचारसागररहस्य–(वेदांत) | साखरेबुवा | २–८–० |
| गंगावर्णना–(काव्य) | चिंतामणी पेठकर | १–०–० |
| राजा शिवाजी (काव्य) | कुंटे | १–४–० |
| महाराष्ट्र–शारदा (अर्वाचीन कवितेचे उतारे) | | १–८–० |
| रेंदाळकर कवितासंग्रह | | २–४–० |
| आधुनिक कवितांचा संपूर्ण संग्रह (Full set) | | ५०–०–० |
| पद्यविलास | प्रो. केळकर | ०–१०–० |
| मराठी भाषेची घटना | जोशी | ४–०–० |
| सुभाषित विनोद | न. चिं. केळकर | १–४–० |
| विदग्ध वाङ्मय | ह. ना. आपटे | ०–४–० |
| मराठी वाङ्मयाचा अभ्यास | ,, ,, | ०–८–० |
| विल्सन फायलॉलजी लेक्चर्स | ,, ,, | १–८–० |
| लोकहितवादीचरित्र | प्रो. केळकर | ०–१२–० |
| ज्योतिर्विलास | दीक्षित | १–८–० |
| निबंधमालेंतील दहा निवडक निबंध | | १–८–० |
| गद्यविलास | प्रो. केळकर | ०–१२–० |
| चुलीपुढील शास्त्रीय गोष्टी | वाडेदकर | ०–६–० |
| सुलभ गणित–भाग १–२ (नवीन अंकलिपी) | ताम्हनकर | ०–३–० |
| ,, शिक्षकाचें पुस्तक | ,, | ०–८–० |
| केसरीवरील खटला–१९२४ | | ०–६–० |

... ग्रंथालय ठाणे
३०५५९

# डॉक्टर जॉन्सन

## प्रकरण पहिलें

सूरतसे करित वडी विन पंख उड जाय ।
सूरत तो जाती रही कीरत कबू न जाय ॥

—तुळशीदास.

### प्रस्तुत विषयाचें अपूर्वत्व

आपल्या मराठी भाषेंत, किंबहुना हिंदुस्थानांतील जुन्या व नव्या कोणत्याही भाषेंत, चरित्रलेखनाचा प्रकार मुळींच आढळत नाहीं. इतिहासाच्या अभावामुळें एकंदर राष्ट्राविषयींची जुनी माहिती अगदीं बुडाली, त्याप्रमाणेंच चरित्रांच्या अभावीं प्राचीन काळीं होऊन गेलेल्या महान् महान् पुरुषांचें वृत्तही केव्हांच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. ग्रीक् व रोमन् लोकांत प्लूटार्क्, कार्नेलियस्. नीपॉस् वगैरे चरित्रकार जसे होऊन गेले तसा प्रकार इकडे बहुधा कधींही झाला असेलसें वाटत नाहीं. तर वरील विषय एतद्देशियांस अत्यंत अपरिचित वाटण्याचें हें एक कारण आहे.

आतां इंग्रज सरकारचा या देशावर अंमल सुरू झाल्यापासून पाश्चात्य विद्येचा इकडे जसा प्रसार होत चालला तसा त्याबरोबर वरच्यासारख्या ग्रंथरचनाविशेषाचाही प्रचार वस्तुतः पाहतां वाढायाचा होता. पण वरील विद्येचा उपक्रम येथील लोकांत नुकताच झाला असल्यामुळें व वरील रचनाविशेष अगदीं नवा च पडल्यामुळें अद्याप त्याविषयीं लोकांत विशेष अभिरुचि उत्पन्न झालेली नाहीं. कांहीं वर्षांमागें इंग्रजी भाषेंत प्रथम प्रवेश होऊन आमच्या विद्वान् मंडळीस मराठी

भाषेंत ग्रंथरचना करण्याची जोंपर्यंत बरीच हौस वाटत असे, तोंपर्यंत इतर विषयांप्रमाणें या विषयावरही बरेच ग्रंथ झाले; पण हल्लीं त्यांपैकीं एक मात्र सर्वप्रसिद्ध आहे. बाकीचे बहुतेक बुडाल्यासारखेच झाले आहेत. आजपर्यंत लोकाश्रयास पात्र झालेल्या मासिक पुस्तकांतून तरी "प्रसिद्ध—पुरुष—चरित्रें" म्हणून मूळ संकल्पांत घातलेलें एक सदर जरी नेहमीं असे व अद्यापही आहे, तरी फार करून हें सदर कोरडेंच रहात गेलें आहे.

कधींमधीं एकाद्या विख्यात पुरुषाचा वृत्तांत आलाच तर तो चार पांच पृष्ठांहून बहुधा अधिक नसतो. याचें कारण उघडच आहे. इकडील देशांत चरित्रलेखनाचा प्रचार पूर्वींपासून मुळींच नसल्यामुळें इकडल्या विख्यात पुरुषांचा जीवनवृत्तांत लिहिण्याचें मूळच खुंटलें; तेव्हां युरोपांत होऊन गेलेल्या नामांकित पुरुषांच्या संबंधानेंच कायतो तो लिहावयास सांपडणार. पण तिकडची नुसती भूगोलसंबंधींसुद्धां माहिती इकडील लोकांस चांगलीशी असण्याची पंचाईत; मग तिकडील लोकाचारांविषयीं व ज्यांचें नांवही पूर्वी ऐकलें नाहीं अशा प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्रांविषयीं त्यांस जिज्ञासा उत्पन्न होण्याचा कितीसा संभव आहे ?

तर याप्रमाणें हें पुढील चरित्र, एक तर ही नवीन ग्रंथपद्धति म्हणून व शिवाय ती कांहींशी सुरू केली असतां पुनः मागें पडली, या दोहों कारणांनीं आमच्या वाचकांस अपूर्व वाटणारें आहें. पण इतकेंच नव्हे. पुढील लेखांत आणखी दोन नवे प्रकार वाचकांस आढळतील. पहिला हा कीं, आजपर्यंत महाराष्ट्रभाषेंत जीं जीं चरित्रें रचिलीं गेलीं तीं कोणी विख्यात राज्यकर्ता, कोणी विख्यात शोधक, कोणी विख्यात तत्त्वज्ञ अशांविषयींचीं होतीं. प्रस्तुत लेखाच्या विषयाप्रमाणें केवळ ग्रंथकाराचें चरित्र कोणीं लिहिलें नाहीं. दुसरा विशेष असा कीं, पुढील वृत्तांत कोणत्या एका ग्रंथाच्या आधारानें रचला आहे असा नाहीं; तर अनेक ठिकाणची माहिती गोळा करून ती वाचकांस चरित्ररूपानें सादर केली आहे.

## या विषयावर लिहिण्याचा उद्देश

आतां सदरील लेखास वरील विषय निवडण्याचा हेतु काय व यापासून वाचकांस लाभ तो काय होणार याविषयीं अगोदर थोडें लिहिलें पाहिजे.

चरित्रवाचनापासून सामान्यतः कोणते लाभ आहेत ते तर आज कोणालाही सांगावयाला नकोत; तेव्हां ते प्रस्तुत लेखापासूनही होणार आहेत हें उघडच आहे. पण कदाचित् कोणी म्हणतील कीं जॉन्सन्सारख्याच्या आयुष्यांत येवढ्या मोठ्या वर्णन करण्याजोग्या गोष्टी कोणत्या घडलेल्या असणार ? तो अमुक वर्षी जन्मला, अमुक वर्षी मेला, त्यानें अमुक अमुक ग्रंथ केले, त्यावरून त्याचा असा असा लौकिक झाला, इतकेंच त्यांत असायचें कीं नाहीं ? मोठमोठ्या राजांच्या वगैरे कथांत जसें मन रंमून जातें तसें प्रस्तुत विषयांत काय होणार ? असा जे आक्षेप करतील त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं, वरील समजूत जर, खरोखरच त्यांच्या मनांत बिंबून गेली असेल, तर चरित्राच्या वाचनापासून होणारा वास्तविक फायदा त्यांस बिलकूल कळलाच नाहीं, असें म्हटलें पाहिजे. मनोरंजन किंवा चित्तास चमत्कार भासणें याच लाभाची चरित्र वाचनापासून जर कोणी अपेक्षा करीत असेल तर वरील हेतु कादंबरीपासून किंवा नाटकापासून जसा साध्य होईल तसा प्रस्तुत प्रबंधविशेषापासून होणार नाहीं. शिवाय चरित्रांचा उपयोग जर हा आहे कीं, त्यापासून संसारास व लोकव्यवहारास उपयोगी सदुपदेश प्राप्त होतो, तर हा उपदेश मोठमोठ्या सार्वभौम राजांच्या लढाया वाचल्यापासून ज्यास्त होईल, कीं सामान्य लोकांस ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्यासारख्याच मनुष्यांनीं कसे टाळले किंवा ते कसे उदयाला आले हें समजल्यानें ज्यास्त होईल बरें ? तर हें सर्व जो मनांत आणील त्यास खचित असें वाटल्यावांचून राहणार नाहीं, कीं ज्या विख्यात पुरुषाचें चरित्र आम्ही लिहावयास सरसावलों आहों तो जरी शिकंदराप्रमाणें सगळें भुवन जिंकून आणखीं भुवनें जिंकावयास नाहींत म्हणून एकीकडे तोंड करून रडला नाहीं, त्यानें जरी कोलंबसाप्रमाणें नवें जग शोधून काढलें नाहीं, किंवा वॉशिंग्टनाप्रमाणें नव्या जगांत नवें राज्य स्थापन केलें नाहीं, तसेंच साक्रेटिसाप्रमाणें त्यानें स्वर्गलोकींचें तत्त्वज्ञान भूलोकास आणलें नाहीं किंवा हिंदुस्थानच्या म्याकिवेलाप्रमाणें 'खुब शर्तीनें राज्य राखिलें' नाहीं, तरी चरित्राचा विषय होण्यास त्याची योग्यता वरील महाजनांपेक्षां कोणत्याही प्रकारें कमी नसून पुष्कळ अंशीं उलटी जास्तही आहे.

पण इतकेंच नव्हे. प्रस्तुत चरित्राचें वर जें सामान्यतः महत्त्व सांगितलें त्याशिवाय त्यापासून विशेषतः आणखीही कित्येक लाभ आहेत. कोणा एका इंग्रज ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, जॉन्सन् यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालेल; म्हणजे साऱ्या इंग्लिश लोकांत सामान्यत्वेंकरून जे गुण आढळतात त्यांचा समुच्चय वरील व्यक्तींत आढळतो. हें कसें हें पुढें क्रमाक्रमानें व्यक्त होत जाईल. तर प्रस्तुत लेखावरून एतद्देशीय लोकांस इंग्रजांच्या स्वभावाविषयीं व त्यांच्या आचाराविषयीं वगैरे बरेंच ज्ञान होईल हा एक त्यापासून उपयोग होणार आहे. दुसरा असा कीं, जॉन्सन्च्या वेळची इंग्लंडची स्थिति व सध्यांची आपल्या देशाची स्थिति यांत अनेक प्रकारचें साम्य आहे. यास्तव इकडूनही वरील स्थितींचें ज्ञान होणें हें इष्ट आहे. तशीच तिसरी गोष्ट ही कीं, वरील नामांकित ग्रंथकाराच्या वेळीं कित्येक मोठमोठ्या गोष्टी घडून येऊन मोठमोठे बुद्धिवान् पुरुष प्रख्यातीस चढले होते. तेव्हां त्यांचाही मुख्य कथानकाच्या अनुषंगानें निर्देश होऊन वाचकांस सहजरीत्या तितकी जास्त माहिती होऊन मनास करमणूकही होईल.

## जॉन्सन्चा जन्म व बाल्यावस्था

डॉक्टर साम्युएल जॉन्सन् याचा जन्म इंग्लंड देशांत स्टाफर्डशायरमध्यें लिच्फील्ड नांवाच्या गांवीं इ. स. १७०९ या वर्षी झाला. याचीं आईबापें गरीब अवस्थेंत होतीं, तरी तीं सालस व संभावित असल्यामुळें त्यांस त्यांच्या गांवीं बराच मान असे. एकदां तर जॉन्सन्च्या बापास लिच्फील्डचा मॅजिस्ट्रेटही नेमला होता; पण त्याचा नेहमींचा धंदा म्हटला म्हणजे पुस्तकें विकण्याचा होता. त्याचें दुकान मोठें असून त्यास जवळचे ग्रंथ स्वतः चांगले समजत असत; यामुळें त्याचा लौकिक इतर पुस्तकविक्यांपेक्षां फार असे. जॉन्सन् यास लहानपणींच 'स्क्राफ्युला' या नांवाचा एक रोग झाला होता; तो त्याच्या कुळींतलाच होता असें कोणी म्हणतात, व कोणाच्या मतें तो त्याच्या दाईच्या संसर्गानें त्यास लागला. तो जाण्याविषयीं जॉन्सन्च्या आईबापांनीं पुष्कळ औषधोपचार करून पाहिले, पण कांहीं गुण आला नाहीं. शेवटीं त्यांनीं आपल्या तीन वर्षांच्या मुलास त्या वेळची राज्यकर्ती जी आन् राणी तिजकडे नेलें. पण तिच्याही हस्तस्पर्शानें कार्य झालें नाहीं.

जॉन्सन्च्या विद्याभ्यासाचा आरंभ लिच्फील्ड येथील शाळेंतच झाला. त्या शाळेंत सगळीं मुलें नादार घेत असत; यामुळें जॉन्सन्च्या गरीब आईबापांवर त्याच्या शिक्षणाबद्दल कांहीं खर्च पडला नाहीं. या शाळेंत ल्याटिन् व ग्रीक् या दोन्ही भाषांचें व त्यांतून पहिलीचें त्यानें चांगलें ज्ञान संपादन केलें. पुढें कांहीं वर्षें तो घरींच राहून आपल्या बापाच्या दुकानचें काम कांहीं पाहूं लागला. त्याचा स्वभाव अगदीं लहानपणापासून पराकाष्ठेचा स्वछंदी असे. सारखें बसून कोणतेंही काम पुष्कळ वेळ करीत असणें हें त्यास कधींही आवडलें नाहीं. तेव्हां शाळेंत व घरीं मिळून जो त्यानें अभ्यास केला तो सगळा अशाच प्रकारचा. त्याची बुद्धि अतिशयित चलाख असल्यामुळें हवा तो विषय त्यास तेव्हांच समजे; व स्मरणशक्तीही विलक्षण असल्यामुळें जें त्यानें एकदां वाचलें किंवा ऐकलें तें त्याच्या मनांतून कधींही जात नसे. पण सारखा नेट लावून असा अभ्यास त्यानें कधींच केला नाहीं. शरीरानें चांगला धष्टपुष्ट व भला भक्कम असल्यामुळें शाळेंतील उनाड पोरांत त्याचा पहिला नंबर असून कांहीं दांडगाई किंवा दंगा करणें असल्यास सर्वांचा मोरप्या हाच होई. या गुणांमुळें व नित्याचे धडे कधीं लक्ष लावून तयार न केल्यामुळें त्यावर चवदाव्या रत्नाचा प्रयोग वारंवार होई. या प्रयोगाचें माहात्म्य तो शेवटपर्यंत वर्णीत असे, व म्हणे कीं, माझ्या पंतोजीनें जर मला मरेमरेतों खूब मारलें नसतें तर माझ्या हातून कांहीं शिकणें झालें नसतें. असो; पुढें एकोणिसाव्या वर्षी तो आक्सफर्ड् युनिव्हर्सिटींत मोडणारें जें पेंब्रोक् कॉलेज तेथें एका श्रीमंत मुलाचा सहाध्यायी म्हणून गेला, पण पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलानें कॉलेज सोडलें, तेव्हां याचा मुख्य आधार सुटला. तरी मोठ्या पंचायतीनें त्यानें आणखी कांहीं दिवस तेथें काढले. याप्रमाणें एकंदर तीन वर्षें तेथें राहून शेवटीं युनिव्हर्सिटीची डिग्री ( किताब ) न घेतांच त्यास आपल्या घरीं परत यावें लागलें.

## अभ्यासाचा प्रकार

जॉन्सन्चें विद्याध्ययन म्हणजे गुरुमुखानें विद्याग्रहण करणें हें येथेंच आटपलें; यापुढें तसा योग त्यास आलाच नाहीं. यापुढें जें त्यानें ज्ञान संपादन केलें तें केवळ स्वतःच्याच श्रमानें—म्हणजे शेंकडों पुस्तकें वाचून व जगाचे व्यवहार पाहून—केलें इतकेंच. यापूर्वी तरी त्याची जेवढी विद्या झाली होती तेवढ्यांत गुरूच्या

शिकवणीपेक्षां स्वतःच्या जिज्ञासेनें व परिश्रमानें त्यास अधिक ज्ञान प्राप्त झालें होतें. त्याच्या बापाच्या दुकानीं पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर रचलेले ग्रंथ होते, ते त्यानें तब्येत लागेल तेव्हां वरचेवर उलथेपालथे करीत असावें. जेवढें मौजेचें वाटेल तेवढें वाचून कंटाळा आला कीं, तितकेंच टाकून द्यावें. याप्रमाणें ल्याटिन्, ग्रीक्, इटालियन् वगैरे भाषांतील ग्रंथांशीं खेळतां खेळतां या लहानग्या पोरानें इतकें ज्ञान मिळविलें कीं, तितकें मोठमोठ्या विद्यानिष्णात म्हणविणाऱ्या पंडितांसही नव्हतें. ऑक्सफर्डमध्यें प्रवेश झाला त्या पहिल्या दिवशींच जॉन्सनूनें एका ल्याटिन ग्रंथकाराचें वचन बोलण्याच्या ओघांत मध्येंच झोंकून दिलें; तें ऐकून त्याचे गुरु जागच्या जागीं अचंबा करीत राहिले ! तसेंच तेथें असतां पोप कवीचा 'मेसाया' म्हणून एक काव्याचा चुटका नुकताच प्रसिद्ध झाला होता त्याचें ल्याटिन् भाषांतर विद्यार्थ्यांस दिलें असतां तें जॉन्सनूनें कसें उडवून दिलें याविषयीं मागें टीपांत एके ठिकाणीं ( अंक १२ ) सांगितलेंच आहे. याशिवाय त्याच्या एका विद्यालयस्थ गुरूनें बॉसवेल्पाशीं काय म्हटलें तेंही प्रसिद्धच आहे. तो म्हणाला, मी जॉन्सन्चा उगीच नांवाचा मात्र गुरु होतों; खरोखर पाहतां तो माझ्याहूनही वरचढ होता."

प्रस्तुत विख्यात ग्रंथकाराच्या शिक्षणाचा वर जो वृत्तांत सांगितला आहे त्यावरून आमच्या मार्मिक वाचकांच्या लक्षांत एक मोठी महत्त्वाची गोष्ट आल्यावांचून राहणार नाहीं. ती ही कीं, **मनुष्यानें विद्येंत किंवा कोणत्याही गुणांत निपुणत्व पावणें हें त्याच्या स्वप्रयत्नाधीन जितकें आहे तितकें त्याच्या शिक्षकांच्या ज्ञानावर किंवा श्रमावर नाहीं.** आजपर्यंत मोठेमोठे विद्वान् ग्रंथकर्ते जे या पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेले आहेत त्यांचा गुरूपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अंश व पुढें त्यांच्या परिश्रमानें तें जितकें वाढलें तो अंश यांची जर परस्पर तुलना केली तर पहिला दुसऱ्यापुढें कांहींच नाहीं असें नेहमीं दिसून येईल. यास्तव ज्यास ज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्यानें त्याविषयीं स्वतः उद्योग केला पाहिजे; शिक्षकाचें काम मुख्यतः दिग्दर्शनापेक्षां दुसरें नाहीं. हल्लीं युरोपांत व अमेरिकेंत मुद्रणकलेचा अतिशयित प्रसार होऊन पुस्तकें अगदीं स्वल्प किंमतीस मिळूं लागल्यामुळें, व तीं सर्व विषयांवर व सर्वांस सहज सम—

जतील अशा प्रकारचीं झाल्यामुळें, शिक्षकाचीही गरज बहुतेक अंशीं नाहींशी झाली आहे. त्यामुळें शेंकडों मोठमोठाले ग्रंथकार असे निपजले आहेत कीं, त्यांस शिकविण्यास कोणाचीच गरज लागली नाहीं; त्यांचें सर्व ज्ञान त्यांस स्वतःसिद्धच प्राप्त झालें. अशासारखी स्थिति इकडे जर कांहीं सुरू झाली, तर विद्याखात्याचा किती अटाट वांचेल, व लोकांचें किती हित होईल ?

## बापाच्या मरणानंतर उपजीवनार्थ उद्योग

जॉन्सन् कॉलेज् सोडून घरीं आल्यावर कांहीं दिवसांनीं त्याचा बाप मरण पावला. यास त्याच्या धंद्यांत कधींहीं बरकत आली नाहीं, व शेंवटीं शेवटीं तर एका व्यापारांत त्यास मोठी ठोकर लागून तो अगदीं डबघाईस आला. त्यास प्रपंच भागविण्याचीही पंचाईत पडूं लागली. अशा स्थितींत त्याच्या मरणानें जॉन्सन्, त्याचा एक भाऊ, व त्यांची आई, यांची केवढी तारांबळ झाली असेल याची कोणासही सहज कल्पना होईल. तरी असल्या संकटांतही प्रस्तुत चरित्राचा विषयभूत जो विख्यात पुरुष त्यानें अगदीं धैर्य सोडलें नाहीं. बापानें मरतेवेळीं ठेविलेला पैसा सगळा वीस पौंड ( दोनशें रुपये ) होता. तो आपल्या आईपाशीं ठेवून व आपल्या भावास बापाच्या दुकानावर लावून स्वतः केवळ आपल्या विद्येवर चरितार्थ चालविण्यास व आपलें नशीव काढण्यास तो निघाला. पहिल्यानें त्यानें एका शाळेंत चाकरी धरली. ही शाळा खासगी होती; व हींत जॉन्सन् हा दुय्यम म्हणून राहिला. पण शाळेच्या अध्यक्षाचें व याचें कधींहीं नीट न पटल्यामुळें त्यानें ती जागा लवकरच त्रासानें सोडून दिली. शाळेचे सर मास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिस्मारखान होते; त्यांचा हिशोब असा होता कीं, या दुय्यमाला आम्हीं मोठी मेहेरबानी करून अन्नाला लावला आहे, तेव्हां आमचा मोंगलाई अंमल यानें निमूटपणें मान खालीं करून सोसला पाहिजे. आम्ही सांगूं तें यानें शिरसावंद्य करून बंद्या गुलामाप्रमाणें प्रत्येक शब्दास 'हां जी, जी हां' अशी मान डोलविली पाहिजे. पण जॉन्सन् कसचा ? जो पुढें ऑस्बोर्न् याच्या डोकींत त्याचेंच एक भलें मोठें बूक पाहून घालायाला चुकला नाहीं, व ज्यानें चेस्टॅर्फील्ड् सारख्याचीही पर्वा ठेवली नाहीं, तो यःकश्चित् शाळामास्तराला विचारतो काय ? त्यानें खाड्दिशीं चाकरीला लाथ मारली, व बर्मिंग्हॅम् नामक शहरास निघाला. तेथें एक त्याचा परम मित्र होता, त्याच्या

घरीं तो कांहीं दिवस राहिला. तेथें असतां एका पुस्तकवाल्याच्या सांगण्यावरून त्यानें एका फ्रेंच ग्रंथाचें भाषांतर आरंभिलें. हा ग्रंथ लोवो नामक एका जेसुईट् ग्रंथकारानें 'आबिसिनिया देशाची सफर' म्हणून केला होता तो होय. या कामाबद्दल त्यास वर सांगितलेल्या पुस्तकवाल्यानें पांच पौंड दिले. यानंतर त्यानें एका ल्याटिन् कवीचे ग्रंथ छापण्याबद्दलची जाहिरात दिली. तींत त्यानें असें कळविलें होतें कीं, वरील कवीचीं काव्यें थोड्या किंमतींत सर्वांस मिळून शिवाय त्या कवीचें चरित्र व एकंदर ल्याटिन् कवितेचा इतिहास हाही सदहू आवृत्तीस जोडावयाचा आहे. पण या ग्रंथास कोणीं फारसा आश्रय न दिल्यामुळें वरील संकल्प तसाच असिद्ध राहिला.

## विवाह—विद्यालय स्थापना—लंडन शहरास प्रस्थान

यापुढें बहुधा सर्व मनुष्यांच्या आयुष्यांतील एक मोठी ठोकळ गोष्ट जो विवाह तो जॉन्सन्चा झाला. तो बर्मिंगहॅम् येथें असतां तेथील एका व्यापाऱ्याची व याची ओळख पडली होती. त्याच वेळेस त्याच्या बायकोचा व याचाही बराच परिचय जडला होता; याच्या विद्वत्तेस्तव व भाषणचातुर्यास्तव हा तिला आवडूं लागला होता; व यासही तिच्या रसिकतेमुळें व इतर गुणांमुळें ती पसंत झाली होती. जॉन्सन्नें आपल्या आईची आज्ञा विचारून गृहस्थधर्माचा स्वीकार केला व आजपर्यंत जो मुशाफरासारखा एकेकटा राहिलेला होता तो आतां घरदार, चाकरमाणसें, बायको, अशा थाटानें राहूं लागला. बायकोनें लग्नसमयीं आठशें पौंड जॉन्सन्च्या स्वाधीन केले, व ते चांगल्या व्यवस्थेनें लावले असते तर त्यांस पुष्कळ दिवस, किंबहुना जन्मभर, चांगल्या रीतीनें पुरले असते. पण तें होतें कसें ? त्यास अद्याप पुष्कळ काळ दारिद्र्यांत व विपत्तींत काढावयाचा होता! तेव्हां त्यास अशी बुद्धि आठवली कीं, आपला संसार थाटलाच आहे, तेव्हां सध्यांप्रमाणेंच पुढेंही चालण्यास आपण स्वतः एक निराळें विद्यालय स्थापावें. हें विद्यालय त्याच्याच घरीं असून विद्यार्थ्यांचा जेवणाखाण्याचा वगैरे बंदोबस्त तेथेंच ठेवण्याचें त्यानें योजलें. मग सर्व तयारी झाल्यावर एका वर्तमानपत्रांत जाहिरात आली कीं, साम्युअल् जॉन्सन् याच्या घरीं विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केली असून ल्याटिन् व ग्रीक् या भाषांचें अध्ययन चालावयाचें आहे, तर श्रीमान् व संभावित लोकांनीं आपलीं मुलें येथें पाठवावीं.

या जाहिरातीचें फारसें फळ दृष्टीस पडलें नाहीं. अठरा महिने लोटून गेले तरी दोन तीन मुलांवर जास्त त्यास मिळेनात. याचें कारण असें होतें कीं, जॉन्सन्‌ची जी पुढें विलक्षण ख्याति होऊन बसली कीं, त्याच्या सहज बोलण्याबरही मोठमोठे लोक सुद्धां झुलूं लागले, व तो केवळ अप्रातिम पंडित ठरला, तसें यावेळेस कांहीं नव्हतें. त्याची प्रसिद्धी काय ती विद्यालयांतच असून एकंदर लोकांस तो विशेष माहितही नव्हता. शिवाय शिक्षकाच्या अंगीं जे गुण अवश्य लागतात त्यांपैकीं कांहींची त्याच्या अंगीं उणीव होती. एक तरें शरीरव्यंग. त्याचा चेहरा मूळचा जरी वाईट नसून उलटा भव्यही होता, तरी मागें सांगितलेल्या रोगाच्या योगानें त्यावर मोठमोठाले वण पडले होते, व त्याची दृष्टि अधू झाली होती. शिवाय त्याची बोलण्याचालण्याचीही ढब श्रोत्यांच्या व त्यांतून पोरांच्या मनांत भरण्यासारखी नसून त्यांत उपहासास्पद वाटण्यासारखी होती. वायुग्रस्त मनुष्याप्रमाणें हातपाय वरचेवर वेंगायचीं त्यास लहानपणापासून संवय लागून गेली होती; व त्याच्या मेंदूंत कांहीं विकार असल्यामुळें त्याची कृति पुष्कळ अंशीं वेड लागलेल्या मनुष्यासारखी दृष्टीस पडे. हा सर्व प्रकार घरींच विद्याभ्यासास राहिलेल्या पोरांच्या प्रत्यहीं नजरेस पडावयाचा; मग अशांची गुरुविषयीं पूज्यबुद्धि न जडतां त्याची त्यांस चेष्टाच वाटत असेल यांत नवल काय? याखेरीज वरील विद्यालयांतली दुसरी मोठी नक्कल म्हटली म्हणजे गुरुपत्नी होय. तिचें वय जॉन्सन्‌च्या दुप्पट होतें. म्हणजे तिचें अठ्ठेचाळीस व नवऱ्याचें सव्वीस! या विद्यार्थ्यांत शेक्सपिअरच्या पात्रांचा सर्वोत्कृष्ट अभिनय करणारा जो प्रख्यात ग्यारिक् तो होता. तो अगोदरच नकल्या, व पुढें नाटकाचें कसब पुरेतपणीं साधून त्यांत पहिल्या पदवीस चढलेला, आणि वरील सर्व मजा त्यानें स्वतः लहान वयांत पाहिलेली, तेव्हां पुढें लंडन शहरांतल्या बड्या बड्या मंडळींत तो जेव्हां आपल्या गुरूची नक्कल करी तेव्हां ती किती हुबेहुब व मजेदार उतरत असेल हें सांगावयास नको. ऐकणाऱ्या मंडळींचें हंसतां हंसतां पोट दुखून येई. असो; तर जॉन्सन्‌चें विद्यालय चांगलेंसें न चालण्याचीं वर सांगितलेलीं कारणें होतीं. शिवाय त्याचा स्वभावही सौम्य व मनमिळाऊ नसून पराकाष्ठेचा कडक असे व विद्यार्थ्यांस अगदीं मुलभूत सिद्धांतापासून क्रमाक्रमानें शिकवीत जाण्याची जी दगदग असते, तीही त्यास

अगदीं आवडत नसे. तेव्हां या सर्व गोष्टींमुळें वर सांगितलेल्या विद्यालयाची कधींही ऊर्जितदशा आली नाहीं. शेवटीं बायकोनें जो ऐवज आणला होता तो अशा प्रकारें सगळा व्यर्थ खर्चून जाऊन पुन्हां ददात ती ददात राहिलीच. हें पाहून जॉन्सन्नें आपल्या लेखणीवर आपला चरितार्थ चालवावयाचा हा पूर्वीचा संकल्प पुनः मनांत आणून लंडन शहरची वाट धरिली. बरोबर आपला विद्यार्थी वर सांगितलेला ग्यारिक् यास घेतलें.

ही गुरुशिष्यांची जोडी वरील राजधानींत सन १७३७ वर्षाच्या आरंभीं येऊन दाखल झाली. दोघेही पहिल्यानें केवळ उपजीवनार्थ तेथें आले असून पुढें पुढें आपआपल्या गुणांच्या योगानें अत्यंत विख्यात व सर्वांत प्रमुख होऊन बसले. हें अत्युच्च स्थान जॉन्सन् यास कसें प्राप्त झालें तें यापुढें क्रमाक्रमानें सांगावयाचेंच आहे. सध्यां ग्यारिक्ची हकीकत सांगतों.

## ग्यारिक्

हा विख्यात नट जॉन्सन्चा परम मित्र होता; व त्याचा प्रस्तुत चरित्रांत अनेक वेळां संबंधही येणार आहे. यास्तव व शिवाय सामान्यतः माहितीचा विषय म्हणून पुढील वृत्तांत अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. ग्यारिक् हा जॉन्सन्हून आठ दहा वर्षांनीं लहान होता. याचा शिक्षणाचा वगैरे प्रकार वर सांगितलेलाच आहे. याचा कल लहानपणापासून नाट्यविद्येकडे असे. लंडनास आल्यावर पहिल्यानें तो कांहीं दिवस व्यापाराच्या नादांत गुंतला होता. पण त्या कामाचा त्यास कंटाळा येऊन तो लौकरच नाटकांत शिरला. शिरल्याबरोबर लागलीच कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या सोबत्यांस व त्या शहरांतील सर्व नटांस मागें टाकलें. इतर सर्व नाटकगृहें हळुहळू शुष्क होत जाऊन सारी गर्दी इकडेच जमूं लागली. ख्यालीखुशाली करणारी शौकिन मंडळी व मोठमोठे अमीर उमराव यांचा आश्रय ग्यारिक् ज्या मंडळींत होता तीसच मिळूं लागला. फार तर काय पण पोपसारख्यांनीं व मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांनीं व उत्कृष्ट रसिकांनीं सुद्धां हा अपूर्व नाट्यप्रकार पाहून तोंडांत बोटें घातलीं. याप्रमाणें थोड्याच काळांत ग्यारिक्ची चहूंकडे मोठी कीर्ति झाली असतां त्यानें स्वतः एक नाटकगृह आपल्या ताब्यांत घेतलें व त्या मंडळींत आपण मुख्य झाला. हें आधिपत्य त्यानें पस्तीस वर्षें चालविलें. सरतेशेवटीं आपल्या सभाजनांची बहुमानपुरःसर

प्रेमपूर्वक आज्ञा घेऊन ज्या कामांत त्यानें एवढी कीर्ति मिळविली तें सोडून दिलें. नाटकगृहाची मालकी त्यानें विकली. तिजबद्दल त्यास ३७००० पौंड मिळाले. या रकमेवर व पूर्वीच्या मिळालेल्या संपत्तीवर आपले शेवटले दिवस आनंदानें काढण्याचा त्याचा संकल्प होता. पण पुढें लवकरच तो मरण पावला. ग्यारिक्च्या मागें त्याच्यासारखा नट अद्याप झाला नाहीं.

जॉन्सन्चा शिष्य नुसता उत्तम नटच होता असें नाहीं तर त्याच्या अंगीं बरीच कवित्वशक्ति असून तो त्या वेळच्या विद्वन्मंडळांत मोडत असे. " जॉन्सन्चा क्लब " म्हणून जी बर्क्, गिबन् अशा सभासदांची मंडळी आठव-ड्यांतून एकदां एके ठिकाणीं जमत असे, तींत तो होता; आणि भाषणचातु-र्यांत व विनोदकलेंत त्याची सर्वांवर ताण होती. पण आपल्या राष्ट्रावर किंबहुना साऱ्या जगावर त्यानें केलेला मोठा उपकार अद्याप सांगावया-चाच आहे. तो इंग्लंडांतल्या किंबहुना तद्देशीयांच्या मतें साऱ्या जगांतल्या कवींत अग्रगण्य जो शेक्सपीअर त्याच्यासंबंधानें होय. या महाकवीचे ग्रंथ पहिल्यापासून जरी सर्वांस प्रिय होऊन राहिलेले आहेत तरी ग्यारिक्च्या पूर्वी त्यांची असावी तशी चहा नसे. कांहीं काळपर्यंत तर ते अगदींच अप्रसिद्ध झाल्यासारखे होऊन जॉन्सन्च्या वेळीं त्यांच्याहून ड्रायडन्, ह्याच्याकडेच लोकांचा विशेष भर असे. पण वर वर्णिलेला अपूर्व नाट्यप्रकार जेव्हांपासून सुरू झाला तेव्हांपासून तें मान । फिरत चाललें शेक्सपीअरच्या कीर्तीचें पुन-रुज्ज्वलन होऊन ज्या कवितेच्या अंतर्गत गुणांकडे लोकांची दृष्टि तोंपर्यंत पोंचली नव्हती ती तिजकडे तेव्हांपासून पोंचूं लागली. ग्यारिक्ची तर वरील कवीविषयीं जी पूज्यबुद्धि होती ती कांहीं अतोनात. सन १७६९ सालीं त्यानें शेक्सपीअरची जन्मभूमि जें स्ट्राट्फर्ड् तेथें त्याच्यानिमित्त एक मोठा महोत्सव केला. तो सारखा तीन दिवस चालून हजारों लोकांनीं तेथील तुतीचें झाड, तेथली खुर्ची व एकंदर सर्व देखावे डोळे भरून पाहून घेतले, व तेथील खुणा देवाच्या प्रसादाप्रमाणें पदरीं बांधून नेल्या. असो, तर या नटानें केलेल्या नाटक-प्रयोगांनीं त्या वेळच्या लोकांचें तात्कालिक रंजन झालें इतकेंच नव्हे, तर त्या राष्ट्राच्या महाकवीविषयीं सर्वांचे ठायीं पुनः अतिशय प्रेम उत्पन्न होऊन लोकाभिरुचीस नवेंच वळण दिल्यासारखें झालें. तशीच हीहि दुसरी गोष्ट म्हटली

पाहिजे कीं, ग्यारिक्सारख्या संभावित व सर्वमान्य मनुष्यानें नाट्यकर्माचा अंगीकार केल्यानें त्यास प्रतिष्ठा येऊन नाटक करणारी मंडळी म्हणजे दुराचरणांचें माहेरघर होऊन जी राहिली होती तोही प्रकार बराच मोडला.

## जॉन्सन्च्या विपत्तीस आरंभ

जॉन्सन् इ. स. १७३७ सालीं लंडनास येऊन दाखल झाला हें पूर्वींच सांगितलें आहे. येथपासून त्याच्या विपत्तीस जो आरंभ झाला तो बरोबर पंचवीस वर्षें त्याची तशीच स्थिति होती. त्यानें अनेक मोठमोठे ग्रंथ केले, निबंध लिहिले, काव्यें रचिलीं व त्याची कीर्तिही चोहोंकडे अधिकाधिक पसरत होती; पण त्याची ददात म्हणून सुटली नाहीं. लक्ष्मीचा व सरस्वतीचा विरोध जो आपल्या लोकांत प्रसिद्ध आहे त्याचें उत्कृष्ट उदाहरण त्याचे ठायीं दृष्टीत पडत होतें. त्याचीं शेवटलीं वीसबावीस वर्षें मात्र बरींच सुखांत व स्वस्थतेंत गेलीं; तरी शेवटपर्यंत त्याजपाशीं धनाची विपुलता अशी कधींच नव्हती. वरील स्वास्थ्याचा प्रकार कशामुळें घडून आला याविषयीं क्रमेंकरून सांगावयाचेंच आहे. सध्यां वरील दरिद्रता जॉन्सन् यास दीर्घकाळ कशामुळें भोगावी लागली तें लिहितों.

## विपत्तीचीं कारणें

पहिलें मोठें कारण त्या वेळची लोकस्थिति होय. आडिसन्च्या 'स्पेक्टेटर' नांवाच्या निबंधांनीं एकंदर लोकांस वाचावयास शिकविलें. वरील निबंधावली सन १७११–१२ या दोन वर्षभर प्रतिदिवशीं निघत असे. त्या काळास व वरील काळास नुकतीं पंचवीस वर्षें काय तीं निघून गेलीं होतीं. तेव्हां जे लोक ॲडिसन्च्या वेळेस ट फ करायाला लागले त्यांची गति एक पिढी लोटून गेल्यानें किती जास्त झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल. हल्लीं वरील काळास दीडशें आधिक वर्षें होऊन गेल्यामुळें जें विलक्षण स्थित्यंतर होऊन गेलें आहे त्यावरून पाहतां हल्लींच्या इंग्रज लोकांच्या पांचव्या सहाव्या पिढीचे लोक इतके अज्ञानी होते कीं, कल्पना करणें सुद्धां कठीण पडतें. पण मिल्टन्सारखा कीं ज्याचें नांव घेतल्याबरोबर सध्यां इंग्लंडांतील लहान पोरांच्या मनांत सुद्धां पूज्यभाव व प्रेम उत्पन्न होतात, त्याची कविता त्याच्या वेळेस तर केवळ उपेक्षेसच पात्र होऊन पुढेंही तीस चाळीस वर्षेंपर्यंत बहुधा तशीच लोळत पडली होती. तिची अभिरुचि ॲडिसन्नेंच पहिल्यानें

आपल्या देशबांधवांस लावली. या एका गोष्टीवरून त्या वेळच्या स्थितीचें अनुमान सहज होण्यासारखें आहे. असो; तर जॉन्सन् ज्या वेळेस लंडनास येऊन आपल्या लेखणीवर उपजीविका चालविण्याचा उद्योग करूं लागला त्या काळीं लोकांस विद्येची अभिरुचि उगीच कोठें लागत चालली होती हें एक त्याच्या दरिद्रतेचें कारण होय. सध्यांसारख्या स्थितींत त्याच्या एखाद्या ग्रंथाचें उत्पन्न त्यास जन्मभर पुरलें असतें. दुसरें कारण असें कीं, पुस्तकवाल्यांचा धंदा त्या वेळेस आतांप्रमाणें पिकला नसल्यामुळें ते स्वतः बहुधा अगदीं अडाणी असत. एखादा नवा ग्रंथ त्यांच्याकडे छापण्यास व विकण्यास आणला असतां त्याच्या खपाचा अदमास त्यांस स्वतः करतां येत नसे. कोणा प्रसिद्ध ग्रंथकाराची संमति जेव्हां ते घेत तेव्हां तो हातीं घेण्यास ते धजत. त्यामुळें जॉन्सनूचें नांव चांगलें प्रसिद्ध होईपर्यंत त्याच्याही ग्रंथांबद्दल पुस्तकवाले त्यास फार पैसा देत नसत व तोही स्वतः पैशाच्या कामांत सढळच असल्यामुळें इतर ग्रंथकाराइतकीही आपल्या ग्रंथास किंमत मागत नसे. जें एकदां पहिल्या बोलीला ठरेल तेंच संतोषानें घेत असे. हें दुसरें कारण झालें. पण तिसरें कारण तर दोहोंहूनही मोठें होतें. तें या विख्यात मनुष्याची निःस्पृही व मानी अशी मनाची स्वाभाविक वृत्ति होय. तो शरीरानें जसा धट्टाकट्टा व बळकट होता तसाच मनानेंही अडदांड व उच्छृंखल होता. कोणी मनुष्य केवढाही मोठा असला तरी त्याच्या वैभवास्तव त्याशीं लवून वागणें किंवा त्याचें मनोधारण करूं पाहणें हें त्यास अगदीं आवडत नसे. जसा अगदीं गरीब मनुष्याशीं तसा थेट त्यांच्याशींही तो वागत असे व बोलण्याचालण्यांत कांहीं कमजास्त झालें असतां तो त्यांस खडखडीत उत्तर देण्यांत किंवा हे डयूक् आहेत, अर्ल् आहेत व आपण काय गरीब मनुष्य, आपणांस वेळेनुसार दोन प्रहरचीही भ्रांत, हें मनांत आणून त्यांचें अज्ञान किंवा उर्मटपणा त्यांस भासवून देण्यास तो कधींही कमी करीत नसे. मग अशा स्वारीचें व बड्या बड्या लॉर्डसाहेबांचें कीं, जे छानछोक करून आलेल्या लेडीसाहेबांची खुशामत करतां करतां मरून जाणार व मोठ्या अदबीनें बोलणें, चालणें, नटणें, मुरडणें, या नाटकी कलेंत आपण मोठे बांके म्हणून आपली धन्यता मिरविणार, अशांचें कसें जमावें? तेव्हां

अर्थात् ह्या वड्या मंडळींत त्यास पुरस्कर्ता कोणीही न मिळाल्यामुळें त्यास स्वतःच्या श्रमानेंच जें मिळेल त्यावर बहुधा शेवटपर्यंत गुजारा करावा लागला.

## त्या वेळची विद्योपजीविजनाची स्थिति

जॉन्सन् लंडन शहरास निघाला तेव्हां त्याजजवळ सामुग्री म्हटली म्हणजे दोन–तीन गिनी, दोन–तीन शिफारशीचीं पत्रें व एक अर्धमुर्धं तयार झालेलें नाटक एवढीच काय ती होती. वरील शिफारसपत्रांपैकीं एक, एका प्रसिद्ध पुस्तकवाल्यास लिहिलेलें असून जॉन्सन्‌ची विद्वत्ता, कविताशक्ति वगैरे गुणांविषयीं त्यांत त्यांची प्रशंसा केली होती व शेवटीं सांगितलें होतें कीं, यास तुम्ही भाषांतराचें वगैरे काम दिलें असतां हा तुमच्या चांगला उपयोगी पडेल. हें पत्र त्या पुस्तकवाल्यानें वाचून असेंच जॉन्सन्‌कडे अंमळ रेखून पाहिलें व तो विनोदानें म्हणाला, " गड्या, तूं जर बाजारांत हमालाचें पोतें विकत घेऊन ओझीं वाहत जाशील तर तुझा निर्वाह याहूनही बरा चालेल. " या त्याच्या भाषणांत नुसती थट्टाच होती असें नाहीं. त्याच्या व इतर पुस्तकवाल्यांच्या आश्रयानें जे ग्रंथकार आपली उपजीविका करीत असत त्यांची अवस्था कशी असे ती त्याच्या नेहमींच्या पहाण्यांतली होती. त्यांचें रहाणें चौथ्या पांचव्या मजल्यावरच्या खोलींत, जेवणखाण एखाद्या भटाऱ्याच्या दुकानांत, अंगावर कपडालत्ताही वेळच्या वेळेवर घालावयाला मिळावयाचा नाहीं, कधीं कधीं तोही सावकारानें शिपाई आणून जप्त करावयाचा, अशा प्रकारें ते काळ काढीत असत. जॉन्सन्‌नेंच आपली स्थिति अनेक प्रसंगीं वर्णिली आहे कीं, त्यास नित्य चिंता म्हणून सुटली नाहीं. आज जर आळसामुळें कांहीं काम केलें नाहीं तर उद्यां खडखडीत उपास पडावयाचा. अशी स्थिति त्याची वीस पंचवीस वर्षें होती. कधीं कधीं तर दोनदोन दिवस त्यानें अन्नावांचून काढावे. दोनदां तर नाझरच्या शिपायानें त्यास पकडलें असतां त्याचा मित्र प्रख्यात कादंबरीकार रिचर्ड्‌सन् यानें त्यास पांच पौंड उसने देऊन सोडविलें. असो; तर असल्या विपन्न स्थितींत प्रस्तुत ग्रंथकारानें आपले ऐन उमेदीचे व भर तारुण्याचे दिवस काढले. तरी त्याची नीति व सदाचरण हीं लवमातही सुटलीं नाहींत. एकदोनदां मात्र त्याचा प्रसिद्ध मित्र सान्व्हेज् याच्या संगतीनें त्याचें जरा वांकडें पाऊल पडलें; पण तत्क्षणींच वाटेवर येऊन

त्याबद्दल त्यास जन्मभर अनुताप होत असे. साव्हेज् हा मोठा विलक्षण पुरुष होता. त्याचा जन्म मोठ्या कुळांत झाला असून त्याजवर मोठमोठे चमत्कारिक प्रसंग येऊन गुजरले होते व जगाच्या सर्व स्थितींचा अनुभव त्यास घडला होता. शेवटीं जॉन्सन् वरील विपत्तींत रखडत असतां हा त्यास जोडीदार मिळाला व "समानशीले व्यसनेषु सख्यम्" या न्यायानें दोघांचा लवकरच परिचय होऊन अत्यंत स्नेह जडला. साव्हेजच्या अंगीं बरीच कवित्वशक्ति असून तो विद्वान् व बहुश्रुतही होता व जगाच्या व्यवहारांत पुष्कळ घोळून गेलेला असल्यामुळें त्याची संगति जॉन्सन् यास विशेषच प्रियकर झाली. दोघेही फटिंग व दोघेही सारखेच कफल्लक, तेव्हां दोघांनीं सारी रात्रची रात्र शहरभर हिंडावें, व साऱ्या जगाच्या उलाढाली कराव्या. या वेळेस वरील स्नेह्याच्या संगतीनें जॉन्सन् यास ज्या कित्येक संवयी लागून गेल्या त्या शेवटपर्यंत त्यास लागून राहिल्या. त्या रात्रभर जागणें व दिवसां दोनदोन वाजेतों निजून राहणें, कोणाचीही फारशी मुरवत न ठेवतां त्यांस चापून उत्तर करणें, रागाच्या सपाट्यांत हातघाईवर येणें अशा तऱ्हेच्या कांहीं होत. असो, पण हा समागम फार वेळ टिकला नाहीं. साव्हेज् यास लंडन शहरचा त्रास येऊन तो वेल्स् शहरांत निघून गेला. आणि लवकरच तिकडे दिवाणी तुरुंगांत मरण पावला.

## जॉन्सन्चा उपजीवनार्थ उद्योग

इकडे जॉन्सन्चा क्रम 'शनैःपंथाः' या न्यायानें सारखा चाललाच होता. फ्रेंच, इटालियन्, लॅटिन् वगैरे भाषांतल्या ग्रंथांचीं भाषांतरें, नव्या ग्रंथांवर टीका, प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, निरनिराळ्या विषयांवर निबंध, कविता वगैरे, नाटकारंभींच्या सामाजिक विज्ञापना, ग्रंथार्पणपत्रें, पुस्तकालयांतील ग्रंथांची विषयवार याद, याप्रमाणें जो जो उद्योग सांपडेल व जो जो कोणी सांगेल तो जॉन्सन् करीत असे. तो स्वभावतः आळशी व मनस्वी होता व शिवाय त्यास जी चमत्कारिक मनोविकृति जडली होती तिच्यामुळें तर त्यास जागचें उठूं नये, असेंही वाटे; पण क्षुधेपुढें उपाय नाहीं. तिचें शमन करण्याचें साधन त्यास दुसरें अनुकूल नसल्यामुळें त्यास आंग मोडून दररोज कांहीं तरी उद्योग करावा लागे. या त्याच्या विपन्न स्थितीमुळें त्याच्या बुद्धिरूप भांडारांतील इतकी संपत्ति बाहेर पडली व त्याच्या देशाचें कल्याण होऊन तिजपासून एकंदर जगासही

इतका उपयोग झाला. नाहीं तर खाणींतील खाणींत राहिलेल्या सोन्यारुप्या-प्रमाणें वरील संपत्ति बहुधा तशीच गुप्त रहाती किंवा फारच थोडी प्रगट झाली असती. या गोष्टीची प्रचीति या ग्रंथकाराचीं शेवटलीं वीस वर्षें जीं अमदानींत गेलीं तिजवरून पुढें येईलच. असो; आतां वरील ग्रंथसमूहांत व निरनिराळ्या कृतींत विशेष प्रसिद्ध म्हणून जेवढ्या प्रसिद्ध आहेत तेवढ्यांविषयीं वाचकांस माहिती देतों.

## त्याचीं काव्यें व नाटक

जॉन्सन्च्या नांवावर दोन प्रसिद्ध काव्यें जीं आहेत तीं त्यानें याच वेळेस लिहिलीं. हीं 'लंडन' व 'मानवी आशेचें वैफल्य' अशीं दोन होत. पहिलें त्यानें आपल्या मित्राच्या प्रयाणसमयीं लिहिलें. त्यांतील पहिलीं पद्यें त्यासच उद्देशून लिहिलीं असून बाकीच्यांत इंग्लंडच्या राजधानींत जो दुराचाराचा आणि अनीतीचा वगैरे प्रकार आहे त्याचें वर्णन केलें आहे. दुसऱ्या काव्यांत मोठमोठे राजे, सरदार, मोठमोठे मुत्सद्दी, त्यांचीं उदाहरणें देऊन मनुष्याच्या मनाची धांव कशी निष्फळ होते, म्हणजे मोठें अवडंबर रचलें त्याचा एका क्षणांत कसा विध्वंस होऊन जातो, हें दर्शविलें आहे. हीं दोन्ही काव्यें लॅटिन् कवि जुवेनल् याच्या धाटणीवर लिहिलीं आहेत. जुवेनल्नें रोम शहरावर कडाका उडवून रोमच्या इतिहासांतील उदाहरणें जशीं घेतलीं होतीं त्याचप्रमाणें जॉन्सन्नें आपलें वसतिस्थान व आपल्या देशाचा इतिहास त्यांच्या आधारानें वर्णन केलें. हीं दोन्ही काव्यें मूळ लॅटिन् काव्याच्या तोडीचीं आहेत. कोठें कोठें तर मूळच्यावरही ताण झालेली आहे. पहिलें 'लंडन' प्रसिद्ध झालें त्या वेळेस पोप होता. त्यानें मागील मेसाया-प्रमाणें याचीही फार तारीफ केली. आणि त्याचा कर्ता कोण असावा याविषयीं आपल्या मित्रांकडून शोध करविला. शोधाअंतीं असें समजलें कीं, हा कोणी गरीब अप्रसिद्ध मनुष्य आहे. तेव्हां त्यानें भाकित केलें कीं, हा मनुष्य फार दिवस अप्रसिद्ध राहणार नाहीं. याप्रमाणें या काव्याची प्रथमारंभींच मोठी प्रशंसा झाली. कित्येक तर असेंही म्हणूं लागले कीं, आतां पोपचेंही वर्चस्व फार दिवस टिकणार नाहीं. याचा खपही तसाच असा जलद झाला कीं, दुसऱ्या आठवड्याला दुसरी आवृत्ति काढावी लागली. तरी जॉन्सन् यास पुस्तक-वाल्याकडून या काव्याबद्दल दहाच गिनी काय त्या मिळाल्या ! याप्रमाणें

दुसऱ्या काव्याचीही जरी चोंहोंकडे वाखाणणी झाली तरी त्यापासून त्यास मिळकत पंधरा पौंडच झाली.

जॉन्सन्नें लंडनास येतांना बरोबर एक अपुरतें राहिलेलें नाटक आणलें होतें असें वर वाचकांस कळविलें आहे. तें त्यानें आल्यावर संपूर्ण केलें; तें 'ऐरीन' हें होय. इंग्लिश भाषेंत, किंबहुना युरोपांतल्या साऱ्या भाषांतून नाटकाचे दोन प्रकार मानलेले आहेत; एक ट्रॅजेडी (शोकरसप्रधान) व दुसरा प्रकार कॉमेडी (हास्यरसप्रधान). यांपैकीं पहिल्या वर्गांतलें वरील नाटक होय. त्याचें संविधानक तूर्क लोकांच्या इतिहासांतील एक चमत्कारिक वृत्तांत घेऊन त्यावर बांधलेलें आहे. याचा प्रयोग जॉन्सन्चा शिष्य गॅरिक् यानें मूळच्यांत पुष्कळ फेरफार करून रंगभूमीवर तेरा वेळ करविला. या प्रसंगीं गॅरिक्नें आपल्या गुरु-करितां आपलें कसव होतें तितकें प्रगट केलें आणि एकंदर नाटकाची तयारी जितकी उत्कृष्ट ठेवतां आली तितकी ठेवली. पण मूळ कृतींत अंतःकरणास द्रव-विण्यासारखें विशेष फारसें कांहीं नसल्यामुळें सभाजनास तें फारसें पसंत झालें नाहीं. त्यांतील भाषा व विचार हीं दोन्हीं प्रौढ होतीं. यास्तव तें श्रोत्यांनीं शेवटपर्यंत गंभीरपणानें व स्वस्थपणानें ऐकून घेतलें. पण एकंदर प्रकार थंडाई-चाच झाला. तेव्हांपासून पुढें तर त्याचा प्रयोग कधींच झाला नाहीं व जॉन्सन्च्या इतर ग्रंथांच्या मानानें पाहतां ॲडिसन्च्या 'केटो'प्रमाणें तें आतां विशेष प्रसिद्धही नाहीं. हीं दोन्ही नाटकें आतां सर्वांच्या मतें वाचण्यास मात्र चांगलीं असून रंगभूमीवर प्रयोग करण्याच्या उपयोगी नाहींत असें ठरलें आहे. या नाटकाच्या प्रयोगावरून व छापण्याचा हक्क विकल्यावरून जॉन्सन् यास एकंदर तीनशें पौंड मिळाले. हेच त्या वेळेस त्यास हजाराच्या जागीं होते.

जॉन्सन्नें पद्यरूप जी ग्रंथरचना केली ती वर सांगितलेली तेवढीच. यापुढें त्याचे ग्रंथ गद्यरूपच आहेत. त्याची पुढें पुढें जी विलक्षण ख्याति झाली व अद्यापही चालत आहे ती या गद्यग्रंथांवरूनच होय. कांहीं अंशीं या पद्धतीस त्यानें नवें स्वरूप देऊन विचारप्रचार वाढविला, असें सुद्धां म्हणण्यास हरकत नाहीं. या वेळीं इंग्लंडांत "जंटलमेन्स मॅगेझिन्" म्हणून एक पत्र निघत असे. त्यांत त्याचे लेख पहिल्यानें येऊं लागले. या पत्रांत निबंध वगैरे सामान्य लौकिक विषय जसे असतात त्याप्रमाणें पार्लमेंटांत होणाऱ्या वाटाघाटीची हकीगत लोकांस

कळविली जात असे. हें दुसरें काम कांहीं दिवसांनीं जॉन्सन् स्वतः करूं लागला. वरील पत्राचा मालक आपल्या वतीचे कांहीं लोक पार्लमेंटांतील वादविवाद ऐकण्यास पाठवीत असे व त्यांस तेथील चोपदारांनीं कांहीं हरकत करूं नये अशी त्यानें आंतून गुप्त तजवीजही केली होती. या बातमीदारांनीं भाषणाचा सारांश टिपून आणावा व कोणकोणत्या वक्त्यानें कोणत्या पक्षाकडचें भाषण केलें हेंही लिहून आणावें व मग एवढ्यावर काय ती सगळी इमारत रचावयची. तरी जॉन्सन्‌ची विद्वत्ता व चातुर्य असें होतें कीं, वरील तुटक तुटक माहितीवरून त्यानें दोहों पक्षाकडील वक्त्यांचीं भाषणें स्वकपोलकल्पित नवींच तयार करावीं. मग तीं तयार झाल्यावर वरील पत्रांत गोष्टींच्या रूपानें छापलीं जात. म्हणजे अमुक अमुक नगरींत तेथील राजाच्या प्रधानांनीं अशीं भाषणें केलीं असा आरंभीं उपोद्घात करावा लागे. या भाषणांचेंही कर्तृत्व पुष्कळ दिवसपर्यंत गुप्तच होतें. तें हळुहळू प्रसिद्ध होत जाऊन सरतेशेवटीं जॉन्सन्‌नेंच एका प्रसंगीं कबूल केलें. या भाषणांत प्रस्तुत ग्रंथकर्त्याची प्रौढ रचना व चातुर्य हीं दोन्ही आहेतच; तरी त्याची आतां फारशी प्रसिद्धी नाहीं. जॉन्सन्‌चा यापुढचा ग्रंथ त्याचा परम मित्र वर सांगितला जो सॅव्हेज् त्याचें चरित्र होय. याचा मागें सांगिल्याप्रमाणें वेल्सप्रांतीं एका तुरुंगांत शेवट झाला असतां त्याच्या चरित्राविषयीं लोकांस मोठी उत्कंठा व कौतुक हीं उत्पन्न झालीं होतीं. अशा संधीस वरील ग्रंथ लिहून तीं दोन्ही पुरवलीं व सर्वांस अगदीं थक्क करून सोडलें. त्याही ग्रंथावर जॉन्सन्‌चें नांव नव्हतेंच. तरी पुष्कळांस तोच त्याचा कर्ता म्हणून तेव्हांच माहीत झालें. या वेळेपर्यंत इंग्लंडांत चरित्र लिहिण्याचा प्रकार विशेष चालू नव्हता. व जो चालू होता तोही मोठ्याशा पूर्णदशेस आला नव्हता. कोणी मोठा प्रख्यात मनुष्य मरण पावला असतां जॉन्सन्‌च्यासारखे जे विपन्न ग्रंथकार आपल्या लेखणीवर उदरनिर्वाह करीत असत त्यांनीं त्यांचीं चरित्रें तयार करावीं. मग त्यांत जीं बरींचशीं व खपतीलशीं वाटतील तीं पुस्तकवाल्यांनीं विकत घेऊन छापून प्रसिद्ध करावीं. अशा बुभुक्षाप्रेरित ग्रंथाची योग्यता कितीशी असणार? कांहींच नसे. त्यापक्षीं तसल्यांतही जीं चरित्रें बरींशीं असत तीं लोकांच्या आश्रयास कांहीं वेळ पात्र होत व पुढें नाहींशीं होऊन जात. पण प्रस्तुत चरित्र फार निराळ्या तऱ्हेचें होतें. त्यांत सॅव्हेज्‌च्या आयुष्यांत

घडलेल्या ज्या चमत्कारिक गोष्टी त्या सर्वांचें यथास्थित व चित्तवेधक कथन अशा खुबीनें केलें आहे कीं, वाचकांची वृत्ति तन्मय होऊन जाऊन त्यांस पुस्तक खालीं ठेववतच नाहीं. तसेंच जागोजागीं जे विचार प्रगट केले आहेत तेही मोठे मार्मिकपणाचे व प्रौढतेचे असल्यामुळें सामान्यतः सर्वांस व विशेषतः तरुण जनांस तर अत्यंत हितावह होण्यासारखें आहे.

## इंग्रजी भाषेचा कोश

जॉन्सन्चे येथवर जे जे ग्रंथ सांगितले ते ते त्याच्या पूर्ववयांत व तो तादृश प्रसिद्ध नसतां रचलेले होत. आतां या पुढचा त्याचा जो प्रचंड उद्योग सांगायाचा आहे त्याच्यापासून मात्र त्याची कीर्ति स्थापित होऊन तो त्या काळच्या विद्वान् मंडळांत सर्वानुमतें अग्रगण्य ठरला. हा उद्योग इंग्रजी भाषेचा कोश होय. जॉन्सन्ची मागील ग्रंथावरून चोहोंकडे ख्याति होऊन वरच्या-सारख्या कामास तो किती योग्य होता हें चोहोंकडे माहीत झालें होतें. यास्तव सन १७४७ सालीं लंडन शहरांतील कित्येक मोठमोठे पुस्तकवाले एकत्र जमून त्यांनीं विचार केला कीं, जॉन्सन्कडे हा उद्योग सोंपवून दिला असतां तो चांगल्या तऱ्हेनें शेवटास जाऊन आपणांस चांगला नफा होईल. मग त्यांनीं तो बेत त्यास कळवून त्याबद्दल त्यास १५७५ गिनी देण्याचें कबूल केलें. जॉन्सन् यसही दररोज नवा उद्योग शोधीत बसण्याचा त्रास आला होता. यास्तव दोन-तीन वर्षांचें हें आपणांस एकदमच काम मिळालें असें समजून वरील बेत पसंत झाला. मग हाताखालीं तीन चार मदतनीस घेऊन व एक निराळें घर भाड्यानें घेऊन त्यानें इंग्रजी भाषेचा कोश रचण्यास आरंभ केला. हा संस्कार त्या भाषेस तोंपर्यंत मुळींच घडला नव्हता. नुसते शब्द वर्णानुक्रमानें लावलेले व त्याचा अर्थ थोडक्यांत दिलेला असे लहानसहान कांहीं कोश होते. तोंपर्यंत त्या भाषेंत जो गोंधळ माजलेला होता तो मोडून टाकून नीट व्यवस्था लावण्याचा उद्योग त्यापूर्वी कोणींच केला नव्हता. जॉन्सन्नें या कोशाच्या आरंभीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत त्या वेळची प्रस्तुत भाषेची जी स्थिति होती तिचें स्वरूप चांगलें वर्णन केलें आहे. वर्णोच्चाराविषयीं भेद, शब्दाक्षरांच्या लेखनाविषयीं अनियम, वाक्याची रचना, व्याकरणभ्रष्ट भाषापद्धति, ग्राम्य

कोणती व अग्राह्य कोणती याचा बिलकूल विचार नाहीं, पाहिजे त्या ग्रंथकारानें मनास वाटतील ते परकी शब्द भाषेंत घुसडून द्यावे अशी अव्यवस्था एकंदर भाषेंत माजली होती. तेव्हां हा सर्व गोंधळ मोडून एकट्या मनुष्यानें तीस–चाळीस हजार शब्दांची वर्णव्यवस्था, उच्चार, अर्थ, वगैरे सर्व नीट बसवून देऊन चोहोंकडे व्यवस्था करून देण्याचा यत्न करणें म्हणजे केवढें अचाट साहस व केवढी जबरदस्त यातायात आहे! पण हीं सर्व या महापंडितानें आपल्या अंगावर घेऊन तो उद्योग कालेंकरून तडीस नेला. त्याच्या पूर्वसंकल्याप्रमाणें हें काम दोन तीन वर्षांत संपलें नाहींच, त्यास पुरीं सात–आठ वर्षें लागलीं. इतक्या काळांत त्यास दिलेली रक्कम पार खलास होऊन गेली. त्यास दोनदां दिवाणी तुरुंगांत कर्जदारानें नेऊन बसविलें. दोनदां त्याच्या मित्रानें त्यास नाझरच्या व शिपायाच्या हातून सोडविलें. सर्वांत मोठी दुःखाची गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, जीवर तो जीव कीं प्राण करीत असे, जिच्या सुखार्थ स्वतःला कितीही कष्ट पडले तरी त्यानें आनंदानें सोसावें, व प्रस्तुत अवाढव्य ग्रंथ संपला असतां त्यापासून उत्पन्न होणारी संपत्ति व कीर्ति यांचा उपभोग जिच्याबरोबर चिरकाल घेण्याचें त्याच्या मनांत होतें ती त्याची आवडती बायको मरण पावून तो पुनः सडाच्या सडाच राहिला!

वरील कोशाच्या संबंधानें एक मोठें प्रकरण झालें तेंही येथें सांगितलें पाहिजे. तें मागें सांगितलेला जो लॉर्ड चेस्टरफील्ड त्याच्यासंबंधाचें होय. चेस्टरफील्ड हा त्या वेळेस सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या हुद्यावर होता. त्याची विद्वत्तेविषयींही बरीच ख्याति असून त्या वेळच्या वक्त्यांत तर तो प्रमुखच होता. या बडया सरदाराची वरील कोशास अनुकूलता दिसल्यावरून जॉन्सनूनें पहिलें संकल्पपत्र त्यास उद्देशून लिहिलें. यावरून सदर्हु लॉर्ड साहेबांकडून जॉन्सन् यास बोलावणें आलें, तेव्हां तो त्याजकडे जाऊं लागून कांहीं दिवस दोघांची बरीच गोडीगुलाबी चालली. जॉन्सन् यास वाटलें कीं, आपल्या कृत्यास येवढा पुरस्कर्ता मिळाला हें फार चांगलें झालें; व चेस्टरफील्ड यासही वाटलें कीं येवढा मोठा ग्रंथ आपल्या आश्रयानें होणार हें आपल्या नांवास चिरकाल भूषणच झालें. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. दोघांचा लवकरच जो बेबनाव झाला तो शेवटपर्यंत तसाच राहिला.

## प्रकरण पहिलें

व वरील अर्ल साहेबांच्या मनांत आपल्या नांवाचा इंग्रजी भाषेच्या कोशाशीं ज्या प्रकारचा संबंध असावा असें होतें, त्यापेक्षां तो आतां फार निराळ्या तऱ्हेचा आहे. याचें कारण असें झालें कीं, अर्ल साहेब हे जन्मापासून सरदार मंडळींत व मोठमोठ्या लेडीसाहेबांच्या मेळ्यांत वागलेले असून रीतरिवाजांच्या टापटीपींत बारीक लक्ष पुरविणारे होते; व जॉन्सन् काय ! त्याचा काळ सगळा अगदीं नीच पदवीच्या लोकांच्या संगतींत गेला असल्यामुळें वरील नोकझोकांत तो पुरा अडाणी होता; व स्वभावानें आडदांड असल्यामुळें थोर लोकांपुढें जाणें तर मोठें भीत भीत जावें, त्यांच्याशीं बोलण्याचें तें मोठ्या अदबीनें व लवून बोलावें, वगैरे प्रकार तो बिलकूल जाणत नसे. मग अशा रानवट मनुष्याशीं गांठ पडली असतां वरील नाजुक साहेबांच्या अंगांत हींव भरत असेल यांत नवल काय ! त्यांनीं दोनतीनदां जॉन्सन् यास मुलाखत देऊन पुढें देवडीवाल्यास ताकीद देऊन ठेवली कीं, या मनुष्यानें विचारलें असतां स्वारी बाहेर गेली आहे म्हणून सांगत जा. हा मज्जावीचा प्रकार जॉन्सन्नें दोनतीनदां पाहून मनांत गांठ घातली कीं, पुनः म्हणून याच्या दाराशीं पाऊल घालावयाचें नाहीं. पुढ याही गोष्टीस सात आठ वर्षें लोटून गेलीं; व जॉन्सन्नें वर सांगितलेल्या अडचणींत, विपत्तींत व दुःखांत आरंभलेलें महत्कार्य तडीस नेऊन पोंचविलें. तें पाहून वरील लार्ड साहेबांस आशा सुटली कीं, हा तयार झालेला कोश आपणांस नजर होऊन आपलें नांव यावर यावें. या हेतूस्तव त्या वेळेस चालू असणाऱ्या 'वर्ल्ड' नामक पत्रांत त्यांनीं दोन निबंध लिहिले; व त्यांत जॉन्सन्च्या एकंदर विद्वत्तेची अतिशय तारीफ करून नुक्त्या प्रसिद्ध होणाऱ्या कोशाविषयीं तर भारीच गोड गोड मजकूर लिहिला होता. चेस्टरफील्डचा हें सर्व करण्याचा मतलब उघडच होता कीं, जॉन्सन्च्या मनांत आपल्याविषयीं जर अद्याप राग असेल तर तो वरील मधुर शब्दांनीं घालवावा; व पूर्वींच्या संकल्पाप्रमाणेंच सर्व घडून यावें पण तें कसचें होतें ? जॉन्सन् यास वरील मजकूर जेव्हां समजला तेव्हां त्याचा राग शांत न होतां उलटा अधिक प्रदीप्त मात्र झाला. पोराच्या हातावर खाऊ ठेवून जशी समजूत करावी तसा वरील खुशामतीचा प्रकार पाहून आपली मानहानि केलीशी मात्र त्यास वाटली; व तत्क्षणींच त्यानें त्यास असें खडखडीत पत्र लिहिलें कीं, त्यांतील प्रत्येक अक्षर वरील नाजूक लॉर्डसाहेबांच्या मर्मींच बोंचलें असेल.

याप्रमाणें प्रस्तुत कोशाच्या अर्पणाच्या संबंधानें येवढें प्रकरण माजलें; व सरतेशेवटीं त्याचा वरच्यासारखा शेवट झाला. जॉन्सन्नें कोणाचेंही साहाय्य न मागतां व कोणाचाही आश्रय न घेतां, फार तर काय पण घरीं चालत आलेला आश्रयही वरच्यासारखा धुडकावून लावून, आपला कोश संपविला, व वर कोणीही बड्या मनुष्याचें नांव न घालतां तसाच तो केवळ आपल्या नांवावर प्रसिद्ध केला. यावेळेस त्याच्या मित्रांनीं त्याजकरितां झटपट करून आक्सफर्ड युनिव्हर्सिटीकडून त्यास एम्. ए. हा किताब देवविला. त्यासकट सदरील ग्रंथावर त्याचें नांव प्रगट झालें. यापुढचा किताब एल. एल. डी. हा त्याच युनिव्हर्सिटीनें त्यास पुढें आपण होऊन पाठवून दिला.

येथवर या कोशाचा वृत्तांत काय झाला तो सांगितला, आतां खुद्द त्याविषयीं कांहीं माहिती वाचकांस देतों. हा कोश आतां प्रसिद्ध नाहीं हें बहुधा सर्वांस माहित असेलच. त्याची संक्षिप्त आवृत्ति जी जॉन्सन्नें लवकरच पुढें काढली ती मात्र अद्याप क्वचित् दृष्टीस पडते. त्या वेळेपासून आतांपर्यंत इंग्रजी भाषेचा विस्तार व फैलाव अतिशयित झाल्यामुळें, व त्या वेळेस माहितही नसणाऱ्या अनेक विषयांवर सहस्रावधि उत्तमोत्तम ग्रंथाचा तेव्हांपासून भाषेंत भर पडत चालल्यानें मागचे कोश उत्तरोत्तर निरुपयोगी होत चालले आहेत. सध्यां साऱ्या जगभर ज्याचा प्रचार आहे, असा कोश वेब्स्टरचा होय. आतां यापुढील सर्व इमारतीचा पाया म्हटला म्हणजे वरील प्रचंड ग्रंथच होय हें खरें आहे. मूळचा म्हणण्यासारखा कांहीं आधार नसतां एकट्यानें येवढ्या श्रमाचा व येवढ्या जोखमीचा उद्योग पत्करून कोणीही विद्वानाचें किंवा श्रीमान मनुष्याचें काडीइतकेंही साह्य न घेतां, दोन प्रहरची भ्रांत, संकटें व दुःखें, हीं संभाळून सात अठ वर्षांत तो सर्व तडीस नेला ही खरोखर मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे! आमच्या मराठी भाषेचे दोन कोश सुमारें चाळीस वर्षांपूर्वी जे तयार झाले त्यास सरकारचा केवढा आश्रय होता व किती पंडितांचें साहाय्य घ्यावें लागलें याचा विचार केला असतां, व फ्रेंच भाषेचा तद्देशीय विद्वानांनीं जो कोश तयार केला त्यावर सर्व विद्वन्मंडळ पन्नास वर्षें सारखें खपत होतें, हेंही मनांत आणलें असतां वरील पंडिताच्या साहसाचा व बुद्धिवैभवाचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं? तेव्हां कोशासारखें प्रचंड काम जॉन्सन्नें एकट्यानें हातीं घेऊन पार

पाडलें हीच अगोदर एक मोठी गोष्ट आहे. पण प्रस्तुत ग्रंथाचा मोठेपणा केवळ येवढ्यावरूनच नाहीं. भाषेचा कोश म्हटला म्हणजे त्यांत पुढील गोष्टी सर्व आल्या पाहिजेत. पहिल्यानें सर्व शब्दांचा समावेश, व पुढें त्यांचा उच्चार व लेखनपद्धति, नंतर त्यांची व्युत्पत्ति. हें एक प्रकरण झालें. पुढें प्रत्येक शब्दाचा सर्वांस समजेल अशा तऱ्हेचा बरोबर अर्थ आणि त्यानंतर मोठमोठ्या प्रसिद्ध ग्रंथांतून काढलेलीं उदाहरणें. आतां हे सर्व प्रकार प्रस्तुत कोशांत कितपतसे आहेत हें जर पाहिलें, तर असें आढळून येईल कीं, एका व्युत्पत्तीखेरीज बाकीचीं सर्व सदरें यांत जशीं असावीं तशीं आहेत. इंग्रजीसारखी भाषा—जी मुळीं अनेक भाषांच्या भेसळीनें झाली आहे, व जींत जगांतील बहुतेक भाषांतले शब्द आले आहेत तिच्या सर्व शब्दांची व्युत्पत्ति द्यावयाची म्हटली म्हणजे तो व्युत्पत्तिकार मोठाच भाषाभिज्ञ पाहिजे. हें अंग जॉन्सन्चें कमींच होतें. त्यास परकी भाषांपैकीं उत्कृष्ट अशी ल्याटिन हीच काय ती येत होती. व इंग्रजीची मूळ भाषा जी आंग्लो—सॅक्सन तिचेंही त्यास विशेष ज्ञान नव्हतें. यास्तव सांप्रत ग्रंथांत ही मात्र मोठी उणीव राहिली. पण याशिवाय बाकी सर्व भाग यथास्थित उतरले. शेवटचे दोन, म्हणजे शद्बांची व्याख्या व त्यांस प्रमाणभूत असे ग्रंथांतरींचे आधार, यांत तर या कोशाची पहिल्यापासून मोठी ख्याति आहे. जॉन्सनची बुद्धि मोठी सूक्ष्म असल्यामुळें त्यानें मोठमोठ्या कठीण शद्बांच्याही व्याख्या अगदीं समर्पक दिल्या आहेत; तशीच त्यास स्वभाषेंतील ग्रंथांची माहिती उत्कृष्ट असल्यामुळें वरील व्याख्यांच्याखालीं जीं अवतरणें दिलीं आहेत तींही मोठीं उत्कृष्ट निवडून काढलेलीं आहेत. तीं अशीं कीं, उगीच कोणी गमतीखातर जरी वरील ग्रंथ चाळीत बसले, तरी सुभाषितापासून जसें मनोरंजन होतें तसें ठिकठिकाणचे नुसते उतारे वाचल्यानेंही तें व्हावें. असो; तर इंग्रजी भाषेचें नियमन ज्या कोशानें प्रथमतः केलें तो वर सांगितल्याप्रकारें सिद्धीस जाऊन प्रस्तुत ग्रंथकाराच्या कीर्तिमंदिराचा तो जणूं काय मजबूत पायाच होऊन राहिला.

# प्रकरण दुसरें.

## जॉन्सनचें ग्रंथलेखन आणि आयुष्याचा उत्तरार्ध.

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या इंग्रजी भाषेच्या कोशाबरोबरच जॉन्सन्नें रँबलर व ऐडलर हे दोन निबंधसमुदाय लिहून तयार केले. त्यांतील विषय नेहमीं विद्येचे संबंधानें किंबहुना धर्मसंबंधानें सुद्धां असत.

जॉन्सन्चा यापुढचा ग्रंथ त्याची प्रसिद्ध कादंबरी रासेलस ही होय. या विषयीं मराठी वाचकांस विशेष माहिती सांगण्याची जरूर नाहीं. प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य गुण म्हटला म्हणजे वर्णन करण्याची शैली, व आयुष्यांतील निरनिराळ्या स्थितींचें जें यथार्थ व चित्तवेधक विवेचन केलें आहे तें होय. या एका गुणावरून रासेलसची प्रख्याती तें प्रसिद्ध होतांच चोहोंकडे एवढी झाली कीं, ज्या पुस्तकवाल्यांनीं तें विकत घेतलें त्यास त्याच्या विक्रीपासून पुष्कळ नफा झाला व जॉन्सन्च्या हयातींतच त्याचें भाषांतर युरोपांतील साऱ्या भाषांतून झालें.

इसवी सन १७६० त दुसरा जॉर्ज निवर्तून तिसरा जॉर्ज गादीवर आला. या राजाच्या प्रधानानें जॉन्सन् यास पेन्शन् ऊर्फ वर्षासन करून देण्याचें योजलें. जॉन्सन्ची वृत्ति अतिशय निस्पृह असे. तथापि यापूर्वीं तुम्ही मोठमोठे ग्रंथ रचून जें लोकहित केलें त्याबद्दल तुम्हांस हें बक्षीस आहे असें राजाकडून आलेल्या मनुष्यानें निक्षून सांगितल्यावर जॉन्सन्नें या बेतास रुकार दिला आणि हयातीपर्यंत सालीना ३५० पौंडांची रक्कम त्याच्या घरीं चालत येत होती. ही गोष्ट घडल्यापासून जॉन्सन्चा येथवरचा क्रम अगदीं पालटून गेला.

येथपासून पुढील वर्षें मोठमोठे विद्वान व नामांकित ग्रंथकारही त्याच्याशीं स्पर्धा करण्याचें टाकून देऊन त्याचें वक्तृत्व, शिष्यवर्गाप्रमाणें भक्तिपुरस्सर ऐकूं लागले.

या पुढचा त्याचा काळ प्रायः वाक्पांडित्य करण्यांत गेला. जॉन्सन्च्या नांवावर पुढें ६०–७० वर्षें चाललेला क्लब त्यानें याच वेळीं स्थापिला. त्यांत

त्या वेळचे मोठमोठे नामांकित पुरुष होते. ते बर्क, गिबन, गॅरिक, गोल्डस्मिथ, रेनोल्ड्स् , प्रख्यात वक्ता फॉक्स, प्रसिद्ध भाषाभिज्ञ सर जोन्स इत्यादि होत. ही मंडळी दर आठवड्याला एकत्र जमत असे. त्या वेळीं जेवण्याची तयारी केलेली असून जेवणाचें काम व संभाषण हीं एकदम सुरू होत.

या पंडितमंडळांत निरनिराळे विषय निघत; पण ते प्रायः इंग्रजी भाषेंतील नव्या जुन्या ग्रंथकारांविषयींचे असत. एखादा नवा ग्रंथ प्रसिद्ध झाला असतां त्यावर वरील सभेंत अवश्य चर्चा होई व तींत त्याच्या गुणावगुणांचाही निर्णय तेव्हांच होऊन तो साऱ्या लंडनभर लौकरच होई. तेणेंकरून नव्या ग्रंथाच्या साऱ्या प्रती लवकर खपून जाणें किंवा त्या वाण्याच्या दुकानीं जाऊन पडणें हा सोक्षमोक्ष होण्यास उशीर लागत नसे. असो.

तर जॉन्सन् ज्या क्लबचा अध्यक्ष होता तो क्लब अशा तऱ्हेचा होता. या क्लबांतील एकाचा वृत्तांत मात्र येथें विशेषतः देतों. हा सभासद जॉन्सन्चा प्रसिद्ध चरित्रकार बॉस्वेल् हा होय. त्याची जॉन्सन्शीं प्रथमतः जी ओळख झाली ती १७६३ सालीं झाली. त्या वेळेस त्याचें वय सारें २२ वर्षांचें होतें. तरी एवढ्या वयांतही त्यानें एवढें ज्ञान संपादन केलें होतें व त्यास विद्येची इतकी अभिरुचि होती कीं, जॉन्सन् हा बराच वयातीत झाला असतां व त्याचा स्वभाव तुसडा असतां दोघांचा पक्का स्नेह जमला.

बॉस्वेल् यास या महापंडिताचें वक्तृत्व सेवन करण्याची व प्रत्येक विषयावर त्याचीं काय काय मतें आहेत तीं समजून घेण्याची अतोनात इच्छा होती. इकडे जॉन्सन् यासही कोणी भाविक श्रोता मिळाला असतां चंद्र-समुद्र न्यायानें त्याच्या वाणीस मोठें भरतें येई. कोणी कसलाही वाद काढला तरी त्यावर तो इतक्या उत्तम तऱ्हेची चर्चा करी कीं, एक शब्दही इकडचा तिकडे न करितां त्याचें भाषण खुशाल छापावयास पाठवावें. सदरील चरित्रकाराचा पहिला मोठा गुण म्हणजे गुणाची पारख व चहा हा होय.

दुसरा गुण म्हणजे त्याची विलक्षण स्मरणशक्ति. बॉस्वेल् यानें पहिल्या पहिल्यानें जॉन्सन्च्या भाषणांचा नुसता सारांश दिला आहे. पण पुढें क्रमा-

क्रमानें प्रस्तुत महापंडिताची भाषणपद्धति जशी त्यास अत्यंत परिचित होऊन गेली व भाषणें उतरून ठेवण्याच्या कलेंत तो घटावत गेला तसतसें तो मोठमोठालीं भाषणेंसुद्धा क्रमवार यथास्थित लिहून ठेवूं लागला. वरील भाषणाविषयीं पहिल्यापासून अशी प्रसिद्धी आहे कीं त्यांत चरित्रकारानें आपण होऊन पदरचा एक शब्दही घातला नाहीं. बॉस्वेल्चा याहूनही एक मोठा गुण म्हणजे मनुष्यस्वभावाचें ज्ञान होय. जॉन्सन् व त्याचें मित्रमंडळ यांच्या स्वभावाची व गुणांची बॉस्वेल यांस इतकी पारख होती कीं, प्रत्येकाचें चित्र रेनॉल्डच्या तसबिरीं जसें अगदीं रेखलेलें उतरलेलें आहे त्याप्रमाणेंच त्याच्या मनाची तसबीर वरील चरित्रकारानें जणूं काय अगदीं हुबेहुब काढून दिली आहे. आजपर्यंत पुष्कळ अति विख्यात मनुष्यांचीं चरित्रें मोठमोठ्या नामांकित ग्रंथकर्त्यांनीं लिहिलीं आहेत पण हीं सर्व जॉन्सन्च्या चरित्रापुढें केवळ रद्द होत.

यापुढें प्रस्तुत चरित्रांतील विशेष सांगण्यासारख्या गोष्टी म्हटल्या म्हणजे जॉन्सन्ची एक मोठी मुशाफरी व त्यानें प्रसिद्ध केलेले चारपांच ग्रंथ हे होत. ही मुशाफरी तो व बॉस्वेल या दोघांनीं मिळून केली. लौकरच त्यानें आपल्या प्रवासाची हकीकत लिहून प्रसिद्ध केली. या ग्रंथाची अद्यापही बरीच ख्याति आहे. स्काटलंडांतील कांहीं दुराग्रही, असमंजस लोकांस मात्र तो अगदीं नापसंत होता. या पुढची प्रस्तुत ग्रंथकाराची कृति शेक्सपियरची नवीन आवृत्ति होय. प्रस्तुत काळाच्या पूर्वी सुमारें दहा वर्षे सदरील कवीच्या प्रीत्यर्थ उद्योग करण्याचें त्यानें सर्वांस जाहीर केलें होतें व त्याप्रमाणें पुष्कळ लोकांच्या वर्गण्याही त्याच्याकडे येऊन कित्येक वर्षे पडल्या होत्या. त्याच्या मित्रांनीं त्यास वारंवार सूचना कराव्या व त्यानेंही आपला आळस झाडून टाकण्याविषयीं वरचेवर मनोनिश्चय करावा, पण कांहीं नाहीं. सरतेशेवटीं तत्कालिन एका कवीनें त्यास खरमरीत मात्रेचा चटका जेव्हां दिला तेव्हां जॉन्सन् खाड्दिशीं जागा होऊन त्याची आलस्यनिद्रा पार निघून गेली. हा कवि चर्चिल होय. याच्या तडाक्यानें इतकें कार्य झालें कीं, नऊ वर्षे जें काम तसेंच पडलें होतें तें लागलेंच एका वर्षांत समाप्त झालें. आतां एक मात्र ग्रंथ सांगावयाचा राहिला.

हा जॉन्सन्च्या ग्रंथांतील शेवटलें व अत्युत्तम जें कवि-चरित्र तें होय. सन १७७७ सालीं लंडन शहरांतील चार्लीस मोठमोठाले पुस्तकवाले एके

ठिकाणीं जमून त्यांनीं विचार काढला कीं, आजपर्यंत नामांकित म्हणून जेवढे इंग्रजी कवि झाले त्यांच्या काव्यांची एक नवी आवृत्ति काढावी. हा आपला विचार त्यांनीं जॉन्सन् यांस कळविला. दोहो पक्षांचें संमत झाल्यावर प्रस्तुत ग्रंथकारानें त्या कामास हात घातला. या वेळेस त्याचें वय सुमारें ७० वर्षांचें होतें. तरी इतक्या वृद्धावस्थेंत त्याची स्मृति अशी धड होती कीं जागोजागचीं अवतरणें त्यानें पुस्तकावलोकन न करितां तशींच केवळ आठवणीवरून लिहिलीं. कोशरचनेसारखा प्रचंड उद्योग त्यानें एकट्यानें पार पाडला त्याप्रमाणेंच किंबहुना त्याहूनही सहज रीतीनें इंग्रजी कवींचे जीवनवृत्तांत व त्यांच्या काव्यांचें विवेचन हीं त्यानें उडवून दिलीं. याची भाषापद्धति त्याच्या इतर सर्व ग्रंथांहून साधी व सरळ आहे. प्रस्तुत ग्रंथ फार उत्कृष्ठ तऱ्हेचा उतरला. तेव्हांपासून अद्याप त्याची प्रसिद्धि निर्बाध चालत आली आहे.

वरील ग्रंथ सन १७८१ त संपूर्ण झाला. या पुढचा जॉन्सन्चा वृत्तांत दुःखमयच आहे. त्याच्या आयुष्याचीं यापुढें जीं तीन वर्षे उरलीं तीं मित्रांचें वियोगदुःख, वार्धक्य व क्लेश हीं सहन करण्यांतच बहुधा गेलीं. त्याच्या मित्रमंडळापैकीं गोल्डस्मिथ, गॅरिक व आणखी कांहीं जण याच सुमारास मरण पावले व आपल्या घरांत त्यानें कांहीं निराश्रित अशा स्नेही मंडळीस कित्येक वर्षे जागा देऊन त्यांचें संगोपन केलें होतें त्यापैकींही बहुतेक खपून त्याचें घर शुष्क होऊन गेलें. अशा स्थितींत प्रस्तुत पंडिताचे दिवस गेले. शेवटीं शेवटीं तो शरीरानें पुष्कळ स्थूल झाला होता. अर्थात स्थूलत्वाचें आनुषंगिक जें जलोदर त्यानें त्याचा शेवट केला. लंडनातले त्या वेळचे अत्यंत नामांकित असे चार वैद्य एक पैसा न घेतां त्यास उपचार करीत होते. पण त्यांच्या श्रमांना यश आलें नाहीं. शेवटीं सन १७८४ च्या अखेरीस जॉन्सन्चें देहावसान झालें. त्याचा अंत्यविधि प्रसिद्ध पुरुषांचे वेस्ट मिनिस्टर नांवाचे कबरस्थानांत झाला.

---

# प्रकरण तिसरें

——:o:——

जॉन्सन्च्या हयातीच्या अखेरपर्यंत झालेला वृत्तांत येथवर सगळा सांगितला; आतां त्याच्या स्वभावाचें एकंदर वर्णन करूं; म्हणजे तो कोणत्या तऱ्हेचा मनुष्य होता, त्याची चालचर्या कशी असे, त्याचे मनोधर्म कसकसे होते, वगैरेविषयीं सामान्यतः निरूपण करतों.

प्रथमतः शरीरवर्णन. यापूर्वी अनेक ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉन्सन् हा शरीरानें भला दांडगा होता. त्याचा बांधा ठेंगणाच पण चांगला खंबीर होता. ही शरीरसंपत्ति त्यानें आपल्या कमाईनें मिळविलेली म्हणजे तालीम, कसरत वगैरे करून संपादलेली होती असें नाहीं; तर कुल-परंपरेनेंच ती चालत आलेली होती. त्याचा बाप त्याच्यासारखाच वळकट होता व चुलता तर एका आखाड्याचा वस्ताद होता. जॉन्सन्ची शरीराची ठेवण पाहिली तर ती मोठी ढबदार होती असें नाहीं. पोट मोठें असून पुढील वयांत तर तें पुष्कळच सुटलें होतें; व पाय बांकदार असून ते एकंदर शरीराच्या अवजडपणामुळें चालतांना डळमळत. त्याचा चेहरा लहानपणीं वराच सुरेख होता, पण पुढें शस्त्रक्रियेचा प्रयोग त्यावर झाल्या-कारणानें व एका डोळ्याची दृष्टि अधू झाल्यामुळें तो पुढील वयांत विरूप दिसत असे. तरी त्याची मुखश्री जात्या भव्य असल्यामुळें विद्येच्या तेजानें व अंगच्या इभ्रतीमुळें तीस विशेष शोभा येई.

पोशाखाच्या टापटिपीकडे वगैरे जॉन्सन्चें बिलकूल लक्ष नसे. त्यास डामडौलाचा व नोकझोकाचा नेहमीं तिरस्कार वाटत असल्यामुळें लत्ताकपडा वगैरे जसा असेल तसा त्यास खपत असे. घरचा एरवींचा बेतबातहि त्याचा वरील तऱ्हेचाच होता. हल्लीं इंग्रज लोकांत सामानसुमान वगैरेंचा साऱ्या घरभर जसा थाट दृष्टीस पडतो तसें त्याचें नसून केवळ निर्वाहाच्या वस्तूंचें तो अगत्य बाळगीत असे. त्यास सरकारांतून जें नियमित वेतन

मिळत असे तें त्याच्यासारख्या एकट्या मनुष्यास जरी अगदीं रगाडीचें होतें, तरी रिकाम्या छानछोकींत किंवा ऐषआरामांत त्यानें कधीं त्याचा व्यय केला नाहीं. हा व्यय कशांत होत असे याविषयीं पूर्वीं थोडासा उल्लेख केलेला आहे, व तो पुढें विशेषतः करावयाचा आहे. तर याप्रमाणें जॉन्सन्चें वर्तन एकंदरींत पहातां पुरातन काळच्या तत्त्वज्ञांप्रमाणें असे. म्हणजे ते स्वभावतःच निरिच्छ असून जें यदृच्छेनें मिळेल त्यावर कालक्रमणा करून जसे नित्यसंतुष्ट असत तसा हा प्रस्तुत महापंडित असे.

## विक्षिप्तपणाचे प्रकार व जडलेल्या खोडी

जॉन्सन् हा स्वभावतःच स्वच्छंदी होता, व तो वयांत आल्यापासून तर एकटा स्वतंत्रतेनें राहून त्याच्या डोईवर कोणीही नव्हतें, यामुळें त्याचा स्वभाव तऱ्हेवाईक होऊन त्यास कित्येक विलक्षण संवयी व खोडी लागून राहिल्या होत्या. त्या सर्वांचा येथें उल्लेख करणें हें कित्येकांस कदाचित् बरोबर वाटणार नाहीं; कां कीं, मोठ्या मनुष्यांच्या बारीकसारीक गोष्टी प्रगट करणें बरोबर नाहीं, व त्यापासून कांहीं उपयोगही नाहीं असें कोणास वाटण्याचा संभव आहे. तसेंच, थोरांच्या चरित्रश्रवणापासून जो लाभ व्हावयाचा तो क्षुल्लक गोष्टींनीं नष्ट होऊन त्याजवरची पूज्यबुद्धि उडून जाते, असेंही सकृद्दर्शनीं वाटण्यासारखें आहे. पण या सर्व समजुती खोट्या आहेत. एक तर चरित्र म्हटलें म्हणजे त्यांत तद्विषयभूत संबंधाची साऱ्या प्रकारची माहिती आली पाहिजे. ज्या गोष्टींनीं त्याचा गौरव होतो त्यांचा उल्लेख जसा अवश्य होय, तसेंच जेणेंकरून त्यास हीनत्व येईल तेंही निःपक्षपातपणानें सांगणें जरूर आहे. शिवाय ज्याअर्थीं कोणीही मनुष्य सर्वगुणसंपन्न व सर्वदोषविवर्जित असा नाहीं, त्याअर्थीं कोणी केवढाही मोठा विख्यात असला तरी त्याच्या दोषनिरूपणानें त्याची वास्तविक कीर्ति यथार्थज्ञांच्या दृष्टीनें तरी कमी खास होणार नाहीं. तर हें ध्यानांत ठेवून प्रस्तुत ग्रंथकाराच्या संबंधाच्या ज्या गोष्टी यापुढें येणार त्या वाचकांनीं वाचाव्या.

मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉन्सन् यास एक चमत्कारिक मेंदूचा रोग जडला होता. हा त्याच्या कुळांत परंपरेनें चालत आलेला होता. त्याच्या योगानें त्याची वृत्ति नेहमीं उदासीन होत असे. कोणत्याही गोष्टीविषयीं

उल्हास न वाटून त्याचें चित्त इतकें उद्विग्न होत असे कीं, त्यास जिवाचा देखील कंटाळा येई. या मज्जारोगाच्या योगानेंच त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा त्रासिक झाला होता व त्यास भ्रमिष्टपणा जडला होता.

या त्याच्या भ्रमिष्टपणाचे अनेक प्रकार बॉसवेल्नें लिहून ठेवले आहेत, त्यांपैकीं कांहीं सांगतों. अर्धांगवायूनें पिडलेल्या मनुष्याचे शरीरावयव जसे आपोआप हालत असतात त्याप्रमाणें जॉन्सन्चें डोकें लटलटां कापत असे व हातपायांचे चाळे चालू असत. ही हालचाल त्याच्यानें बंद करवत नसे. भरमंडळींत कधीं कधीं देहभान न राहून कवितेचे चुटके मोठ्यानें म्हणावे, व एकटा असला म्हणजे, तर घटकाघटका आपणाशींच मोठ्यानें बोलत उभें रहावें. रस्त्यानें चालत असतां बाजूच्या खांबांस हात लावीत गेल्याखेरीज त्यास चैन पडूं नये व एखादा खांब चुकलासा जर त्यास वाटला तर त्यानें पुनः माघारी येऊन पुनः एकवार तो विधि यथासांग करावा. साहेब लोकांच्या जेवणांत टेबलावर फळफळावळही ठेवलेली असते. तियांपैकीं नारिंगावर जेव्हां वारी येई तेव्हां जॉन्सन्नें त्याचीं सोललेलीं सालपटें फेंकून न देतां मोठ्या तजविजीनें आपल्या आंगरख्याच्या खिशांत तीं सांठवून ठेवावीं. त्यांचा विनियोग पुढें काय होत असे तो समजण्यांत आला नाहीं.

वरील उदाहरणांवरून जॉन्सन्च्या भ्रमिष्टपणाची वाचकांस बरीच कल्पना होईल. जॉन्सन्लाही आपल्या व्यथेचा होतां होतां काय परिणाम होईल याचा नेहमी धाक असे. हा त्याचा रोग कधीं कधीं अतिशय बळावे व कधीं कधीं बहुतेक नाहासा झाल्यासारखा होई. जेव्हां तो प्रबळ होई तेव्हांची त्याची विपत्ति कांहीं पुसूं नये. इंद्रियज्ञानासही अशा वेळीं विकार पोंचे. त्याची आई घरीं कित्येक कोस दूर असतां ती आपणांस हांक मारीत आहे असें त्यास स्पष्ट ऐकूं यावें, रस्त्यांतील घड्याळापुढें घटका घटका उभें राहिलें असतांही किती वाजले याचा त्यास निश्चय करतां येऊं नये. पण या सर्वांहूनही दुःखाची गोष्ट ही कीं, ही भ्रमावस्था स्थायिक होऊन मुळींच आपला बुद्धिभ्रंश होईल कीं काय याची त्यास अतिशयित भीति वाटे; पण त्याच्या व एकंदर लोकांच्या भाग्यास्तव या कडेलोटावर केव्हांही गोष्ट येऊन ठेपली नाहीं.

वरील व्याधीपासून तिरसटपणा व आळस हे गुणही प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं बलवत्तर झाले. ते असे कीं, तो मूळचा निस्पृह व अभिमानी होताच; व वेळ आल्यास

कोणाचीही पर्वा ठेवीत नसे. त्यांतून वरील पीडा ज्याअर्थी त्यास बहुधा नेहमीं जडली असेच, त्याअर्थी व्यथित मनुष्याचें जसें होतें त्याप्रमाणें त्याचा मूळचा स्वभाव तिच्या योगानें दुणावला हें उघडच आहे. याशिवाय जॉन्सन्चें पूर्व वय हलक्या प्रतीच्या लोकांत गेलें असल्यामुळें बड्या मंडळींत जे सभ्यपणाचे प्रकार असतात—म्हणजे राग आला तरी तो कळूं न देणें, कोणीं अपमान केला असतां त्याचा प्रतिकार एकदम उघडपणें न करितां समय पाहून हांसत हांसत आपल्या प्रतिपक्षाचे दांत पाडणें—वगैरेही तो बिलकूल जाणत नसे. त्याचा जबाब नेहमीं ज्या वेळचा त्याच वेळेस रोकडा दिलेला असे. कधीं कधीं तर अत्यंत परिचित मित्रावरही तो संतापे, व त्यास टाकून बोले. बॉसवेल्च्या चरित्रभर जॉन्सन्च्या कडक तब्बेतीचीं उदाहरणें आहेत; व खुद्द दोघांचींही रुसणींफुगणीं अनेक वेळां झालीं आहेत. असो; वरील विकृतीचा दुसरा परिणाम जॉन्सन्चा सुस्तपणा होय. हा गुणही त्याच्या अंगीं जात्या असून तो वरच्याप्रमाणेंच वरील विकाराच्या योगानें दृढतर झाला. दुखणाईत मनुष्यास जसा कामाचा कंटाळा येतो, व स्वस्थ पडून रहावेंसें वाटतें, त्याप्रमाणें त्यास निरंतर होई. पण जवळ पैसा ना आडका, उपासमार पडण्याची पाळी; त्यामुळें निरुपायास्तव त्यास जागचें उठून निर्वाहाची कांहीं तरी तजवीज पहावी लागे. असे होतां होतां राजाकडून प्रस्तुत विख्यात ग्रंथकाराला जेव्हां एकदांचें पेन्शन झालें. तेव्हां त्याचा नित्याचा घोर नाहींसा होऊन त्याची स्वभाववृत्ति अत्यंत प्रबल झाली. मग काय! देवांनीं सकाळीं लवकर म्हणजे केव्हां निजून उठायचें? तर बारावर दोन वाजतां!! मग दोहोंच्या पुढें मुखमार्जनादि विधि व भोजन. रात्रीचा प्रकार याच मासल्याचा! एकदां जें बाहेर पडावें. तें फार फार सगळ्या रात्रभर रस्त्यांतून फिरत असावें; एखादा मित्र घरीं आला असला, तर ज्या गप्पा चालायच्या त्या रात्र उजाडे-पर्यंत; किंवा वाचण्याची अथवा लिहिण्याची लहर लागली तरी रात्रीची रात्र उलटून जावी!

## स्वभाव

जॉन्सन्च्या स्वभावास त्याच्या स्थितिविशेषाच्या योगानें जो तऱ्हेवाईकपणा जडला होता त्याचे कांहीं प्रकार वर सांगितले. त्यावरूनच केवळ पाहतां कोणा-

सही सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं, तो कोणी वेडगळ, छांदिष्ट व तुसडा असा मनुष्य होता. हीच समजूत जॉन्सन्च्या हयातींत पुष्कळ जणांची होती. त्याची अचाट बुद्धि सर्वांस कबूल करावी लागेच, पण वरील समजूत बहुधा सर्वांची दृढ होऊन गेली असल्यामुळें त्याच्या नेहमींच्या मित्रमंडळींखेरीज फारच थोडे त्यास चाहत असत. बॉसवेल्नें जें एवढें सविस्तर चरित्र लिहिलें, त्याचा मुख्य हेतु हाच होता कीं, आपल्या मित्राच्या व गुरूच्या स्वभावाविषयीं लोकांत ज्या विलक्षण समजुती पहिल्यापासून पसरून गेल्या आहेत त्या नाहींशा व्हाव्या. हा हेतु त्यानें कितपत सिद्धीस नेला आहे, याविषयीं त्याचा ग्रंथ वाचला असतां तेव्हांच खात्री होणार आहे. असो; आतां या स्वभावाविषयीं कांहीं निरूपण करून नंतर जॉन्सन्च्या बुद्धिगुणांविषयीं वगैरे लिहूं.

## दयाळुत्व

मनुष्यस्वभावाचें अवलोकन ज्यानीं उगीच वरवर केलें असेल त्यांच्याही लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहणार नाहीं कीं, मनुष्याचीं बाह्य व अंतर्गत स्वरूपें हीं पुष्कळदां अगदीं भिन्न भिन्न असतात; कांहीं मनुष्यें दिसावयास उग्र असून आंत फारच कोमल असतात व कांहीं बोलण्यांत मोठे मिठ्ठे असून त्यांची कृति अगदीं निराळी किंबहुना विपरीतही असते. जॉन्सन्चा प्रकार यापैकीं पहिला होता. त्याची मुद्रा व आचरण हीं इतकीं विलक्षण असत कीं, त्याच्या अत्यंत जिवलग मित्रांसही त्याशीं कमीजास्त बोलण्याचें भय वाटत असे. त्याची वृत्ति किती तापट असे व तो केवढा निःस्पृह वक्ता होता याविषयीं पूर्वीं जे अनेक उल्लेख केले आहेत त्यांवरून वरील गोष्टीची प्रचीति सहज येईल. पण असें असून त्याचें अंतःकरण किती कोंवळें होतें याचे दाखले त्याच्या चरित्रांतून शेंकडों आहेत. त्याची आपल्या आईबापांवर भक्ति, बायकोविषयीं प्रेम, मित्रांचे ठिकाणीं स्नेहपूर्वक निष्ठा, आश्रित व सेवक यांविषयीं आदर, प्राणिमात्रांविषयीं भूतदया वगैरेंचीं उदाहरणें दाखल केलीं असतां निराळाच ग्रंथ होईल; यास्तव वरील निरनिराळ्या वृत्तींचें केवळ संक्षेपतः येथें निरूपण करितों. जॉन्सन्चा बाप त्याच्या पूर्ववयांतच वारला. पण याची आई पुष्कळ वयातीत होऊन तो प्रौढ वयाचा झाल्यावर मरण पावली.

हें मागें कळविलेंच आहे. हिजविषयीं जॉन्सन्‌ची भक्ति किती होती हें मागील चरित्रावरून व विशेषतः रासेलस या ग्रंथाच्या रचनाप्रसंगावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. शिवाय त्याच्या ग्रंथांतही कोठें कोठें हीच वृत्ति प्रगट झालेली आढळते. आपल्या स्त्रीविषयीं तर जॉन्सन्‌चें इतकें प्रेम होतें कीं, तिच्या मरणानें त्यास अतोनात दुःख होऊन तें शेवटपर्यंत बुजून गेलें नाहीं. त्याला विवाहित स्थितीचा संस्कार काय तो सात आठ वर्षे घडला व पुढें तीसबत्तीस वर्षें त्यानें विधुरावस्थेंत घालविलीं. तरी त्याच्या अंतःकरणांत त्याच्या प्रिय स्त्रीची मूर्ति इतकी दृढ बसून गेली होती कीं, शेवटपर्यंत तिच्या स्मरणानें तो सद्गदित होत असे. तिचा मरणदिवस व्रताप्रमाणें पाळून तो त्या दिवशीं उपोषण करी. वारंवार तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे. मित्राचीही गोष्ट अशीच. ज्याचा त्याच्याशीं एकदां स्नेह जडला त्याजवरचें त्याचें प्रेम कधींही उतरलें नाहीं. हरएक तऱ्हेनें तो त्याच्या उपयोगीं पडत असे. संकटसमयीं त्याच्या साहाय्यार्थ धांवणें, त्यास सदुपदेश करणें, त्याच्या तर्फेनें शिफारशी लावणें, त्यास कोणीं नांव ठेवलें असतां त्याचा कैवार घेणें हा क्रम त्याचा सतत चाललेला असे. प्रसंगवशात् त्याचेपाशीं भांडणही होई. पण लवकरच पुनः दोघांचा समेट घडून येई. हा जॉन्सन्‌चा स्नेह परंपरासंबंधानें पुढेंही चालत असे. म्हणजे त्याच्या स्नेह्यांचा आप्तवर्ग, चाकरमाणसें यांजवरही त्याचा लोभ असे. मागील अंकाच्या शेवटीं सांगितलेला शिद्दी चाकर, ज्याच्या नांवानें जॉन्सन्‌नें शेवटीं मृत्युपत्र करून ठेवलें व आपला सर्व ऐवज ज्याच्या नांवें त्यानें करून दिला, तो अशा परंपरासंबंधाचाच होता. जॉन्सन्‌चा एक मित्र अमेरिकेंत पुष्कळ दिवस जाऊन राहिला होता. व तेथें असतां वरील शिद्दी चाकर त्यानें आपणापाशीं बाळगिला होता. पुढें स्वदेशास परत आल्यावर आपल्या मित्रास त्यानें तो चाकर नजर केला. त्यास या नव्या धन्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा देऊन त्याच्या विद्याभ्यासाकडेही तो लक्ष पुरवीत असे. याप्रमाणें आणखीही कित्येक मनुष्यांस जॉन्सन्‌नें आपल्या घरांत आश्रय दिला होता व सामान्यतः कोणीही दुःखित व दीन असा त्याच्या दृष्टीस पडला असतां त्याच्यावर तो दया करीत असे. सारांश, थोर पुरुषांस अत्यंत शोभा-

-दायक जें दयाशीलत्व, जें ख्रिस्ती धर्माचें अनुषंगि म्हणून त्याचा महिमा जिकडे तिकडे ऐकूं येतो, तें प्रस्तुत पंडिताचे ठायीं पूर्ण नांदत असे.

## मानित्व

वर जो गुण सांगितला त्याचें व मानित्वाचें सहचार्य हें कित्येकांस सकृद्दर्शनीं विचित्र वाटेल; पण पहिल्याप्रमाणेंच हा दुसरा गुण म्हणजे मानीपणा जॉन्सन् या ठायीं पूर्णपणें होता. मानी पुरुषाचें लक्षण हें आहे कीं, त्यास दुसऱ्यानें केलेली अवज्ञा व दुसऱ्यापुढें भाकायाचें दैन्य हीं दोन्ही लवमात्रही सहन होत नसतात. पहिल्याचा प्रतिकार केल्याखेरीज तो कधींही रहात नाहीं व दुसरा प्रसंग येण्यापेक्षां मरण बरें असें त्यास वाटत असतें. कोणी आपण होऊन त्यास कोणास नकळत देणगी दिलेली जर त्यास खपली नाहीं, व तिचा त्यानें इतका धिःकार केला, तर स्वतः याचना करण्याचें तर त्याच्या केवढें जिवावर येत असेल! बापाच्या मरणानंतर याच्या अंगावर जेव्हां संसार पडला व स्वतःची व आपल्या कुटुंबांतील माणसांची तजवीज करणें हें जेव्हां त्याच्याकडे आलें तेव्हां त्यानें जो निश्चय केला तो स्वतःच्या हिंमतीवर पैसा कमवायचा; दारिद्र्याच्या योगानें मन निरुत्साह व दुर्बल होऊन द्यावयाचें नाहीं व उदरनिर्वाहार्थ कोणतेंही दुराचरण करावयाचें नाहीं. अगदीं पूर्ववयांत जॉन्सन्नें वरील संकल्प दृढ करून ठेवला हेंच त्याच्या हिंमतीचें व सात्विकपणाचें अगोदर थोडें प्रमाण आहे असें नाहीं; व वरील स्वकृत मर्यादा त्यानें शेवटपर्यंत लवमात्रही उल्लंघिल्या नाहींत, यावरून त्याच्या अंगीं धैर्य कितपत वसत होतें व प्रस्तुत गुण जो अभिमान तो कसा जागृत होता हें सहज ध्यानांत येणारें आहे. वस्तुतः पहातां प्रस्तुत ग्रंथकारास शेवटपर्यंत लोकाधिकार तर कधींच नव्हता व पैशासंबंधानें पाहिलें तर निम्मेअधिक वय ददातांतच गेलें; तरी इतर सामान्य मनुष्य लोकावशेनें जसे खचून जातात तसा हा कधीं गेला नाहीं. त्याचा व लॉर्ड चेस्टरफील्ड याचा जो प्रसंग झाला तो पूर्वी सविस्तर सांगण्यांत आलाच आहे. व तसेंच थ्रेलबाईची वृत्ति दावरून तिच्या घरीं इतःपर आपला बोज राहणार नाहीं, हें समजतांच त्यानें तेथून आपलें बिऱ्हाड उचललें व अंतसमय जवळ येऊन ठेपला असतांही आपल्या ओसाडवाण्या घराची वाट धरली हेंही मागें

सांगण्यांत आलेंच आहे. याच वृत्तीचीं उदाहरणें त्याच्या चरित्रांत व इतर ग्रंथांतही पुष्कळ आहेत.

## सत्यप्रीति

जॉन्सन्चा दुसरा एक मोठा गुण म्हटला म्हणजे सत्यप्रीति हा होय. त्यास सत्य हें स्वभावतःच आवडत असे; व खोटें बोलणें, लफंगेपणा करणें याचा त्यास तसाच अतिशय तिटकरा वाटे. 'चित्ते वाचि क्रियायांच महतामेकरूपता' हें महाजनांचें लक्षण त्यावर पूर्ण लागू पडतें. त्याच्या अगदीं बारीकसारीक भाषणापर्यंतही त्याच्या अनेक चरित्रकारांनीं वृत्तांत लिहून ठेवला आहे. पण वरील वाक्यास जेणेंकरुन विरोध येईल असें त्या सर्वांत एक अक्षरही सांपडावयाचें नाहीं. जसें त्यास वाटे त्याप्रमाणेंच तो बोलून दाखवी व जें बोलून दाखवी त्याप्रमाणेंच त्याचें आचरण असे. हा तिन्ही प्रकारचा मेळ इतका पूर्ण असे कीं, त्याच्या योगानें जॉन्सन्चें आचरण व्यवहारदृष्ट्या दोषरूप सुद्धां होई, म्हणजे 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः' या वचनाप्रमाणें लोकांस कडू लागेल अशा प्रकारचें भाषण करण्याचीही त्यास पाळी येई. त्यास सभ्य लोकांची रीत मुळींच माहीत नसून त्याचें वर्तन उद्धट व दांडगेपणाचें असल्याविषयीं जो बोभाटा होता त्याचें कारण वरीलच होय. त्याचप्रमाणें त्याचे ग्रंथही पुष्कळांस अमान्य होऊन अद्यापही ते सर्वप्रिय झाले आहेत असें नाहीं. असो; सामान्यतः बोलण्याचालण्यांतही जॉन्सन्चें वरील गुणांकडे इतकें लक्ष असे कीं, तो जसा काय कोर्टांतील प्रतिज्ञा घेऊन शपथेवर जबानी देत आहे असें वाटे. असा त्याच्या एका मित्राचा लेख आहे.

## बुद्धिगुण

आतां प्रस्तुत ग्रंथकाराच्या बुद्धिगुणाविषयीं कांहीं लिहितों. म्हणजे तो येवढ्या विख्यातीस जो चढला तो कशामुळें, कोणत्या मानसिक शक्ति त्याच्या ठायीं अत्यंत प्रबल होत्या, याविषयीं निरूपण करावयाचें. मानसिक शक्तींत दोन मानसिक शक्ति प्रधानभूत आहेत. एक तर्क म्हणजे विवेचनशक्ति व दुसरी कल्पनाशक्ति. पहिलीच्या योगानें मनुष्यास सत्यासत्याचें विवेचन करतां येतें व वाद करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. दुसरीच्या योगानें अदृष्ट किंबहुना अवास्तव

पदार्थांचीही यथास्थित भावना मनोमय करतां येते व त्यामुळें यथावत् वर्णन करण्याची शक्ति प्राप्त होते. पहिल्या शक्तीचा उत्कर्ष तत्त्वज्ञान्याच्या ठायीं आढळतो व दुसरीचा कवीच्या ठायीं दिसून येतो. असो; आतां जॉन्सन्च्या ठायीं त्या कितपत वसत होत्या याविषयीं निरूपण करूं.

## कल्पनाशक्ति

प्रथमतः कल्पनाशक्ति. हिचें वास्तव्य प्रस्तुत पंडिताच्या ठायीं होतें हें त्याच्या काव्यावरून व त्यानें एक कादंबरी व एक नाटक रचलें यावरून सर्वांच्या लक्षांत येईलच. शिवाय त्याच्या ' चरित्रांत ' बॉसवेल्नें त्याच्या सुरस भाषणांचा जो संग्रह सर्वांस सादर केला आहे त्यावरूनही वरील कल्पकतागुण व्यक्त होतो. जॉन्सन् या ठायीं समयोचित भाषण करण्याची शक्ति कांहीं विलक्षण तऱ्हेची होती. त्यानें एकदां कोटिक्रम सुरू केला म्हणजे त्यावर कोणाचीही मात्रा चालत नसे; व यामुळेंच मोठमोठे पटाईत बोलणारे-सुद्धां त्याच्याशीं सामना करायला भीत. कोणी कसाही पूर्वपक्ष करून त्याशीं डौलानें वाद करायला लागला कीं त्यानें आपलें विनोदरूप शस्त्र उचलून त्याचें म्हणणें असें हास्यास्पद करून टाकावें कीं, त्यास आपण कोठून बोललों असें होऊन जावें. या भाषणचातुर्याचें बीज वरील कल्पकतागुणच होय. ज्यानें अनेक तऱ्हेचें ज्ञान प्राप्त करून घेऊन बहुश्रुतपणा चांगला संपादन केला आहे त्याच्यापाशींच कल्पकपणाचेंही साहित्य उत्कृष्ट असलें तर प्रतिपक्ष्यावर कोटी-वर कोटी लढवून त्यास वदांत जिंकण्याचें साधन त्यास उत्तम रीतीचें सांपडेल हें उघडच आहे. तर जॉन्सन्च्या कल्पकतेचीं हीं सर्व प्रमाणें होत. आतां हें खरें कीं, प्रस्तुत मानसिक शक्ति त्याच्या ठायीं जी होती ती विशेष सूक्ष्म व चलाख अशा तऱ्हेची नसून बोजड, अवजड अशा तऱ्हेचीच होती व यामुळेंच वरील काव्यादि ग्रंथांची आतां तादृश प्रसिद्धि नसून त्याचा विनोद-प्रकारही कांहींसा कृत्रिमतेचा दिसतो. गोल्डस्मिथ् वगैरे ग्रंथकारांचे ठायीं तो जशा तऱ्हेचा आढळतो तसा जॉन्सन्च्या ग्रंथांत किंवा भाषणांत आढळत नाहीं. त्याप्रमाणेंच संगीत, नाट्य, चित्रविद्या, कविता यांचेंही मर्मज्ञान त्यास जें नसे त्याचें तरी कारण वरीलच होय.

## तर्कशक्ति

दुसरी तर्कशक्ति. ही वरच्याहून जॉन्सन्च्या ठायीं अधिक प्रखर होती. त्याची बुद्धि जात्याच परम सूक्ष्म असून तिची पहिल्यापासून तत्त्वशोधाकडे सतत प्रवृत्ति झाली असल्यामुळें सत्यासत्यविवेचनाविषयीं तीस अत्यंत पटुत्व प्राप्त झालें होतें. तें इतकें कीं, त्याशीं कोणी वाद करूं लागला असतां त्यांत किंचित्ही लटपट केलेली तो तेव्हांच हुडकून काढी. अप्रमाण भाषण किंवा पोकळ कोटी हीं त्याच्यापुढें पळभरही टिकत नसत. सराफ ज्याप्रमाणें रुपये पारखतांना खोटा रुपया चट्दिशीं फेंकून देतात त्याप्रमाणें कोणी किती हिकमतीनें खोटें प्रमाण लेखांत किंवा भाषणांत घुसडून दिलें असतां तें तो तेव्हांच हुडकून काढी. बॉस्वेल्चा ग्रंथ ज्या कोणीं समग्र वाचला असेल त्यांची वरील गोष्टीविषयीं खात्री होऊन गेली असेल. त्यांत किती शेंकडों तऱ्हेचे वाद प्रसंगानुसार निघालेले आहेत. पण तितक्यांवर जॉन्सन्नें पांडित्य करून आपली कल्पनाशक्ति व तर्कशक्ति ह्या लढवून दिल्या आहेत. बॉसवेल्सारखा पृच्छक आणि जॉन्सन्सारखा वक्ता, मग विषयवैचित्र्यास काय कमी? बॉसवेल् वर्षांतून एकदोनदां आपल्या देशाहून लंडनास जो येई त्याचा मुख्य उद्देश जॉन्सन्चें भाषण ऐकावें हा असे. अशा प्रसंगीं जेवढा वेळ त्यास जॉन्सन्च्या समागमांत घालवावयास सांपडे तेवढा तो घालवी. व तितक्या वेळांत जितक्या विषयांवर भाषणाचा ओघ आणवेल तितका आणण्याचा त्याचा प्रयत्न चाललेला असे. यामुळें असें झालें आहे कीं, नानाप्रकारचे विषय—म्हणजे काव्य, शास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म, लोकव्यवहार, राज्यतंत्र किंबहुना सामान्य संसारांतील गोष्टी ह्यांविषयींही जॉन्सन्सारख्या पंडिताचे अत्यंत हृद्गत विचार प्रगट झालेले आहेत. आणि त्यामुळें प्रकृत ग्रंथ हा नुसता चरित्ररूप आहे असें नाहीं तर नानाविध ज्ञानाचें व मनोरंजनाचें जणुं काय भांडारच बनला आहे. जॉन्सन्नें वर्षांचीं वर्षें खपून अनेक मोठमोठे ग्रंथ रचले पण यांत त्याच्या बुद्धीचें ऐश्वर्य जसें प्रगट झालें आहे तसें त्या सर्वांत मिळूनही झालें नाहीं. हा ग्रंथ महामूर्ख जो बॉसवेल् याच्या हातून निर्माण जर न होता तर जॉन्सन्च्या स्वभावाचें यथार्थ ज्ञान नष्ट होऊन त्याच्याविषयीं अनेक कुकल्पना सर्वांच्या मनांत भरून राहत्या. हें तर एक

झालेंच असतें पण याहून मोठी गोष्ट ही कीं, शेक्सपीअरप्रभृति ग्रंथकारांचें वाक्चातुर्य जसें कीर्तिविशेषमात्र राहिलें आहे त्याचप्रमाणें जॉन्सन्चीही अवस्था झाली असती. पन्नास वर्षांच्या सांठवणीचें ज्ञान आपल्या आयुष्याच्या शेवटच्या पंचविशींत तो जें सतत ओतीत असे तें प्रस्तुत चरित्रकारासारख्या सत्पात्राशिवाय केव्हांच जिरून मुरून जाऊन पार झालें असतें. असो. तर बॉसवेल्च्या ग्रंथांत प्रस्तुत पंडिताची प्रखर तर्कशक्ति उत्तम रीतीनें प्रकट झालेली आहे. आतां हें खरें कीं, जॉन्सन् जसा मोठा वावदूक होता तसाच कांहींसा आग्रही व गर्विष्ठही होता. याचमुळें त्याचीं भाषणें वरील ग्रंथांत जीं आलीं आहेत तीं सर्वच युक्तीस सर्वथा अनुसरून आहेत असें नाहीं.कधीं कधीं तो वादविवादाच्या भरांत अप्रमाण गोष्टीही बोलून जाई व आपला पक्ष खोटा आहे असें आंतून पक्कें जाणत असतांही तो खरासा भासवून देण्याचा यत्न करी. त्याप्रमाणेंच आपली बाजु घसरते आहे असें त्यास एकादे वेळेस वाटूं लागलें असतां उगाच वितंडवादांत शिरून प्रतिपक्षावर प्रखर भाषणांचा उपयोग करणें, किंबहुना 'शेपं कोपेन पूरयेत्' ही दयानंदी युक्ति लढविणें यांतही तो वेळेनुसार मागें घेत नसे. याखेरीज राष्ट्रविशेषाविषयीं, व्यक्ति-विशेषाविषयीं वगैरे त्याचे कित्येक ग्रह पूर्ववयापासून किंबहुना अगदीं बाळ-पणापासून दृढ होऊन गेलेले होते, त्यांचें पटलही प्रसंगविशेषीं त्याच्या बुद्धि-चक्षूंवर येऊन तें प्रकृत विषयाचें यथावत् भान त्यास होऊं देत नसे.

## उपसंहार

येथवर प्रस्तुत चरित्रांतील नायकाचें सामान्यतः अनेक प्रकारांनीं वर्णन केलें त्यावरून त्याच्याविषयीं एकंदरीनें वरील कल्पना करतां येईल असें वाटतें. जॉन्स-न्चीं धर्मासंबंधीं व राज्यप्रकरणीं कशीं मतें होतीं हें सांगतों. हीं येथें देण्याचें कारण असें आहे कीं,हें सदर सर्व देशांतील विख्यात पुरुषांच्या चरित्रांत आढळ-णारें नव्हे. उदाहरणार्थ, आपल्या देशांतील एखाद्या प्राचीन किंवा अर्वाचीन पुरुषाचें चरित्र जर कोणीं लिहिलें तर त्यांत वरील दोन संबंधांचा उल्लेख कर-ण्याचा बिलकूल प्रसंग येणार नाहीं. उघडच आहे कीं, कालिदास व्हिग (लोकपक्षीय) होता कीं टोरी (राजपक्षीय) होता असें कोणी तरी विचारील काय? अथवा नाना फडणविसाचीं धर्मसंबंधीं काय मतें

होतीं असें जर कोणीं विचारलें तर त्याचें काय उत्तर देतां येईल? अर्थात् वरील दोन्ही प्रश्न केवळ निरर्थक होत. पण युरोपांत व विशेषतः इंग्लंडांत तसें नाहीं. अलीकडे दोनतीन शतकें तिकडे धर्म व राज्यव्यवस्था या विषयांवर बहुधा सर्व लोकांत सतत चर्चा चालू आहे. यामुळें सर्व विख्यात पुरुषांच्या चरित्रांत वरील दोहोंसंबंधाचा उल्लेख अवश्य असतो. अलीकडे तर सर्व मनुष्यांस आपलीं हरएक विषयावरील मतें मोकळेपणानें प्रसिद्ध करण्यास बिलकूल अटकाव राहिला नसल्यामुळें मूर्ति तितक्या प्रकृति या म्हणीप्रमाणें मनुष्यें तितकीं मतें असेंच झाल्यासारखें आहे. युरोपांत बाह्यतः जरी ख्रिस्ती धर्माचा सर्वत्र प्रचार आहे, तरी वस्तुतः पाहतां प्रत्येकाचा धर्म निरनिराळा म्हणजे ज्यास जसें वाटेल तसें तो धर्माचरण करितो अशी आंतील स्थिति आहे. कोणी जे भाविक शुद्ध मार्गाचे आहेत ते पवित्र शास्त्रास शिरसावंद्य मानून पाखांड्याच्या वाऱ्यास सुद्धां उभें रहावयाचें नाहीं अशा प्रकारचे पक्के ख्रिस्ती आहेत. कोणी केवळ ख्रिस्ती तर नाहींत, कारण त्यांस त्यांच्या शास्त्रांतील व्यंगें सर्व ढळढळीत दिसतात; पण आपल्या पूर्वजांच्या धर्मावर उघडणें आक्षेप घेणें त्यांस आवडत नाहीं. कोणी रंगेल जे आहेत ते सब झूट है म्हणून सर्वच धुडकावून देतात. त्यांच्या मतें सारे धर्म खरे व सारेही खोटे! कित्येकांस अलीकडच्यांस तर धर्म कसा तो यावज्जन्म मुळीं माहीतच झाला नाहीं. जन्मास आले तसे कोरेचे कोरे ते जगांतून बाहेर पडले. याहून शेवटल्या कोटीचे लोक म्हणजे नास्तिक. ते मुळीं ईश्वरालाच गुंडाळून ठेवतात! हें एक प्रकरण झालें. दुसरें राज्यप्रकरण. यावरही वरच्यासारखेंच मतवैचित्र्य आहे. कोणी टोरी म्हणजे राजपक्षाचे आहेत. त्यांचें मत असें आहे कीं, राजा हा ईश्वरांश, ईश्वरानेंच मनुष्यावर त्यास नेमून ठेविलें आहे. यास्तव त्याचा आज्ञाभंग करणें हें पाप होय. दुसरे जे वरच्यांचे प्रतिपक्षी आहेत त्यांस व्हिग म्हणजे लोकपक्षाचे असें म्हणतात. त्यांच्या मतें राजा हा केवळ नेमलेला अधिकारी आहे. यास्तव प्रजा धनी व राजा तिचा चाकर. तिसरे आहेत ते प्राचीन रोमन लोकांप्रमाणें राजा या नांवाचाही तिटकारा करून लोकसत्ताक राज्य चांगलें असें प्रतिपादन करतात. चौथे तर वरच्या नास्तिकाप्रमाणें सगळें राज्यतंत्र गुंडाळून टाकून सार्वस्विक सांप्रदाय असावा म्हणून भांडतात.

सार्वस्विक सांप्रदाय म्हणजे साऱ्या राष्ट्रानें आपापल्या परीनें उद्योग करून मधमाशांप्रमाणें सार्वजनिक कोठार करावें आणि त्यांतून ज्यास जें पाहिजे तें त्यानें आपल्या विनियोगार्थ घ्यावें. या प्रकारास इंग्रजींत 'कम्युनिझम' म्हणतात. असो; तर युरोपांत हल्लीं वरील दोन विषयांच्या संबंधानें इतक्या तऱ्हा आहेत. यांपैकीं जॉन्सन् यानें पहिल्या दोन उचलल्या होत्या. म्हणजे तो पक्का ख्रिस्ती व पक्का टोरी असा होता. त्याचीं आईबापें मोठीं सात्विक होतीं व बाप तर इंग्लंडच्या धर्माचा पुरा अनुयायी असून स्टुअर्ट घराण्याचा मोठा कैवारी होता. तींच मतें लहानपणीं साम्युअलच्या मनांत पक्केपणीं बिंबून जाऊन वयाच्या मानानें उत्तरोत्तर वळावत गेलीं. इंग्लंडच्या धर्माचा तो इतका अभिमानी झाला कीं, बॉस्वेलबरोबर तो स्कॉटलंडांत जेव्हां गेला तेव्हां तेथील देवळांत त्यानें पाऊलही ठेविलें नाहीं. त्याप्रमाणेंच ह्यूम एवढा इतिहासकार व त्याच्या परिचयाविषयीं उत्सुक! पण त्यानें त्याचें कधीं मुखावलोकन केलें नाहीं. राज्यप्रकारणींही त्याचा हेका वरच्यासारखाच होता. त्यांत एवढा मात्र फरक झाला कीं, मुद्राराक्षसांतील अमात्य राक्षसाप्रमाणें त्याची राज्यभक्ति स्थलांतर पावली. पूर्वीं स्टुअर्ट घराण्याचा पक्ष घेऊन हनोव्हरच्या घराण्यास जसा तो शिव्या देत असे, त्याचप्रमाणें पुढें हें दुसरें राजकुल जसें दीर्घकाल प्रतिष्ठापित झालें तशी त्यावरही त्याची भक्ति बसली. असें होण्यास तिसऱ्या जॉर्ज राजाचें गादीवर येणें व त्यांतून यानें जॉनसन् यास वर्षासन करून देऊन एके प्रसंगीं तर स्वतः होऊन त्यास मुलाखत दिली, हें कारण होय, हें उघडच आहे. मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, तिसऱ्या जॉर्ज राजाच्या वेळीं पुष्कळ दंगाधोपा चालला होता; तर यावेळीं जॉन्सन्नें राजकीय पक्षास आपल्या लेखणीनें बरीच मदत केली. या राजकारणी लेखांविषयीं मागें यथास्थित लिहिलेंच आहे.

येथवर खुद्द चरित्राचा भाग संपूर्ण झाला. आतां आरंभीं संकल्पांत सुचविल्याप्रमाणें एक सदर मात्र शिल्लक राहिलें आहे.

---

# प्रकरण चवथें.

## सतत उद्योग

प्रस्तुत चरित्राच्या साग्र अवलोकनापासून पहिली मोठी गोष्ट ही लक्षांत येतें कीं, जॉन्सन् हा नुसता पुस्तकवाल्याचा मुलगा असून पुढें जो एवढ्या अप्रतिम योग्यतेस चढला तें त्याच्या विशाळ बुद्धीचें फळ तर आहेच, पण बुद्धीपेक्षां निश्चयाचें बळ वरील उन्नतीस विशेष कारण झालें असें म्हटलें पाहिजे. हें बळ ज्यास अनुकूल नाहीं तो केवढाही अचाट बुद्धीचा असला तरी ती बुद्धि त्यास कांहीं कामास पडावयाची नाहीं. वाऱ्यावांचून अग्नि जसा निर्बल त्याप्रमाणेंच मोठी जाज्वल्य बुद्धिही दृढनिश्चयावांचून पंगू होय. जें काम हातीं धरलें ते शेवटास न्यावयाचेंच अशा अटीनें जो त्यास प्रवृत्त होईल, त्याच्याच हातून तें सिद्धीस जाईल व अशाच निश्चयाचा मनुष्य विख्यातीस चढेल. जॉन्सन्नेंच कोठें म्हटलें आहे कीं, मोठमोठीं कामें जीं उठतात, तीं केवळ बुद्धिसामर्थ्यावर उठत नसतात, तर सतत उद्योग व निर्धार यांच्या बळावर उठतात. त्याचीच गोष्ट पहा बरें कीं, इंग्लिशसारख्या परिपक्वतेस येऊन पोंचलेल्या भाषेचा कोश पहिल्याप्रथम आणि पुनः एकट्यानेंच करावयाचा म्हणजे केवढें साहसाचें व केवढ्या अचाट श्रमाचें काम! सदरहू पुस्तक साद्यंत वाचावयाचें किंवा लिहून काढावयाचें येवढेंच काम कोणाच्या माथीं मारलें समजा, तर त्यास आपल्या डोक्यावर केवढा बोजा ठेवलासा वाटेल बरें! त्याची छाती अगदीं दडपून जाऊन हें कोठून लचांड गळयांस पडलें असें त्यास वाटेल यांत संशय नाहीं. मग जी अवाढव्य इमारत नुसती डोळ्यांनीं पाहणें किंवा आयता मालमसाला असतां पुनः रचणें हें येवढें दुर्घट काम वाटतें, ती स्वतः खाणींतून दगड काढून झाडें तोडून चुना कमावून पायापासून उभी करणें म्हणजे केवढा पर्वतप्राय उद्योग आहे! पण तोही प्रस्तुत प्रचंड पंडितानें सहज लीलेनें शेवटास नेला; व मध्यें अनेक प्रकारचीं विघ्नें व संकटें आलीं तरी तीं जुमानलीं नाहींत. हें तर काय, पण जॉन्सन्चें बुद्धिवैभव येवढें अपार होतें व तो एकदां अंग मोडून बसला म्हणजे काम सपासप उडविण्याची

त्याची अशी विलक्षण हतोटी होती कीं, ज्या कोशरचनेच्या कामाखालीं कोणी सामान्य मनुष्य चिरडून जाऊन डोकें वर उचलण्याचेंही त्यास सामर्थ्य रहातेंना त्याच्याच ऐन गर्दींत त्यानें एक काव्य रचलें, एक नाटक संपूर्ण केलें व त्याच्या ग्रंथांपैकीं उत्तम मानिलेला जो 'रँबलर' त्याचे दोनशें आठ अंक लिहिले. बरें इतकेंही करून स्वारी पुनः थकली काय? नाहीं; थकून करते काय? कोश संपून वर्गणीदारांच्या हातीं तो समग्र जाऊन पडला व साऱ्या राष्ट्राच्या अभिमानास व हर्षास कारण झाला; पण कोशकारांची अवस्था काय? इंग्लिशभाषारूप समुद्राचें जरी त्यांनी समंततः पर्यटण केलें तरी पर्यटण करणारा जसा निघालेल्या जागीं येऊन पुनः लागतो त्याप्रमाणें ते नेमकेच पूर्वस्थितीशीं येऊन भिडले; म्हणजे पुनः 'बाबूके भाई दरवेशी' ही अवस्था कांहीं चुकली नाहीं! येवढा इकडचा डोंगर इकडे केला, पण पुनः हातातोंडाशीं गांठ आहे ती आहेच. वरील प्रचंड उद्योग संपतांच पुर्ववत् अल्पस्वल्प उद्योग करून दोनप्रहरची वेळ टाळावी हा त्याचा क्रम लागलीच सुरू झाला. असो; तर अशा विपत्तींतही सदर्हु ग्रंथकारानें इतके मोठमोठाले ग्रंथ रचले, व आपलें सर्व आयुष्य विद्यासंपादनांत व विद्याप्रसार करण्यांत खर्चिलें, हें मोठें विलक्षण नव्हे काय? तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनीं व विशेषतः आमच्या नवीन विद्वानांनीं सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा. हें नवीन मंडळीस विशेषेंकरून सांगण्याचें प्रयोजन असें आहे कीं, जॉन्सन्नें आपल्या देशबंधूंची जी सेवा केली ती करण्याचें सामर्थ्य व तिचा सारा बोजा त्यांच्याच डोक्यावर आहे. आणि सामान्यतः पाहतां ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याकडे आहे. व ती वहिवाटण्यास वरील गुणाची तर अत्यंत आवश्यकता आहे. यास्तव त्यांनीच त्याच्या संपादनार्थ झटलें पाहिजे. आजपर्यंत त्यांचा क्रम जो चालत आला आहे कीं, सरकारच्या मेहेरबानीनें व देशाच्या खर्चानें जी विद्या त्यास दिली जाते तिचें वास्तविक चीज करण्याचें कधीं स्वप्नांतही न येऊन, गप्पाटप्पा, ख्यालीखुशाली वगैरेंतच बहुधा कालक्रमणा करायची. ज्या गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या आहेत त्यांविषयीं काडीइतकाही प्रयत्न न करितां नवे धर्म स्थापणें, जुने अनादिसिद्ध चालत आलेले प्रचार मोडून टाकून कोणीं कधीं न ऐकलेले असे नवे बखेडे सुरू करणें, अशासारख्या रिकाम्या उठाठेवी करीत बसावयाचें; सुधारणा करण्याच्या मिषानें परकी लोकांचे

निंद्य आचार प्रचारांत आणूं पहायाचें; व ज्यांस सज्ञान करण्याकरितां सरकारनें त्यास रानटी स्थितींतून काढून सुशिक्षित केलें त्यांस स्वतः तर ज्ञानाचा लेशही पोंचविण्याची तजवीज न करितां उलटा त्यांचा उपहास मात्र करून फुकाची फुशारकी मिरवायची, व आपले हात आज गगनाला लागलेले आहेत तेच आपण कांहीं कालापूर्वी काय होतों याचें बिलकूल स्मरण ठेवायाचें नाहीं. हा सर्व प्रकार अगदीं बदलून गेला पाहिजे. इंग्रजासारख्या परम ज्ञानसंपन्न राष्ट्राशीं सुदैवेंकरून एतद्देशीयांचा जो योग झाला आहे त्याचें जर साफल्य व्हावयाचें असेल, व स्वातंत्र्यनाशरूप जी या देशाची महाहानी झाली आहे तिची जर भरपाई व्हावयाची असेल तर लोकसुधारणेचे खांव म्हणविणारांनीं सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें वर्तन ठेवलें पाहिजे. हल्लीं जी त्यास पोकळ धमेंडी वाटते, कीं युनिव्हर्सिटींतून आपण पार पडलों कीं ज्ञानाची अत्यंत सीमा आपण गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली पाहिजे. विद्यालयांतील सर्व संस्कार होऊन बाहेर पडलेला मनुष्य खरोखर पहातां पांख फुटून घरट्याबाहेर पडलेल्या पांखरांच्या बच्चासारखा होय. म्हणजे त्यास त्याचीं आईबापें ज्याप्रमाणें पोसून उडायाजोग्या स्थितीपर्यंत आणून पोंचवितात, त्याप्रमाणेंच आमचे विद्यालयीन पंडितही तीन चार वर्षांच्या शिक्षणाच्या योगानें सामान्यतः कोणत्याही विषयांत स्वतःच्या परिश्रमानें प्रवेश होईल इतक्या प्रगल्भतेला येऊन पोंचलेले असतात, इतकेंच काय तें. मगही ज्यांची स्थिति त्यांनीं ज्ञानसमुद्राचें पैलतीर गांठलें कीं ते अलीकडच्याच तीरावर आहेत हें कोणासही समजेल. पांख फुटलेल्या पक्षास आकाशक्रमण जसें पुढें करावयाचें असतें त्याप्रमाणेंच विद्यालयाच्या बंधांतून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नव्या नाविकाप्रमाणें नुकता तयार झालेला असतो. तर ही वास्तविक स्थिति मनांत आणून आमच्या होतकरू लोकांनी अल्पविद्येंत संतोष न मानतां व वृथागर्वानें फुगून न जातां जॉन्सनची ज्ञानप्राप्तिविषयीं जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वतः मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असतांही शेवटपर्यंत त्याचें अध्ययन जसें सुटलें नाहीं, तसाच त्यांनीं क्रम ठेवला पाहिजे. त्याप्रमाणेंच परीक्षांच्या तडाक्यातून सुटून आपला चरितार्थ व्हावयाला लागला म्हणजे कृतकृत्य झालों, व इतःपर कोणतीही कर्तव्यता उरली नाहीं, ही कोती समजूत वरील मंडळीनें

सोडून दिली पाहिजे. वर विद्येच्या संबंधानें जसे सांगितलें कीं, जें तीर त्यास पलीकडचें वाटतें तें वस्तुतः पहातां अलीकडचें आहे; त्याप्रमाणेंच जेथें कर्तव्यतेची त्यांच्या बुद्धीनें समाप्ति झाली तेथेंच खरोखरी पाहिलें असतां तिचा नुसता आरंभ आहे असें समजावें. उघडच आहे कीं, शिपायास कवाइतींत तयार करून त्यास जाम्यानिम्यानिशीं बाहेर पाठवून दिला, म्हणजे त्याच्या कामाची सुरुवात झाली म्हणायची का अखेर झाली म्हणून समजायची ? कवाइतीची अखेर झाली खरी; पण ती होऊन पुरा शिपाई तयार होतांच खऱ्या कामाची सुरवात झाली असे समजायचें. तर याप्रमाणें विद्यालयांतील सर्व अध्ययन पुरें होऊन त्यांचा शेवटला सोहळा झाला व इलाखाधिपतींचा गुरुमंत्र ज्यांच्या कानीं पडला, त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवसापासून आपल्या खऱ्या बुकांस एकदम रजा देऊन टाकावी व शिकंदर बादशहा ज्याप्रमाणें सारें जग जिंकून बाबिलोन शहरीं स्वस्थ येऊन पडला, व जें जें मनास वाटेल तें तें पार करून आपल्या परम देदीप्यमान कीर्तीस डाग लावून घेऊं लागला, त्याप्रमाणेंच आमच्या नव्या मंडळींपैकीं बहुतेकांचा प्रकार आढळून यावा ही केवढी दिलगिरीची गोष्ट आहे ! जॉन्सन्सारख्यांचा कित्ता घेऊन वरील मंडळीनें थोडाबहुत जरी आजपर्यंत उद्योग केला असता तरी त्यांच्या विद्वत्तेचें किती चीज झालें असतें व लोकांस किती उपयोग घडता ! युनिव्हर्सिटी स्थापन होऊन आज वीस वर्षे झालीं, व त्यापूर्वींही कित्येक वर्षांपासून इकडे इंग्रजी विद्येचा प्रचार सुरू झाला होता; मग इतक्या वीस तीस वर्षांत लोकसुधारणेला किती साह्य झालें असतें ! तरुण जनांस वाचण्यालायक अशीं नानाप्रकारचीं मनोरंजक पुस्तकें; बहुश्रुत लोकांच्या उपयोगी पडण्यासारखे तऱ्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ; विद्यार्थ्यांस इष्ट असे देशोदेशींचे संक्षिप्त इतिहास; निरनिराळ्या शास्त्रांवर सुबोध ग्रंथ; त्याप्रमाणेंच या देशांतील जुनी कविता व जुना इतिहास यांचा संग्रह-कीं जो होण्याची सोय दिवसानुदिवस कमी होत चालली आहे; तसेंच साऱ्या भारतवर्षीयांच्या किंबहुना साऱ्या जगाच्या प्रीतीचें व पूज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा तींत काय काय ज्ञानभांडार आहे, तिच्या खालोखाल मानलेली जी फारशी भाषा तींत काय मौज आहे,याविषयीं शोध; हिंदुस्थानी, गुजराथी वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं

कितपत संबंध आहे, व्याकरणरीत्या सर्वांचा कसा कसा मेळ आहे इत्यादि विचार;—या या प्रकारें उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळींनें जर मनावर घेतलें असतें तर आजला लोकांची किती निराळी स्थिति असती! यासारखेंच देशी शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणी लक्ष दिलें असतें, व आपल्या इंग्रजी ज्ञानाचा लाभ आपल्या देशबंधूंस त्यांच्या भाषेच्या द्वारें करून दिला असता, व व्यावहारिक कृत्यांच्या संबंधानेंही त्यांस उपयुक्त माहिती करून दिली असती, तर त्यांस व सर्वांस केवढें भूषण झालें असतें!

प्रस्तुत ग्रंथकारानें इतकें अध्ययन केलें, व इतका उद्योग केला, यावरून आमच्या देशांतील बुद्धिमान् लोकांनींही सामान्यतः एक मोठी गोष्ट शिकण्यासारखी आहे. तीं ही कीं, मनुष्याची बुद्धि जात्या कितीही प्रखर असली तरी अभ्यासावांचून व उद्योगावांचून तिचें कांहीं तेज पडावयाचें नाहीं. पहा कीं, एकादी जमीन उत्तम लागवडीची जरी असली तरी तिची मालमशागत जर नीट केली नाहीं, तर तिचें स्वरूप पाहिजे तसें वठावयाचें नाहीं. मोठा उत्तम जातीचा जरी आंबा घेतला, तरी तो रुजून त्याचें झाड होऊन तें पूर्णदशेस आल्याविना त्याचा गुण प्रकट व्हावयाचा नाहीं. मोठा हापूसचा आंबा आहे, म्हणून लहानसा रोपडा असतांही त्याचीं पानें चाखलीं तर गोड लागतील काय? अथवा वाफेचें उदाहरण घ्या. हिच्या अद्भुत शक्तीचें या काळांत कोणासही वर्णन द्यावयाला पाहिजे असें नाहीं. पण तिचें सामर्थ्य प्रकट होण्यास तिची तशी योजना झाली तर उपयोग. ती न झाली तर जी हजारों खंडींचें ओझें वायुवेगेकरून एका देशांतून दुसऱ्या देशांत नेऊन टाकते, पर्वतप्राय लाटांस व वाऱ्याच्या सोसाट्यास न जुमानतां मोठमोठ्या सागरावरून अग्निनौकांस लोटीत नेते, व हजारों चाकांस एकसमयावच्छेदेंकरून गति देऊन अवघ्या राष्ट्राचें वीणकाम एखाद्या महाराक्षसीप्रमाणें एकटी पत्करते तीच एरव्ही स्वयंपाकघरांत चुलीवरील भांड्याचें झांकण नुसतें थडथडावीत बसेल इतकेंच! तर मूळची बुद्धि कितीही उत्कृष्ट असली, तरी तिचें तेज पडण्यास उद्योगाची अपेक्षा आहे, ही गोष्ट आमचे लोक अलीकडे विसरत चालले आहेत. कोणाच्या ठायीं कोणताही गुण असो, त्याची अमळ प्रशंसा झाली कीं पुरे, तेथें गर्व जडलाच. गर्व जडला कीं, उद्योगाचें मान कमी झालेंच. असें होतां होतां लवकरच

अशी स्थिति येते कीं, इसापनीतींतील ससा जसा अमळ दूर धावून लागलाच वृक्षच्छायेंत शीतळ जागीं गाढ निद्रिस्त झाला, त्याप्रमाणेंच आरंभीं मोठे चलाख दिसणारे विद्यार्थी लवकरच प्रशंसेनें विघडून जाऊन अगदीं कुच-कामाचे होऊन जातात, किंवा युनिव्हर्सिटीच्या परीक्षांपर्यंत त्यांची मजल पोंचलीच, तर नानाप्रकारचीं ढंगें व व्यसनें त्यांस जडून त्याच्या योगानें देशास भूषण व्हावयाचें तें तर एकीकडे राहून उलटा कलंक मात्र लागतो. बरें एवढी वाहवा जिकडे तिकडे होऊन यांच्या पदरीं विद्या तरी कितशी पडते म्हटलें तर ती अर्थात् थोडीच; कारण विद्यापर्वताची चढण अगोदर कठीण, मग त्यांत पायथ्यापासूनच 'ग' महाराज पाठंगळीस चिकटल्यावर मोठा खंबीर चढणारा असला तरी त्याची किती मजल होणार! तर प्रस्तुत ग्रंथकाराच्या चरित्रावरून वाचकांनीं 'ग' रोगावर महामात्रा घ्यावी. त्यांनीं असें ध्यानांत आणावें कीं, जॉन्सन्ची एवढी लोकोत्तर बुद्धि होती तरी त्याचा उद्योग राहिला नाहीं. आपण बुद्धिमान् आहों तेव्हां जडबुद्धीच्या सामान्य लोकांप्रमाणें आपणांस सतत अध्ययनाची काय गरज आहे, इतर पुस्तकांपासून व शिक्षकांपासून जें ज्ञान प्राप्त होणार तें आपल्या ठायीं जिवंत झऱ्याप्रमाणें आपोआपच प्रादुर्भूत होईल या मूर्खत्वाच्या भ्रमांत तो कधींही पडला नाहीं. तर ज्ञानप्राप्तीचा जो एकच मार्ग—कोणता ? तर अध्ययन, ( आतां हा कोणास बुद्धिमत्त्वास्तव सुगम होतो, कोणास स्वाभाविक जाड्यास्तव दुर्गम असतो इतकाच काय तो भेद )—तोच प्रस्तुत पंडितानें शेवटपर्यंत क्रमिला. हें एक झालें; दुसरी गोष्ट अशी कीं, बुद्धिमत्तेचा उपयोगही इकडे कांहीं निराळाच पहाण्यांत येतो. या गुणाबद्दल ज्याची ख्याती व्हावयाला लागते त्याला वाटूं लागतें कीं, मी कांहीं इतरासारखा नाहीं, तेव्हां माझें वर्तन अर्थातच जगा-निराळें असलें पाहिजे. ही समजूत एकदां डोक्यांत शिरली म्हणजे तिचे परिणाम कोठवर जाऊन थडकतील याचा नेम नाहीं. विक्षिप्त आचार, कुत्सित मतें, अद्वातद्वा भाषण इत्यादि विशाल बुद्धीचे तरंग जितके प्रगट होतील तितके थोडे! त्याप्रमाणें अपणांखेरीज कोणालाही मानावयाचें नाहीं, कोणाची प्रसिद्धी होऊं लागली असतां त्यास विरोध करायचा, जेथें तेथें जेव्हां तेव्हां आत्मप्रतिष्ठा गात बसावयाचें, हाही प्रकार नजरेस येतो. सारांश, ज्याप्रमाणें रूपमत्त्वाचा अभिमान स्त्रियांस कधीं कधीं कुमार्गावर घालवितो, व

संपत्तीचा गर्व सामान्यः शीलभ्रंशास कारण होतो, त्याप्रमाणेंच बुद्धिमत्व हेंही वर सांगितल्याप्रमाणें चित्तास विकार करितें. पण जॉन्सनच्या ठायीं बुद्धिवैभव एवढें अपूर्व वसत असतां त्याच्या योगानें वरील दुष्ट विकार कोणतेही उत्पन्न झाले नाहींत. त्याची उलटी अशी समजूत असे कीं, ईश्वरानें ज्याअर्थी आपल्या ठायीं बुद्धिविशेष ठेवला आहे त्याअर्थी त्याचा उपयोग पूर्णपणें करून परोपकाराकडे त्याचा जितका व्यय होईल तितका अवश्य केला पाहिजे. तो न केला तर परमेश्वराचा मी दोषी होईन. त्याप्रमाणेंच इतरांचा अवमान करणें, त्यांची प्रसिद्धि झालेली न खपणें, हेंही त्यास बिलकूल माहीत नव्हतें. उलटें त्याचें असें मात्र असे कीं, आपल्याकडून होईल तितकें साह्य करून दुसऱ्यास त्याचा प्रसिद्धीचा मार्ग सुगम करून द्यावयाचा. गोल्ड्स्मिथ् कवीस त्याचा आश्रय न मिळता तर कदाचित् शेवटपर्यंतही त्याची विशेष ख्याति न होती.

## गृहाचार

या चरित्रावरून दुसरी शिकण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे जॉन्सन्चा गृहाचार होय. गृहाचार म्हणजे घरांतील वागणूक. ही पुष्कळ वेळां मोठमोठ्या लोकांचीं सुद्धां बाह्याचरणाहून म्हणजे जगांत जी त्यांची वर्तणूक दिसते, तिजहून अत्यंत भिन्न असते. जे बाहेर बोलाचालायाला मोठे गोड, दिसायाला मोठे सभ्य, व सकृद्दर्शनी लोकहितार्थ झटणारे अशा प्रकारचे वाटत असतात तेच कधीं कधीं उंबरठ्याच्या आंत पाऊल ठेवतांच कपाळास आंठ्या पडणारे, नानाप्रकारच्या दुराचारांत निःशंक रमणारे व पहिल्या प्रतीचे आपमतलबी असे असतात. हा चमत्कारिक विरोध जगांत अनेकशः आढळत असतो. यास्तव प्रसिद्ध पुरुषांच्या लौकिकचरित्रांच्या शेवटीं त्यांच्या गृहचरित्राचा नेहमीं वृत्तांत दिलेला असतो. हा मागील चरित्रांत दाखल झालाच आहे; व त्यावरून जॉन्सन्ची घरगुती वागणूक म्हणजे आईबापांशीं, बायकोशीं, चाकरांशीं वगैरे त्याचें वर्तन कोणत्या तऱ्हेचें होतें हें वाचकांस कळलेंच आहे. आतां एतद्देशीय लोकांनीं वरील वर्तनापासून काय बोध ग्रहण करावयाचा तो सांगतों. प्रथमतः चाकर या सदरावर कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. कां कीं, सेवकपरिवार

बाळगण्याची ऐपत आमच्या लोकांत थोड्यांसच आहे, व ज्यांस आहे त्यांचें त्यांशीं वर्तनही दूषणास्पद असतें असें नाहीं. इतर प्रकारच्या बऱ्याच सुधारणा जरी आमच्या घरांतून शिरल्या आहेत, तरी चाकरांस धरून धोपटण्याची व त्यांस बूट मारण्याची तऱ्हा अद्याप कोठें दृष्टीस पडूं लागली नाहीं. यास्तव दुसऱ्या दोन गोष्टींसंबंधाचें मात्र येथें लिहितों. जॉन्सन्चें आपल्या बायकोवर केवढें प्रेम होतें हें यापूर्वीं सांगितलेंच आहे, तथापि तिचा शह आपणावर बसूं न देण्याविषयीं तो जपत असे.

यापुढचा उपदेश आईबापांशीं वागण्यासंबंधानें. हाही प्रस्तुत चरित्रा-पासून बराच घेण्यासारखा आहे. तो असा कीं, जॉन्सन् हा आपला चरितार्थ चालवून द्रव्य संपादन जरी करूं लागला, व त्याची कीर्ति तर साऱ्या विद्वन्मंडळांत जरी गाजूं लागली, तरी आपल्या वृद्ध मातेची त्यानें लव-मात्रही उपेक्षा न करतां पूर्वींप्रमाणेंच त्यांची तिचे ठायीं अतिशयित भक्ति राहिली. ही त्याची भक्ति अशीच शेवटपर्यंत होती, व शेवटपर्यंत तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे, हें मागें सांगितलेंच आहे. आतां वरील गुण आमच्या नवीन मंडळींत कितपत आढळतो हें जर पाहिलें, तर एखाद्या आणीबाणीच्या विवाहादि प्रसंगीं जरी तो पूर्ण उदयास येतो, तरी सामान्यतः पाहतां त्याचें तेज मलीनच दृष्टीस पडतें. कित्येक ठिकाणीं तर यासंबंधानें पाहतां एका महाराष्ट्र कवीचें वर्णन सर्वथा प्रत्ययास येतें. आतां या वर्तणुकीचें मुख्य बीज काय हें जर पाहिलें, तर पाश्चात्य विद्येच्या योगानें उत्पन्न झालेला मूर्खपणाचा गर्व; हें तें होय यांत संशय नाहीं. या विद्येचें फळ आजपर्यंत काय दृष्टीस पडत असे तें सर्वांस माहीत आहेच. तींत यत्किंचितही प्रवेश होतांक्षणींच आपली पूर्वपरंपरा मूर्खत्वाचें केवळ आगर होती या महा-तत्वाची तात्कालिक स्फूर्ति सर्वांच्या मनांत होत असे. मग असें असल्यावर वरील परंपरेतलीं शेवटलीं जीं मातापितरें तीं तरी वरील कोटींतून कोठून सुटणार? खरोखरच, जर ज्ञान हें थोरपणास कारण आहे, तर ग्रहणसमयीं राहूचा जप करीत बसणारा, कलकत्ता ही इंग्रजांची विलायत म्हणून समजणारा व वेरीज वजाबाकीच्या पलीकडे ज्याचें ज्ञान साऱ्या जन्मांत गेलें नाहीं, असा महामूर्ख बाप कोणीकडे; व सारें आकाश ज्यानें धुंडाळून काढिलें आहे, साऱ्या पृथ्वीचा नकाशा ज्यास मुखोद्गत आहे, व शून्यलब्धीपर्यंत मजल मारून

जो केवळ गणिताब्धि होऊन राहिला आहे असा दिग्विजयी लेक कोणीकडे ? त्याप्रमाणेंच अलीकडील महान् महान् युरोपियन राष्ट्रांनीं शोधून काढलेल्या नव्या देवाचें शुद्ध सुधारलेल्या रीतीनें नेत्रमीलनपूर्वक ध्यान करून एकदांच आठा दिवसांचें जो अघमर्षण करून टाकतो अशा पुत्रानें आपल्या वेड्या आईस दररोज देवधुपारतीची कटकट करतांना व धोंड्यादगडांच्या पायां पडतांना जर पाहिलें तर त्याच्या ठायीं तिजविषयीं अवज्ञा कशी बरें उत्पन्न होणार नाहीं ? खरें आहे. इंग्रजी पुस्तकें वाचुन जो जाडा विद्वान् झाला व मिशनरींच्या प्रसादानें ज्याच्या अंतःकरणांत सद्धर्मप्रकाश फांकला त्यास आपल्या मूर्ख व मूर्तिपूजक आईबापांची लाज कां बरें वाटणार नाहीं ?

प्रस्तुत चरित्राच्या आरंभीं जो थोडा उपोद्घात केला आहे, त्यांत असें सांगितलें आहे कीं, इंग्रज लोकांचा स्वभाव व त्यांचे आचारविचार यांविषयीं त्यापासून एतद्देशीयांस माहिती होऊन, शिवाय लोकस्थितीच्या सादृश्यामुळेंही इकडील लोकांस स्वहिताच्या बऱ्याच गोष्टी कळतील. आतां वरील दोन्ही प्रकारची माहिती काय काय होण्यासारखी आहे ती सांगतों.

## इंग्रजी राष्ट्राचे गुण जॉन्सन्च्या ठायीं प्रतिबिंबित होण्याचें कारण

जॉन्सन् यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालणार आहे. म्हणजे सामान्यतः इंग्रज लोकांचा स्वभाव जो आढळतो तो त्याचे ठायीं दिसत असे. अशा व्यक्ति प्रत्येक राष्ट्रांत असतातच; कां कीं मनुष्यास जन्मतः स्थलविशेषाचे संस्कार सहजच लागतात; आणि त्यांतून स्वदेशप्रीति बळकट असली व अन्यदेशीय संस्कार कधींच लागले नसले म्हणजे मूळप्रकृति जशीची तशीच कायम राहते. जॉन्सन्चा प्रकार असाच होता. इंग्लंडचा धर्म, इंग्लंडची राजव्यवस्था, इंग्रजी रिवाज, इंग्रजी विद्या वगैरे सर्व कांहीं अत्युत्तम असा त्याचा मूळपासून जो एकदां ग्रह होऊन गेला होता तो शेवटपर्यंत हलला नाहीं. त्यांतून लंडन शहराची तर त्यास अशी आवड असे कीं, तें सोडून इंग्लंडांतल्या इंग्लंडांतही देशावर फिरायाला जाणें सुद्धां त्यास आवडत नसे. आपल्या देशांतून बाहेर असा दोनदां मात्र तो पडला.

एकदां स्कॉटलंडास बॉसवेलबरोबर गेला तें, आणि दुसऱ्यानें पारिस शहरास थ्रेलच्या बरोबर गेला तें. यांत पहिली मुशाफरी त्याच्या स्वदेशांतीलच म्हणावयाची. दुसरी मात्र खरोखरी बाहेरची, पण तिचा जॉन्सन्नें सांगण्यासारखा कांहीं उपयोग करून घेतला नाहीं. ‘ गाडथाबरोबर नळ्याची यात्रा ’ या म्हणींप्रमाणें सरासरी प्रवास केला. आपला यजमान व यजमानीण जिकडे जिकडे गेलीं, व परिस शहरांतील पाहण्यासारखीं स्थळें जीं जीं त्यांनीं पाहिलीं, तें माल सर्व त्यानें पाहिलें. त्याच्यासारख्या विद्वानानें व शोधकानें अशा प्रसंगीं जें औत्सुक्य प्रकट करावयाचें व जी जिज्ञासा त्यास वाटावयाची तसा प्रकार त्याच्या त्या वेळच्या रोजनिशींत बिलकूल दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण जॉन्सन् तेथील लोकांशीं पुरता बोलला सुद्धां नाहीं. त्याला फ्रेंच भाषा जरी समजत होती, तरी ती बोलण्याचा सराव नसल्यामुळें एतद्देशीय लोकांस तेवढी फुशारकी वाटेल व तेवढाच वरचष्मा ते आपणावर मिरवतील, या भयास्तव वरील प्रसंगच त्यानें मुळीं टाळले. असो; मग अशा व्यक्तीचे ठायीं स्वदेशजन्य सर्व संस्कार पूर्णपणें कां प्रतिबिंबित होणार नाहींत ?

## निश्चय

आतां वरील गुण कोणकोणते ते सांगतों. एक तर निश्चय. निश्चय म्हणजे जें एकदां करीन म्हटलें तें केल्याखेरीज कधीं सोडायचें नाहीं. हा गुण प्रस्तुत चरित्रावरून व मागें सतत उद्योगाविषयीं जो मजकूर लिहिला आहे त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं किती पूर्ण होता हें तेव्हांच लक्षांत येणारें आहे. त्यांतून जॉन्सन्चा स्वभाव मूळचा आळशी व त्यांत मज्जारोगाची पीडा, शिवाय दारिद्र्य तर इतकें कीं, जेमतेम करून एक एक दिवस पार पाडायचा; पण इतकें सर्व असतां असल्या विपत्तींतही ज्यानें पंचवीस वर्षे काढलीं, व कोणापुढेंही दैन्य न दाखविनां किंवा कोणाची तावेदारी न पत्करतां केवळ स्वकष्टानें इतकीं वर्षे आपलें व आपल्या माणसांचें पोषण केलें, त्याची शर्थ कोणास वाटणार नाहीं ? पंचवीस वर्षे एकसारखी खळ न पडतां लेखणी चालवणें—मग लिहिण्यास मन लागो, प्रकृति बरोबर असो नसो, गृहसंबंधीं अडचणी असोत, दुःखें असोत, कांहीं असलें तरी लेखणीची

गति थांबतां उपयोगी नाहीं. पुनः वर्तमानपत्रांच्या सदरच्या क्षणिक महत्त्वाच्या विषयावर लिहावयाचें नसून अवघ्या शब्दसमूहाचें परिगणन करून भाषेची एकंदर व्यवस्था करावयाची, सर्वमान्य कवींच्या गुणदोषाचें विवेचन करावयाचें,—म्हणजे केवढें दुर्घट आहे हें सांगावयास नको ! तर या गुणाचें वास्तव्य इंग्रजी राष्ट्रांत कितपत असेल याची कल्पना सदरील चरित्रावरून वाचकांनीं करावी. वस्तुतः पाहतां आमच्या देशांत वरील लोकांचे प्रयत्न होऊन प्रस्तुत चरित्र एतद्देशीय भाषेंत लिहिण्याचा योग आला हेंच वरील गुणाचें थोडें प्रमाण आहे असें नाहीं. हा गुण त्यांचे ठायीं नसता तर आजपर्यंत शेंकडों बिकट प्रसंग जे त्यांच्यावर येऊन गुदरले तितक्यांतून पार पडून येथील आधिपत्य त्यांच्याकडे जातेंच ना ! या प्रमाणेंच अटलांटिक महासागरांत दूर एका कोपऱ्यांत पडून राहिलेलें जें बेट होतें—कीं जें दोन हजार वर्षांपूर्वी तर कोणास माहीतही नव्हतें, व हजार वर्षांपूर्वी ज्यास जगांत मानमान्यता नव्हती तें आज जें वैभवाच्या शिखरावर चढलें आहे व सारें जगही त्याच्या उलाढालीला पुरेसें न होऊन विद्या, कला, कौशल्य यांचें तें केवळ माहेरघर होऊन राहिलेलें आहे, हा तरी वरील अमोलिक गुणाचाच प्रभाव होय !

## अभिमान

दुसरा गुण अभिमान. अभिमान म्हणजे दुसऱ्याकडून झालेली अवज्ञा तिळमात्रही न खपून स्वतःच्या पराक्रमावरच सर्वथा अवलंबन करण्याविषयींची मनाची साहजिक वृत्ति. हा गुण वरच्याचाच अनुषंगी आहे, व वरच्याप्रमाणेंच उन्नति होण्यास अत्यंत आवश्यक होय. जॉन्सनच्या अंगीं हा कितपत वसत होता व तो कोणकोणत्या प्रसंगीं पूर्णपणें प्रकट झाला हें मागें सांगितलेंच आहे. त्यास आपले ऐन उमेदीचे दिवस दारिद्र्यांत व कष्टांत जे काढावे लागले त्याचें तरी कारण वरील मनोवृत्तीच होय. तो घरांतून बाहेर पडल्यावर प्रथमतः शालाध्यक्षांच्या हाताखालीं कांहीं दिवस राहिला होता. तेथेंच जर कुलंगी कुत्र्याप्रमाणें नेहमीं पुढें पुढें नाचून तो आपल्या धन्याची मनधरणी करता, किंवा पुढें सेक्रेटरी ऑफ स्टेट साहेबांचा वशिला लागल्यावर त्यांच्या अनुसंधानानें जर रहाता, तर मध्यान्हकाळची भ्रांत मुळीं

नाहींशी होऊन उलटा ऐषआरामांतही तो रहाता. पण जे जात्या तेजस्वी असतात त्यास मोठ्या धनिकाची किंवा मोठ्या प्रभूचीही ताबेदारी पत्करत नसते. कुत्र्यानें आपल्या सुखाचें वर्णन केलें असतां शेवटीं त्याच्या गळ्या-भोंवतालचा करकोचा पाहून लांडगा जसा दचकला, व मागल्या पायीं तडक चालता झाला, त्याप्रमाणेंच परदास्यावरच वृथा पुष्ट होऊन पडण्यापेक्षां आपलें स्वातंत्र्य राहून जाडीभरडीच मिळते आहे तर तिजवरही महात्मे पुरुष संतुष्ट रहातात. तर जॉन्सन्ची याप्रमाणेंच गोष्ट होती. तो पराकाष्टेचा निःस्पृह असल्यामुळें व जात्या धीट असल्यामुळें थोरथोरांची मनधरणी करणें त्याच्या हातून होत नसे. हें तर काय, पण प्रसंग पडल्यास कोणी केवढाही मोठा असला तरी त्याची शोभा करतांना तो मागेंपुढें पाहत नसे. शिवाय दुसरा चमत्कार असा कीं, दुसऱ्यापुढें हात पसरण्याचा जसा त्यास कंटाळा त्याप्रमाणेंच दुसऱ्यास स्वतः आश्रय देण्याविषयीं त्याची पराकाष्ठेची उत्कंठा असे. तो स्वकष्टावर मोठ्या पंचायतीनें निर्वाह करीत असतां आपल्या इष्टमित्रांचा समाचार घेण्याविषयीं नेहमीं तत्पर असे, व पुढें तर कित्येक निराश्रित मनुष्यांस त्यानें आपल्या घरीं बाळगिलें असून त्यांची साऱ्या प्रकारची वरदळही तो मोठ्या सहनशीलपणानें सोशी. असो; तर प्रस्तुत ग्रंथकारांस व त्याच्या राष्ट्रास साधारण असणारा हा दुसरा गुण होय. इंग्रज लोकांस स्वतः-विषयीं किती अभिमान आहे व स्वतंत्रतेस ते किती चहातात हें येथें विशेष फोड करून सांगायला पाहिजे असें नाहीं. इतर देशांप्रमाणेंच त्यांच्यामध्यें हरएक प्रकरणीं परस्परांत मतभेद असतां व निरंतर राज्यप्रकरणांत वगैरे निकरानें कलह चालले असतां संकटसमयीं सर्वांनीं एक होणें, व साऱ्या पृथ्वीभर उलाढाल चालली असतां स्वदेशाचें वारें न विसरणें, या दोन गोष्टींवरूनही त्यांच्या स्वाभिमानाचें स्वरूप कोणाच्याही लक्षांत येणारें आहे. शिवाय परराजाची गोष्ट तर दूरच, पण स्वराजाचाही जुलूम त्यांस सहन न होऊन त्यांनीं एकाचा शिरच्छेद केला, व एकास पळवून लाविला व राजाचे अधिकार आणतां आणतां त्यांनीं अगदीं संपुष्टांत आणून ठेवले आहेत, आणि अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्याच्या खालोखाल स्वातंत्र्याचा झेंडा त्यांच्याच देशांत मिरवत असून थोरांपासून तो लहानांपर्यंत सर्वांस हवें तसें बोलण्याचालण्याची पूर्ण मोकळीक आहे हें जगद्विश्रुतच आहे.

## सदयत्व

तिसरा गुण सदयत्व. या गुणाच्या संबंधानेंही जॉन्सन्‌विषयीं अनेक उल्लेख यापूर्वीं केले आहेत. तो बाह्यतः जरी उग्र व उद्दाम दिसे, तरी त्याचें अंतःकरण अत्यंत दयार्द्र असे. " परदुःखेन दुःखिता विरलाः " असें जें म्हटलें आहे त्या कोटींतच तो येतो. कोणीही मनुष्य असला आणि त्यानें दुःखाक्रोश केला तर तो त्यास बिलकूल सहन न होऊन तो यथाशक्ति त्याच्या संकटाचें निवारण करी. जे निराश्रित व दुबळे त्यांस त्याचें घर धर्मशाळेसारखें असे असें त्याच्या एका मित्रानें म्हटलें आहे. तो स्वतः थ्रेलच्या घरीं निरंतर पाहुण्यासारखा रहात असतां त्याच्या घरांत कोणती मंडळी भरली असे व त्याच्या पेन्शनावर कोणाचा सतत निर्वाह चालला असे हें यापूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे. स्वतः इतका आळशी कीं, बारा बारा दोन दोन वाजेपर्यंत आंथरुणांतून हलायाचा नाहीं, पण छापखाने-वाल्यानें सांगितलें पुरें, कीं जर आज मजकूर आला नाहीं तर ठसे जुळणाराची आजची मिळकत बुडून त्यास उपास काढावा लागेल, कीं, लागलीच स्वारी उठून कामाला लागे. त्याचें नांव मोठें व त्यामुळें पुष्कळ मोठमोठ्या लोकांशीं त्याचा परिचय जडला असे, यास्तव आपल्या मित्रांस किंवा त्यांच्या तर्फेनें इतर मनुष्यांस तो शेंकडों वेळां शिफारसपत्रें देई; यांपैकीं पुष्कळ बॉस-वेलच्या चरित्रांत आढळतात. असो; तर हाही गुण त्याच्या राष्ट्राच्या ठायीं नांदणाऱ्यांपैकींच होय. हें म्हणणें आमच्या विपन्न देशबंधूंस कदाचित् व्याजोक्तीचें वाटेल, किंवा येथील राजकर्त्यांची खुशामत करण्याकरितां लिहिलें आहे असें वाटेल, पण तसें बिलकूल नाहीं. सदरील राष्ट्राची आमच्या देशांत जी वर्तणूक दृष्टीस पडते तीस वरील गुणांचें नांव सर्वथा लावतां येणार नाहीं, हें खरें; पण तिचीं कारणें पाहूं गेलें असतां निराळींच सांपडतील. तीं सर्वांस सहज समजण्यासारखीं असल्यामुळें व येथें त्याचें कारण नसल्यामुळें प्रस्तुत स्थलीं देत नाहीं. इतकेंच सांगणें बस्स आहे कीं, वरील लोकांचें आचरण त्यांच्या मूळ जागीं जर पाहिलें तर त्यांच्या एकंदर राज्यरीतीवरून, त्यांचीं शेंकडों धर्मार्थ कृत्यें जीं झपाट्यानें निरंतर चालू आहेत त्यांवरून, गुलामांच्या मुक्त्यर्थ त्यांनीं कोट्यावधि रुपये खर्चले व हॉवर्ड, क्लार्कसन, फॉसेट यांच्या-

सारखे उदार पुरुष त्यांच्या देशांत निरंतर निपजत आहेत यावरून वरील उल्लेखाची सार्थकता मनुष्यांच्या नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं.

## धैर्य

चवथा गुण धैर्य. धैर्य हें दोन प्रकारचें आहे. एक मानासिक व दुसरें शारीरिक. मानसिक धैर्य म्हणजे जो एकदां संकल्प केला तो किती प्रत्यवाय आले तरी तडीस नेऊन पोंचवणें; जें आपल्या मनास प्रमाणसिद्ध सत्य वाटलें तें बेधडक बोलून दाखविणें; लोकमताचें अंधपरंपरान्यायानें अनुसरण न करतां केवळ प्रांजलपणानें व स्वतंत्र बुद्धीनें तत्त्वशोध करण्याचा यत्न करणें, इत्यादि होय. हें जॉन्सन्च्या अंगीं कितपत होतें हें यापूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. आतां दुसरें जें शारीरिक धैर्य, म्हणजे अंगधिटाईनें कोणावर चालून जाणें, प्रसंगीं न गडबडणें हें प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं होतें कीं नाहीं, याविषयीं त्याच्या चरित्रांत दाखले आहेत. त्यावरून पाहतां हाही गुण त्याच्या अंगीं पूर्ण होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो लष्करी खात्यांत कधींही शिरला नाहीं. एकदां मात्र लंडनच्या शिबंदींत कांहीं दिवस राहून निशाण मारण्याचा वगैरे त्यानें अभ्यास केला होता,—तरी खऱ्या शिपायाचे गुण जे धैर्य व प्रसंगावधान ते त्याच्या अंगीं पुरेतपणीं होते. तो अंगानें चांगला धट्टाकट्टा असून जोरदार असल्यामुळें मारामारीपर्यंत येऊन बेतली असतांही मागें घेत नसे. याविषयीं मागें एकदोन उदाहरणें दिलींच आहेत. त्याशिवाय बॉसवेल्च्या ग्रंथांत आणखी पुढील उल्लेख आहेत. एके समयीं मध्यरात्र उलटून जाऊन जॉन्सन् आपल्या नित्यक्रमाप्रमाणें जागत बसला असतां एकदम त्याच्या दारावर कोणी मोठ्यानें ठोठावलें. तें ऐकतांच शेकोटी ढवचण्याचा दांडा हातांत होता तोच घेऊन स्वारीनें दार उघडलें. पहातो तों दार ठोठावणारे चोर नसून कॉलेजांतले दोघे स्नेही होते. मग त्यांच्याबरोबरच बाहेर पडून हिंडहिंड हिंडून पुष्कळ हूडपणा करून प्रहर दिवसास बोवा बिऱ्हाडीं आले. याप्रमाणेंच बॉसवेल्बरोबर स्कॉटलंडांत जी मुशाफरी केली तींत अनेक वेळां समुद्रावर वादळ सुटून होडी डबघाईस आली होती; व इंग्लंडांत तर दोघांचीही गच्छंति झाल्याचें वर्तमानसुद्धां पत्रांतून जाहीर झालें होतें; पण असल्या प्रसंगींही जॉन्सन् बिलकूल डगमगला नाहीं. बॉसवेल्नें भय

प्रदर्शित केलें असतां त्यांस तो उलटा रागें माल भरे. त्याच्या मित्रमंडळांत बोक्लार्क म्हणून एक खानदानीचा गृहस्थ होता. तो आपल्या शेतवाडीच्या बंगल्यांत जाऊन राही, तेव्हां जॉन्सन् त्याच्या घरीं आतिथ्य अनुभविण्यास कधीं कधीं जाई. अशा वेळचें आपल्या मित्राचें आचरण बोक्लार्क मंडळींत सांगे. तें हें कीं, त्याच्या दाराशीं भले जंगी कुत्रे पाळलेले असत असे कीं, पटाईत चोरासही त्यांचा वचक वाटावा. पण जॉन्सन् त्यांस बिलकूल मोजीत नसे. एकदां तर दोघांची झोंबी लागली असतां, तो त्यांच्या अंगावर जलदीनें धांवत गेला; आणि दोघांच्या डोक्यावर दोन ठुस्से लगावून त्यानें त्यांस पळवून लावलें. शेवटच्या दुःखदायक दुखण्यांतही प्रस्तुत ग्रंथकारानें वरील धैर्यवृत्ति प्रगट केली. पोटातलें पाणी काढण्याकरितां त्यानें अनेक वेळां शस्त्रप्रयोग करून घेतले; पण तशा वेळीं खुद्द डॉक्टरही भीत पण तो स्वतः बिलकूल कचरला नाहीं. तसाच त्याचा शेवटही अगदीं स्वस्थपणानें झाला. असो; तर हा गुणही जॉन्सन्च्या राष्ट्राच्या ठायीं आढळणारा आहे. हा गुण वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारांनीं इंग्रज लोकांचे ठायीं कितपत वसत आहे याविषयीं त्यांचाच इतिहास काय पण साऱ्या जगाचा इतिहासही स्पष्टपणें सांगत आहे; असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम

स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम ही वृत्तिही जॉन्सन्चे ठायीं बळकट असून त्याच्या देशबंधूंचे ठायीं तशीच आढळणारी आहे. स्वकीयांविषयीं प्रेम म्हणजे आईबाप वगैरे वडील माणसांवर भक्ति इष्टमित्रांविषयीं स्नेह वगैरे होय; व स्वदेशप्रीति म्हणजे आपल्या राजाच्या ठायीं निष्ठा; धर्माविषयीं पूज्यबुद्धि व सामान्यतः सर्व गोष्टींविषयीं योग्य अभिमान असणें हें होय. वरील निरनिराळ्या वृत्ति जॉन्सन्चे ठिकाणीं कसकशा होत्या हें यापूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे; आतां त्याच त्याच्या राष्ट्राच्या ठायीं आहेत कीं नाहींत याविषयीं माल लिहावयाचें. प्रथमतः स्वकीयांकडे ओढा हा प्रस्तुत राष्ट्रांत कितपत असतो याविषयीं दुसरें मोठें प्रमाण नको. 'Home' 'Hearth' इत्यादि शब्दांत किती प्रेम सांठवलें आहे; व इंग्रजी कवितेंत वगैरे त्याविषयींचे उल्लेख किती सहृदयत्वाचे असतात यावरूनच

वरील गोष्टीचा निकाल होणार आहे. तसेंच कोणत्याही प्रख्यात मनुष्याचें चरित्र वाचलें असतां त्यांत वहुधा वरील प्रकारचा मजकूर सांपडेलच सांपडेल. इंग्रज हे स्वभावतःच साहसी व उद्योगी असल्यामुळें त्यांचा पुष्कळ दिवसांपासून साऱ्या पृथ्वीवर व्याप चालू आहे; कोणी चिनांत आहेत, कोणी इराणांत आहेत, कोणी तुर्कस्थानांत आहेत; पण असाही प्रकार कोठें वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येत नाहीं, कीं, कोणी बहादूर चिनांत गेल्यावरोवर चौलकर्म करून सर्वभक्षक बनले किंवा रूमशामच्या राज्यांत इमाम बनून घरीं आल्याबरोबर आईपुढें घुडके टेकून 'अल्ला विसमिल्ला अबदुल रहिमान' हा कुराणोक्त मंत्र पढायला लागले! पण आमच्या येथलि वडया वडया विद्वानांची कशी स्थिति आहे पहा! युनिव्हर्सिटीचे सोळा संस्कार पुरे झाल्यावरोबर जामानिमा करून आईबापानें एकदाचें समुद्रांत जहाज लोटावें, व सगळ्या लोकांस मोठी आशा लावावी कीं, आजपर्यंत आमचे महामूर्ख पूर्वज अटक नदी धरून बसले, पण आतां बरीक ठीक झालें. आतां हिंदुस्थानची सुधारणा झाल्याखेरीज खास रहात नाहीं, याप्रमाणें सर्वतोमुख आशीर्वाद अनुमंत्रित आर्यजननीच्या वीरांनीं आपल्या भूमीचा तीर सोडावा. पुढें कांहीं थोडा काळ जाईपर्यंत आमच्या बहादरांसही वाटावें कीं, आपणांवर सर्वांची जी येवढी भिस्त आहे त्या प्रमाणें आपणांस कांहीं केलें पाहिजे खरें. पण हे विचार सरासरी तांबडया समुद्रापर्यंत! तोंवर आईबापांचे ठिकाणीं प्रेम, लोणच्यापापडांविषयीं तिखटमीठ लावलेलीं पत्रें, व ज्या समुद्रांत आकाशांतील प्रभूनें मिसरी लोकांच्या राजास सहकुटुंब सहपरिवार बुडविलें व आपल्या लाडक्या लेकरांस तेवढी खाशी कोरडी वाट दिली त्याच्या पवित्रोदकानें नेत्रस्पर्श करून भगवद्गीतेचें पठण,--हे सर्व प्रकार एशियाखंडास सीमाभूत जो वरील पवित्र सागर त्याचें उल्लंघन होईपर्यंत. पण त्यांतून पार पडून सुधारलेल्या युरोपखंडाचें एकदां गार वारें लागलें, व तिकडील रागरंग, मजलशीचे प्रकार, वगैरे चैनीचीं पाश्चिमात्य साधनें यांत स्वाऱ्या एकदां भडकल्या म्हणजे मग हिंदुस्थान कसला व विद्याभ्यास तरी कसचा! असें करतां करतां वर्षसहा महिन्यांत विलायती संस्काराचें आमच्या पंडितमंडळींवर असें जबरदस्त पुट बसून जातें कीं, मूळचे सर्व बदलून जाऊन पक्के ते

इंग्रज बनतात ! खरेंच, जर येथल्या येथेंच इंग्रजांच्या नुसत्या भाषेच्याच अल्पमात्र ज्ञानानें आमच्या पंडितास स्वभाषा येईनाशी होते, आपले आचर सर्व वेडगळ वाटूं लागतात व पूर्वींचे सर्व लोक सरसकट महामूर्ख भासूं लागतात; तर युरोपांत जाऊन वरील लोकांचें ऐश्वर्य पाहिल्यावर व त्यांच्या देशांतल्या अनेक मौजा जातीनें अनुभविल्यावर तर काय स्थिति होऊन जाईल बरें ! उघडच आहे कीं, जो येथून आगबोटीवर पाय ठेवण्यापूर्वी नुसता अ:कश्चित् हिंदु होता, तो कांहीं काळानें इंग्रजी शिंप्याच्या हातची विजार, इंग्रजी दुकानांतून घेतलेली टोपी, इंग्रजी हवेनें वाढलेली मजेदार दाढी, अशा सुधारलेल्या जिनसा घेऊन माघारी आला व 'गाड्यावरोवर नळ्याची यात्रा' या न्यायानें ज्याच्या बरोबरचा लोणचेंपापडवाला ब्राह्मणही खासा बुटनेर बनून आला, त्यानें परत आल्यावर आपल्या आईबापांस ओळखलें व आपल्या इष्टमित्रांस क्षेमकुशल पुसलें, तर त्याची थोरवी ती काय मग राहिली ? येवढी महायात्रा केल्यानें जें पुण्य संग्रहीं पडलें त्याचा घरच्यासारख्या हलक्या लोकांशीं व्यवहार केल्यानें खाड्दिशीं क्षय होऊन जाणार नाहीं काय ? असो; तेव्हां एकंदरींत मोठी जेमतेम करून इकडून जी कांहीं मंडळी विलायतेस पाठविण्यांत आली त्यांच्या वर्तनांत व तिकडून इकडे व चोहोंकडे जॉन्सन्चे देशबंधू जे आज शेंकडों वर्षें संचार करीत आहेत त्यांच्या वर्तनांत जमीनअस्मानाची तफावत नजरेस येते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हा एक प्रकार झाला; दुसरा स्वदेशविषयक प्रीतीचा. हिचें स्वरूप वर जें सांगितलें आहे त्यावरूनही लक्षांत येईलच. शिवाय हरएक गोष्टींच्या संबंधानें इंग्रज लोकांस आपल्या देशाचा अभिमान जो वाटतो, व कोणत्याही तऱ्हेचें दूषण त्यांस बिलकूल न खपून तें ऐकतांच त्यांची तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचते, हेंही त्यांच्या स्वदेशभक्तीचेंच दर्शक होय. आतां ही भक्ति कधीं कधीं अत्युत्कट होऊन दुराग्रहापर्यंत जाऊन पोंचते व यामुळें ती प्रशंसेस पात्र न होतां उलटी गर्हणीयही होते हें खरें आहे; पण कांहींही असलें तरी आमच्या नवीन मंडळींत पूर्ण परमहंसता दृष्टीस पडते कीं, आपल्या देशाविषयीं कोणी कांहींही म्हटलें तरी पूर्ण समाधानवृत्ति प्रकट करावयाची, किंबहुना स्वतः जितकीं अप्रयोजक दूषणें त्यावर

ठेवायाला सांपडतील तितकीं अवश्य ठेवायाचीं, यापेक्षां वरील हेकट-पणाही शंभरपटीनें बरा. आतां या कलमाच्या आरंभीं इंग्रज लोकांच्या राजनिष्ठेविषयीं व धर्मनिष्ठेविषयीं जें लिहिलें आहे त्यावर मात्र अंमळ स्पष्टीकरण केलें पाहिजे. वरील उल्लेख कित्येकांस कदाचित् विलक्षण वाटेल, कां कीं, यापूर्वी अनेक वेळां खिस्ती धर्माविषयीं आम्हीं लिहिलें आहे कीं, त्याचें महात्म्य दिवसेंदिवस अगदीं कमी होत चाललें आहे, व इंग्लंडांतील राजकीय अमलाविषयीं तर नुकतेंच वर लिहिण्यांत आलें आहे कीं, तो अगदीं बेताबाताचा असून खरी सत्ता राजाच्या हातांत कांहींच उरली नाहीं. मग या दोन्ही गोष्टी जर खऱ्या आहेत तर इंग्लिश राष्ट्रांत राजनिष्ठा व धर्मनिष्ठा आहेत हें कसें, असा सहजच आक्षेप निघणार आहे. तर याचें असें आहे कीं, वरील दोन्ही उल्लेख एकंदर राष्ट्राच्या संबंधाचे आहेत; म्हणजे धर्मावर अश्रद्धा व लोकस्वतंत्रतेविषयीं प्रीति या दोन्ही वृत्ति सुशिक्षित लोकांच्या ठायीं जरी आडळतात तरी अशा लोकांखेरीज बाकीचा जो एकंदर लोकसमुदाय त्याचे ठिकाणीं स्वदेशच्या राजाच्या ठायीं प्रीति व स्वधर्मावर भाव हीं पहिल्याप्रमाणेंच कायम आहेत. आतां विद्येचा फैलाव दिवसेंदिवस होत चालल्यानें सर्वांस आपले हक्क व धर्मांतील तथ्य हीं अधिकाधिक कळूं लागलीं आहेत खरीं, तरी शुक्ल द्वितीयेस चंद्राचें बिंब जसें अंशतः मात्र प्रकाशित असून बाकीचा पुष्कळ भाग अंधःकारग्रस्त असतो त्याप्रमाणेंच प्रस्तुत राष्ट्राची स्थिति आहे. यापुढें त्याची स्थिति उत्तरोत्तर सुधारत जाऊन कालेंकरून कदाचित् पौर्णिमेचा चकचकाट होईल, पण सध्यांची अवस्था पाहिली तर सज्ञान व अज्ञान लोकांचें प्रमाण सरासरी वर सांगितल्या इतकेंच आहे.

## दोषांचा उल्लेख

येथवर जॉन्सन् व त्याचे देशबंधु यांस साधारण असणाऱ्या गुणांचा निर्देश केला. आतां गुणांप्रमाणेंच दोषांचाही उल्लेख केला पाहिजे. व्यक्ति-भूत मनुष्याचे ठायीं गुणदोष जसे साहचर्यानें नेहमीं आडळतात, किंबहुना गुणांच्या अनुषंगानें दोष व दोषांच्या अनुषंगानें गुण रहावे असाही नियम या मनुष्यलोकाचे ठायीं आडळतो, त्याप्रमाणें राष्ट्रासही हा नियम लागू

पडेल हें उघडच आहे. यास्तव यापुढें इंग्रज लोकांचे ठायीं असणाऱ्या दोषांचें जें निरूपण करावयाचें तें विषयानुरोधानें सहज प्राप्त झालें आहे हें सर्वांच्या लक्षांत येईलच.

## तुटकपणा

पूर्वी सांगितलेंच आहे कीं, निश्चय व अभिमान हे गुण प्रस्तुत ग्रंथकाराच्या ठायीं असून त्याच्या राष्ट्रांतही ते तसेच आढळतात. या गुणांचे अनुषंगी दोष म्हटले म्हणजे तुसडेपणा व तुटकपणा हे होत. निःस्पृहपणानें वागण्याची व कोणाचीही गरज न बाळगतां स्वतःच्या हिमतीवर नेहमीं राहण्याची ज्यास संवय लागून गेली असते त्याची प्रकृति सहजच तापट बनते. कोणाचेंही मिंधे राहण्याची त्यास गरज न पडल्यामुळें तो अर्थात् कोणाशींही आर्जवानें राहत नाहीं व त्यामुळें एकलकोंडेपणा व तिरसटपणा हे गुण त्यास जडतात. जॉन्सन्‌विषयीं यासंबंधाचे उल्लेख पूर्वी अनेकशः केलेच आहेत कीं, कोणी पदवीनें केवढाही थोर असला किंवा त्याचा कितीही परिचित असला तरी वेळ आली असतां त्याचा तामसपणा पूर्णपणें प्रगट होत असे; व एरवीं तो पराकाष्ठेचा सज्जन असतांही या त्याच्या प्रकृतीस्तवच लोक त्याजपासून दूर रहात. इंग्रज लोकांचाही एकंदरींत पाहतां हाच स्वभाव आहे. त्यांचा देश साऱ्या युरोपापासून विलग असल्यामुळें बेपर्वाईपणा व तुटकपणा हे गुण त्यांच्या ठायीं जसे आढळतात तसे कोणत्याही युरोपस्थ राष्ट्रांत आढळणार नाहींत. आतां हें खरें कीं, या वृत्तीच्या योगानेंही त्या देशाचें कांहीं अंशीं कल्याण झालें आहे; कांहीं असलें तरी त्या दोषरूप होत यांत संशय नाहीं.

## दुराग्रह

पण वरच्याहून एक मोठा दोष पूर्वोक्त गुणांपासून उत्पन्न होणारा आहे; तो तसाच जॉन्सन् यास व एकंदर इंग्रज लोकांस साधारणभूत आहे. हा कोणता, तर दुराग्रह होय. बॉसवेलचें समग्र चरित्र वाचलें असतां जॉन्सन्‌सारख्या थोर व पोक्त बुद्धीच्या मनुष्यांसही हरएक विषयासंबंधीं किती विलक्षण दुराग्रह जडलेले असत ते सर्व स्पष्ट दिसतात, व त्यांचा वाचकांस अतिशयित अचंबा वाटल्यावांचून रहात नाहीं. या दुराग्रहांपैकींच आपल्या देशाची सर्व प्रकारें स्तुति व परदेशांची बहुधा सर्व गोष्टींच्या संबंधानें निंदा

करण्याची चीं प्रवृत्ति वरील ग्रंथांत भरपूर दृष्टीस पडते ती होय. एशिया खंडांतील दूर व अप्रसिद्ध राष्ट्रांची गोष्ट तर दूरच, पण फ्रान्स, स्कॉटलंड सारखे जवळचे देश व ग्रीक, रोमन यांसारखीं साऱ्या अर्वाचीन सुधारणेस मूलस्तंभभूत व जगत्प्रसिद्ध राष्ट्रें हींही प्रस्तुत महापंडिताच्या तडाक्यांतून सुटलीं नाहींत. सर्वांवर पाळीपाळीनें त्याच्या वाक्शस्त्राचा तीव्र प्रहार झालेलाच आहे. ग्रीक व रोमन लोकांविषयीं जॉन्सन्नें एकदां असें मत प्रदर्शित केलें कीं, ते सामान्यतः पाहतां रानटीच असावे, कां तर त्यांच्यांत छापखाने नसल्यामुळें ज्ञानप्रसार होण्याचें साधन त्यांस मुळींच अनुकूल नव्हतें. स्कॉच व फ्रेंच यांजविषयींही तो अत्यंत तिरस्कार प्रगट करीत असे. तो म्हणे, या लोकांसारखे गलिच्छ लोक कोणतेही नसतील ? या भयंकर आरोपाचें कारण येवढेंच झालें कीं, तो पारिस शहरांत होता तेव्हां एका फ्रेंच चाकरास भुईवर थुंकून ती थुंकी बुटानें पुसून टाकतांना त्यानें पाहिलें, व तसेंच एडिन्बरो शहरांत तो एका खाणावळींत उतरला असतां त्यानें साखर मागितली, ती एका चाकरानें हातांत आणून त्याच्यापुढें केली. या पाजीपणाच्या कृत्याचा जॉन्सन्ला त्या वेळेस इतका राग आला होता कीं, त्यास उचलून थिडकींतून खालीं झुगारून द्यावा असें त्यास वाटलें ! ! फिनिशियन लोक प्राचीन काळीं मोठें नामांकित नाविक होते; व जेव्हां होकायंत्राची माहिती नव्हती, व समुद्राचे नकाशे वगैरे बिलकूल साधन नव्हतें, अशा काळींही सगळ्या भूमध्यसमुद्रभर ते हिंडत व ब्रिटनसारख्या दूरदूरच्या बेटांशींही त्यांचा व्यवहार चालत असे, यावरून तर त्यांच्या नाविकज्ञानाचें व धाडसाचें अतिशयित आश्चर्य वाटतें ! पण अशा लोकांचीही प्रशंसा जॉन्सन्च्या ज्ञानमय कर्णरंध्रास दुःसह होई. एके प्रसंगीं त्यांच्या नाविकविद्येची कोणी वाखाणणी करीत असतां त्याचा उद्गार निघाला, " काय हो ! त्यांची ती काय मोठी तारीफ करतां ! कुत्रीं नाहीं कां पोहत ! " चिनी लोक रानटी कां सुधारलेले याविषयीं एके प्रसंगीं गुरुशिष्यांचें खलबत चाललें असतां बॉस्वेल् या बिचाऱ्या प्राच्य राष्ट्राची कड घेऊन म्हणाला, " चिनी लोक ज्ञानसंपन्न आहेत. " गुरूनें लागलींच त्याच्या डोळ्यांत अंजन घालून त्याचा दृग्भ्रम दूर केला. " खरें बोवा, भांडीं करण्याची विद्या त्यांस अवगत आहे खरी ! " दुसऱ्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील प्रसिद्ध सेनापति

सर अयर कूट, ज्यानें नुकताच हैदरअल्लीचा पराभव करून मद्रास इलाखा बचावला होता, त्याच्या घरीं भोजनाचे वेळीं आरब लोकांची गोष्ट निघाली. कूटसाहेब नुकताच अरबस्थानांतून आला होता, यास्तव वाटेनें तद्देशीयांची स्थिति जी त्यास दृष्टीस पडली होती तिची तारीफ करून त्यांचें प्राच्य देश-प्रसिद्ध जें इमान व शौर्य यांचें तो वर्णन करीत होता, हें अर्थातच आमच्या पाश्चात्य पंडितशिरोमणीस न रुचून यांनीं आपल्या आवडत्या देशबंधूंचा शह बिचाऱ्या अरबांवर बिनदिक्कत ठेवून दिला !

पण हेंही सर्व जुन्या जगाविषयीं झालें. नव्या जगांत इंग्रज लोकांनींच वसवलेलें एक मोठें राज्य आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. हें राज्य जॉन्सन्‌च्या वेळेपर्यंत इंग्लंडच्या ताब्यांत होतें; पण त्याच्या हयातीच्या शेवटीं शेवटीं या वसाहतवाल्यांची व इंग्रजांची कराच्या बाबतींत कुरकुर होऊन होतां होतां युद्धप्रसंगावर येऊन बेतली, तरी वसाहतवाले न डगमगतां त्यांनीं मोठ्या शर्थेनें आपला बचाव करून इंग्लंडचा पराभव केला. ही गोष्ट जॉन्सन्‌च्या मरणाच्या आदल्या वर्षी घडून आली. तेव्हांपासून युनाय-टेड्‌ स्टेट्‌स (संयुक्त संस्थानें) या नांवाचें अमेरिकेंत नवेंच राज्य स्थापित झालें. स्वातंत्र्य व भरभराट या दोहोंच्या संबंधानें पाहतां यासारखें राज्य आज साऱ्या भूमंडलावर नाहीं अशी त्याची सर्वत्र कीर्ति आहे; व वॉशिंग्टन्‌, फ्रांक्‌लिन्‌, यांसारखे जगन्मान्य पुरुष ग्रंथकाराच्या वेळेसही स्वदेशास भूषित करीत होते. पण कांहीं नाहीं. एक राजनिष्ठेचें तत्व जॉन्सन्‌च्या हृदयांत पूर्ण बिंबून गेलें असल्यामुळें न्याय्यपक्षाविषयीं अभिमान, गुणी जनांविषयीं पूज्यबुद्धि वगैरे सर्व वृत्ति त्याचे ठायीं एका क्षणांत लीन होऊन गेल्या. त्यानें आपल्या लेखणीचेंही सामर्थ्य वरील राज्यक्रांतीच्या प्रसंगीं अन्यायाच्या तर्फे-नेंच प्रगट केलें हें मागें सांगितलेंच आहे. असो; या अमेरिकन लोकां-विषयींही जॉन्सन्‌च्या ठिकाणीं जबरदस्त दुराग्रह नांदत असे. इंग्लंडचें वर्चस्व दोहोंकडे गाजत असतां यांनीं मात्र त्याचें नाक खालीं केलें हें त्यास बिल-कूल न रुचून तो त्यांच्यावर नेहमीं दांतओठ खात असे. ‘ त्यांस जाळून पोळून टाकिलें पाहिजे ’ ‘ एका मृत्यूच्या शिक्षेखेरीज बाकी कोणतीही सजा जी आम्हीं त्यांस देऊं तिजबद्दल त्यांनीं आमचे उपकार मोजले पाहिजेत, ’ अशा तऱ्हेचीं भयंकर व क्रूरतेचीं वाक्यें त्याच्या तोंडून वरील लोकांविषयीं

नेहमीं ऐकूं येत. ‘ अमेरिकन ’ हें नुसतें नांव काढल्याबरोबर तो रागानें खवळून जाऊन वेडा होई. एके प्रसंगीं त्यानें असें बोलून दाखविलें कीं, साऱ्या जगास मी मित्रासमान लेखतों. एका अमेरिकनास मात्र नाहीं. असो; तेव्हां वरील सर्व उदाहरणांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल कीं, जॉन्सनच्या मतें प्रशंसनीय तेवढे सर्व गुण त्याच्या राष्ट्राचे ठायीं असून सारें अज्ञान, मूर्खत्व, दुष्टत्व काय तें इतर राष्ट्रांत पाहून घ्यावें.

# प्रकरण पांचवें.

## महाराष्ट्राशीं द्विविध सादृश्य

जॉन्सनच्या वेळेस इंग्लंडांतली स्थिति जी होती ती सांप्रतच्या या देशांतील स्थितीला बऱ्याच अंशीं मिळते; यास्तव दोहोंचें विवरण करून परस्पर तुलना केली असतां एतद्देशीयांस बरीच माहिती होऊन कांहीं उपयोगाच्या गोष्टीही कळणार आहेत. हें सादृश्य दोन प्रकारचें आहे; एक विद्येच्या संबंधाचें व दुसरें लोकस्थितीच्या संबंधाचें. पहिलें सादृश्य असें कीं, जॉन्सनच्या वेळीं इंग्रजी भाषेची स्थिति हल्लींच्या महाराष्ट्र भाषेप्रमाणेंच कित्येक अंशीं असून वाचकांच्या अंगींही इकडच्या इतकीच अभिज्ञता व रसिकता होती. लोकस्थिति पाहिली, तर इकडूनही सरकार व प्रजा यांची अधिकाराच्या संबंधानें परस्पर स्पर्धा लागली असल्यामुळें हल्लींचा येथील प्रकार तिकडे पुष्कळ दृष्टीस पडत होता. असो; तर आतां दोहोंचें अनुक्रमानें निरूपण करतों.

जॉन्सनचें मागील चरित्र समग्र वाचून आधुनिक महाराष्ट्र भाषेचें व तत्कालीन इंग्रजी भाषेचें बरेंच सादृश्य शोधक वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेल. अलीकडे दहा वीस वर्षांत इकडे ज्याप्रमाणें देशभाषेची सुधारणा करण्याकडे विद्वानांचें लक्ष लागलें आहे, त्याप्रमाणेंच तिकडेही जॉन्सनच्या वेळेच्या सुमारास इंग्रजी भाषेस परिपक्वता आणण्याविषयीं विद्वज्जनांचे परिश्रम चालू झाले होते. प्रथमतः जॉन्सनच्या 'कोशा'विषयीं विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, त्याच्या वेळेपर्यंत भाषेचें नियमनही झालें नव्हतें. ज्याला जसें वाटेल तसें तो लिहीत असे. लेखनपद्धति, उच्चार व शब्दप्रयोग यांविषयीं तादृश निर्बंध नव्हता. याप्रमाणेंच निबंध, कादंबरी व चरित्र यांचा प्रघातही प्रस्तुत पंडिताच्या वेळेपासूनच विशेष पडला. 'स्पेक्टेटर' व 'रांबलर' यांची लोकमान्यता पाहून त्यांच्या धाटणीवर अनेक ग्रंथकारांनीं निबंधावलि रचल्या. या जरी बहुतेक लवकरच लयास गेल्या, तरी प्रस्तुत शतकाच्या आरंभीं निबंधरचनेचा त्रैमासिक पुस्तकांच्या रूपानें जो नवा प्रकार सुरू झाला त्यास त्या कारणभूत झाल्या हें मागें एका

निबंधांत सांगितलेंच आहे. कादंबऱ्यांचा प्रचातही जॉन्सन्च्या वेळेस सुरू होऊन रिचर्डसन्, फील्डिंग, स्मॉलेट्, वगैरे नामांकित कादंबरीकार उदयास आले. जॉन्सन् व गोल्डस्मिथ् यांनींही एक एक कादंबरी रचली ती सर्व प्रसिद्धच आहे. हाही प्रकार वरील निबंधाप्रमाणेंच या शतकांत वृद्धिंगत होऊन स्कॉट, डिकन्स, लिटन् यांच्यासारखे जगत्प्रसिद्ध कादंबरीकार निपजले व आपल्या देशभाषेस आपल्या अमोलिक ग्रंथांनीं त्यांनीं भूषित केलें. तिसरा चरित्ररचनेचा प्रकार; हा तर जॉन्सन्नेंच चांगल्या उत्कर्षास आणला हे त्याच्या 'कविचरित्रा'विषयीं निरूपण करितांना सांगितलेंच आहे. याप्रमाणेंच इंग्रजी भाषेंत इतिहासग्रंथाचीही प्रवृत्ति वरील काळापासूनच पडून ह्यूम, रॉबर्टसन्, गीबन्, वगैरे ग्रंथकार प्रसिद्धीस आले.

आतां इकडे महाराष्ट्र भाषेची स्थिति पहा. या भाषेची पूर्वीची स्थिति कशी होती व अलीकडे पंचवीस तीस वर्षांत तीस कोणकोणते संस्कार घडले, याविषयीं यापूर्वी अनेक वेळां प्रसंगवशात् उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव प्रकृत स्थलीं दोन गोष्टींच्या संबंधानें मात्र लिहितों म्हणजे पुरे. भाषेचें नियमन होण्यास दोन मोठीं साधनें लागतात; एक कोश व दुसरें व्याकरण. कोशाच्या योगानें तींतील शब्दसमुदाय निश्चित होऊन तिचा लेखनप्रकार, वर्णोच्चार व व्युत्पत्ति हीं ठरून जातात. तसेंच व्याकरणानें तिचे नियम ठरून जाऊन शुद्धाशुद्धतेविषयीं निर्बंध होतो. हीं दोन्हीं साधनें मराठीस अनुकूल आहेत हें सर्वांसच माहीत आहे. कोश म्हटले म्हणजे शास्त्रीमंडळानें केलेला मराठी कोश, आणि मोल्स्वर्थ व क्यांडी यांनी रचलेले मराठी व इंग्रजी कोश, हे होत; व व्याकरण तर रा. ब. दादोबा पांडुरंग यांचें सर्वप्रसिद्धच आहे. आतां पहिला मराठी कोश सध्यां मुळींच प्रसिद्ध नसून कोठें आहे तो जुन्या पुस्तकालयांतून वगैरे लोळत पडलेला आढळतो, व त्याचा संक्षेप कांहीं वर्षांपूर्वी छापला गेला त्याचीही अवस्था मूळ कोशाप्रमाणेंच आहे; तसेंच दुसरा व तिसरा कोश हे इंग्रजी भाषेंत असल्यामुळें ती भाषा ज्यांस चांगली समजते त्यांसच त्यांचा उपयोग, व शिवाय त्यांची किंमत भारी असल्यामुळें त्यांचा सार्वजनिक प्रचार होणेंही दुरापास्त; त्याप्रमाणेंच दादोक्त व्याकरणाच्या योगानें भाषेस जरी पुष्कळ साहाय्य झालें तरी त्यांत न्यूनतेचे अनेक प्रकार आहेत, हें सर्व

खरें; तरी भाषाप्रसाधनाचीं वरील जीं दोन मुख्य साधनें तीं आमच्या भाषेचीं सिद्ध होऊन चुकलीं आहेत ही गोष्ट संतोषाची होय यांत संशय नाहीं. वरील उद्योग मागेंच होऊन गेल्यामुळें आजला भाषा इतक्या स्थितीस येऊन पोंचली ही एक नफ्याची गोष्ट झाली; व त्यांतून कोशांविषयीं पाहिलें तर ते सरकारच्याच आश्रयानें रचले जाऊन पुनः इतक्या आस्थेनें जे तयार झाले, ते लोकाश्रयानें तर होण्याचा मुळींच संभव नव्हता. तेव्हां महाराष्ट्र भाषेवर सरकारची ही एक मोठी मेहेरबानीच झालीशी समजली पाहिजे. विशेषतः मोल्स्वर्थचा कोश तर मराठी भाषेचें उत्तम ज्ञान होण्यास फारच उपयोगी आहे, व कांहीं अंशीं जॉन्सन्च्या कोशाचीही उपमा त्यांस साजेल. असो; तर कोश व व्याकरण यांची सध्यां इतपत स्थिती आहे.

## महाराष्ट्र—भाषाकोश

आतां वरील दोन साधनांच्या योगानें भाषेची अभिवृद्धि जर व्हावयाची असेल तर त्यांचा सार्वत्रिक प्रचार झाला पाहिजे हें तर उघडच आहे; हा प्रचार वर सांगितलेल्या व्याकरणाचा झालेलाच आहे, कोशाचा माल झालेला नाहीं ! यास्तव जॉन्सन्च्या कोशाप्रमाणें वरील कोशाचें जर रूपांतर झालें, म्हणजे महाराष्ट्र शब्दांची महाराष्ट्र भाषेनेंच व्याख्या होऊन तो सर्वजन-गम्य जर झाला, तर भाषा ठरीव होण्यास व धेडगुजरी प्रकार मोडून तिची सुधारणा होण्यास तो कारणभूत होईल. तर भाषेचा उत्कर्ष व देशाचें हित हीं व्हावींशीं ज्यांस वाटत असतील त्यांनीं वरील साधन लोकांस अनुकूल करून देण्याविषयीं झटलें पाहिजे. पूर्वोक्त दोन कोशांवरून पाहिलें असतां वर सांगितलेला तसा कोश तयार होणेंही मोठें कठीण आहे असें नाहीं. कारण शब्दांचें संग्रहण व त्यांचें व्याख्यान हे दोन्ही मुख्य भाग अगोदरचे सिद्धच आहेत. एक नवा जोडण्यासारखा भाग म्हटला म्हणजे अवतरणांचा मात्र होय. जॉन्सन्च्या कोशांत जशीं भरपूर अवतरणें आहेत तशीं महाराष्ट्र भाषेंतील जुन्या व सर्वमान्य ग्रंथांतून बरीच देतां येणार आहेत. आतां येवढें खरें कीं, जॉन्सन्च्या वेळेपर्यंत गद्यरचना व पद्यरचना करणारे शतावधि मोठ-मोठे ग्रंथकार होऊन गेले होते, तशी आमची मराठीची निदान अद्याप तरी स्थिति झालेली नाहीं. यास्तव त्यास आपल्या कोशांत जसें वैचित्र्य आणतां

झालें तसें इकडे आणतां येणार नाहीं. तरी सध्यां पूर्वींच्याच पद्यात्मक ग्रंथांतून मुख्यतः अवतरणें दिलीं असतां कांहीं काळानें पुढें गद्यग्रंथांतूनही तीं देऊन कोशास क्रमाक्रमानें पूर्णता आणतां येईल हें उघड आहे.

मराठी व्याकरणाविषयीं पाहिलें, तर त्याचा आज वीस पंचवीस वर्षें चांगला प्रचार पडून तें बहुधा ठरींव झाल्यासारखेंच झालें आहे. तरी अद्याप मराठीच्या मूलभाषा ज्या संस्कृत, प्राकृत, फारशी वगैरे त्यांच्याकडे एतद्देशीय पंडितांचें हवें तसें लक्ष न लागल्यामुळें त्यांच्या धोरणानें वरील विषयाचा व्हावा तसा विचार अजून झाला नाहीं. तो झाला असतां व्याकरणविषय सध्यां आहे त्याहून अधिक सुगम व चित्तवेधकही होईल असें आम्हांस खचित वाटतें.

आतां वर सांगितलेले गद्यप्रकार म्हणजे निबंध, कादंबरी, चरित्र व इतिहास हे आपल्या भाषेंत कसे सुरू झाले आहेत व त्यांची मजल कोठ-पर्यंत पोंचली आहे, यांचें विशेष विवरण म्हटलें म्हणजे निराळ्याच ठिकाणीं केलें पाहिजे. यास्तव येथें सामान्यतः इतकेंच सांगतों कीं, ज्याअर्थीं इंग्रजी भाषेंतील नमुन्यांवर वरील पध्दति सुरू झाल्या आहेत, त्याअर्थीं त्या सुधार-ण्यास मूळ नमुन्यांची उत्कृष्ट माहिती करून घेणें व त्यांवर निरंतर विचार करणें हें अवश्य होय. उत्कृष्ट चित्रकर्म किंवा मूर्तिकर्म साध्य करून घ्यावयाचें असल्यास ज्याप्रमाणें मूळ अस्सल प्रती नेहमीं पुढें धरून कलम किंवा विंधणें हें चालवावें लागतें, त्याप्रमाणेंच वरील रचनाविशेषांचीही गोष्ट आहे. ही गोष्ट इतकी उघड असतांही ती आमच्या लोकांस अद्याप चांगलीशी समजत नाहीं. याविषयींचा प्रत्यय पाहणें असल्यास अलीकडे वरचेवर निघणाऱ्या ज्या कादंबऱ्या त्यांवरून पाहावा. या कादंबऱ्यांतील बहुतेक तर अगदीं सामान्य प्रतीच्या म्हणजे थोडेबहुत शिक्षण ज्यांस प्राप्त झालें आहे न आहे अशा लोकांच्या हातूनच रचल्या जातात हें सर्वांस माहीत असण्याचा संभव नाहीं हें उघड आहे. पण हें असो; ज्यास जें साधन अनुकूल नाहीं त्याचा त्यानें उपयोग करून न घेतल्याबद्दल त्यास नांवें ठेवणें रास्त नाहीं. पण जे चांगले सुशिक्षित म्हणविणारे त्यांजकडूनही वरील साधनांचा उपयोग झालेला तितपतच पाहण्यांत येतो. असो; तर वरील पद्धति व इतर

कोणतीहि गोष्ट उत्तम स्थितीस यावी असें मनांत असेल तर ज्यांचें अनुकरण करावयाचें त्यावर निरंतर ध्यान ठेवून सतत परिश्रम चालले पाहिजेत हें एतद्देशीयांनीं पक्कें मनांत वागविलें पाहिजे.

## सादृश्यावरून घ्यावयाचा बोध

वर जें सादृश्य सुमारें शंभर वर्षांपूर्वींच्या इंग्रजी भाषेंत व हल्लींच्या मराठी भाषेंत दाखविलें त्यावरून एक मोठी गोष्ट वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. ती ही कीं, इंग्रज ग्रंथकारांच्या परिश्रमांनीं ती भाषा जर आज इतक्या नांवारूपास आली, तर आमच्या लोकांनीं जर तसाच उद्योग केला तर तितकें किंवा निदान त्याच्या खालोखाल तरी त्यांच्या श्रमास यश कां येणार नाहीं ? जॉन्सनच्या वेळीं ' रांबलर ' सारख्या पत्राच्या जर पांचशेंच प्रती काय त्या निघत असत, व काव्यें, व नाटकें, कोश वगैरे रचूनही मोठमोठ्या ग्रंथकारास सुद्धां उदरनिर्वाहाची पंचाईत पडे, तर यावरून तिकडे त्यावेळीं लोकांची अभिरुची कितपत होती हें स्पष्ट दिसत नाहीं काय? आमच्या देशांत सार्वजनिक शिक्षणाचा नुकता कोठें प्रघात सुरू झाला आहे व त्यांतून संपत्तीच्या मानानें पाहातां तर आमच्या बिचाऱ्या देशास आंग्लभूमीची पूर्वीही कधीं सर आली नाहीं. मग सध्यांच्या दुबळ्या स्थितींत तर कशाला गोष्ट बोलायला पाहिजे? पण इतकें असतांही आज जर येथील लोकांत वाचनाचा इतका प्रचार दृष्टीस पडतो, तर पुढल्या काळाविषयीं कोणाच्या मनांत उमेद येणार नाहीं ? हें एक झालें. दुसरी गोष्ट वरील सादृश्यावरून व पूर्वींच्या एकंदर चरित्रावरून एतद्देशीय ग्रंथकारांनींही घेण्यासारखी आहे कीं, ग्रंथरचनेच्या श्रमाचें साफल्य किती दीर्घ काळानें होत असतें तें त्यांनीं लक्षांत आणावें. पहा कीं, जॉन्सन्सारखा अलौकिक बुद्धीचा मनुष्य,—की, ज्याचा पाठशाळेंतील धडा ह्मणून रचलेला काव्याचा चुटका त्या वेळचा अद्वितीय कवि पोप यानें वाचून वाहवा केली. ज्याचीं स्वकपोलकल्पित पार्लमेंटांतली भाषणें वाचून एका पंडितानें तर त्यास प्रत्यक्ष डिमास्थेनीसच्याही वर जागा दिली व कोशाचें प्रचंड काम उरकल्यावर तर जो आपल्या देशभाषेचा जणूं काय अधिपतीच होऊन बसला त्यास नित्य निर्वाहाचीही पंचाईत असावी काय ? पण हेंही एक असो; आपल्या लोकांच्या समजुती-

प्रमाणें कोणाकोणास द्रव्यदृष्टी नसते, व दुसऱ्या समजुतीप्रमाणें 'नादत्तमुपतिष्ठति' (पूर्वजन्मीं न दिलेलें लाभत नाहीं) असें समजून जरी एकवार त्याच्या दारिद्र्याची उपपत्ति केली, तरी हें चमत्कारिक नव्हे काय, कीं त्याच्या प्रचंड विद्वत्तेतुल्य त्याची कोरडी मानमान्यताही होऊं नये? ही शेवटीं शेवटीं बरीच होऊं लागली, तरी जशी व्हावी तशी कधींही झाली नाहीं. एकच उदाहरण पहा; आपला यजमान व यजमानीण यांजबरोबर जॉन्सन् हा आपल्या वयाच्या सासष्ठाव्या वर्षी पारिस शहरास गेला ह्मणून पूर्वीं सांगितलेंच आहे. आतां त्याजसारखा अलौकिक पंडित कोठेंही गेला असतां 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' या न्यायानें पाहतां त्याचा वरील ठिकाणीं किती मान व्हावा! पुढें कांहीं वर्षांनीं बेंजामिन फ्रांकलिन तेथेंच आला असतां त्याचा आबालवृद्धांकडून केवढा गौरव झाला! चंद्रदर्शनाच्या दिवशीं साऱ्या लोकांची दृष्टि जशी सकौतुक व उत्कंठापूर्वक आकाशाकडे लागलेली असते, किंवा धूमकेतु उगवला असतां सारें जग जसें त्याच्याकडे सचमत्कार पाहतें त्याप्रमाणेंच उमरावांपासून तों साधारण गरीबगुरीबापर्यंत सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. असाच प्रकार त्याच्याही पुढें कित्येका वर्षांनीं सर वॉल्टर स्कॉट् हा हवा पालटण्याकरितां इटाली देशास निघाला असतां जेथें तेथें घडून आला. यावरून पाहतां वरील दोघांहूनही कित्येक अंशीं ज्याची योग्यता मोठी त्याचा वरील ठिकाणीं बिलकूल मानमरातब न होतां तो केवळ साधारण मनुष्याप्रमाणें गेला तसा माघारी आला ही मोठी आचंबा करण्यासारखी गोष्ट नव्हे काय?

तर वरील गोष्टीपासून एतद्देशीय ग्रंथकर्त्यांनीं दोन प्रकारचा बोध घ्यावा. एक द्रव्याच्या संबंधानें त्यांनीं असें मनांत आणावें कीं, जान्सन्सारख्यास गेल्या शतकांतील इंग्लंडसारख्या देशांत जर इतकी विपत्ति सतत काढावी लागली व तितकी काढावी लागली असतांही त्यानें एकदां धरलेला मार्ग अस्खलितपणें तसाच चालविला, तर आमच्या धनहीन व ज्ञानहीन देशांत ग्रंथरचनेपासून फलनिष्पत्ति कितपत होण्याचा संभव आहे हें जाणून मुख्यतः देशहितबुद्धीनेंच आपलें काम आपण बजाविलें पाहिजे. भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सेचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनेंच केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमांचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं

व अर्थरूप फलांनीं प्रगट होईलच होईल; पण त्या अदृष्ट लाभावर नजर न देतां पाहिल्यानें केवळ आपलें कर्तव्यच म्हणून त्यांनीं हातांत लेखणी धरली पाहिजे. दुसरी गोष्ट कीर्ती अथवा लोकमान्यता. हीही जॉन्सन्-सारख्यास सुद्धां किती दीर्घकाळानें प्राप्त झाली हें वर सांगितलेंच आहे. खडकाळ डोंगराची चढण जशी मोठी कठीण असते तसाच लोकप्रसिद्धीचा मार्गही परम विषम होय. तो क्रमण्यास मनुष्यानें एकदां कंबर बांधली म्हणजे मग कितीही अडथळे आले तरी त्यानें धैर्य सोडतां कामा नाहीं. हा उपदेश, जॉन्सन् प्रथमतः लंडन शहरास आपलें नशीब काढण्यास जो आला तेव्हांपासून तों शेवटपर्यंत त्याचा आयुष्यक्रम पूर्वी जो सांगण्यांत आला आहे, त्यावरून चांगला ठसण्यासारखा आहे. इतक्या काळांत त्याजवर दुःखें व अडचणी हीं तर पुष्कळ आलींच; पण कीर्तीचे विघातक जे दूषक त्यांचाही शेवटपर्यंत त्याजवर कडाका उडत होता. पण इसापनीतींतील ' **बैल व मुरकूट** ' या गोष्टीप्रमाणेंच त्याचें वर्तन नेहमीं दृष्टीस पडे. मुरकूटबोवांस बलिवर्दानें जसें उत्तर दिलें कीं, " बाबारे तूं माझ्या शिंगावर बसलास केव्हां हेंही मला समजलें नाहीं, व आपली स्वारी केव्हां उठून जाईल हेंही कळणार नाहीं, " त्याप्रमाणें जॉन्सन् एका धिमा असे. सूर्यबिंबावरून ढग जसे येतात जातात व अखेरीस आपोआप वितळूनही जातात, त्याप्रमाणेंच वरील पंडिताच्या ग्रंथावर दूषकांचे आक्षेप शतशः झाले व कालगत्या लोपूनही गेले! तर एतद्देशीय ग्रंथकारांनीही दूषकांचे आक्षेप घेण्यास वरच्याप्रमाणेंच तयार व्हावें. जो कोणी कोणत्याही संबंधानें वर डोकें काढूं जाईल त्याजवर आक्षेपांचा भडिमार व्हावयाचाच हें त्यांनीं ध्यानांत आणावें. जग हें विविध आहे, वास्तव एकच वस्तु तिघांस तीन प्रकारांनीं भासेल यांत नवल कसचें? तर हें जाणून सुज्ञ जे आहेत ते वृथा दूषकांच्या तोंडी लागत नसतात. जर कोणाचा खरा आक्षेप असेल तर तेवढा मात्र स्वीकारून वरकड कोल्हेकुईकडे ते बिलकूल लक्ष देत नाहींत. मोरोपंताची आर्या पुष्कळांस माहीत असेलच:---

हंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं ।

हा प्रकार कोणास कीर्तीचा लाभ होतांच मत्सरी जे खल त्यांच्याकडून नेहमीं व्हावयाचाच. तर ज्यास आपली योग्यता यथार्थ भासत असेल

त्यानें वरील कर्णकटु काकरवाची अगदीं पर्वा न करतां उलटें असें समजावें कीं, हा गोंगाटच आपल्या यशाचा दर्शक असून त्यास अत्यंत अनुकूलही आहे.

आतां दुसरें सादृश्य जें लोकस्थितीच्या संबंधानें त्याविषयीं विवेचन करूं. जॉन्सन्नें सध्यांचें जें इंग्लंडांतील राजघराणें त्याच्या पहिल्या तीन कारकीर्दी चांगल्या पाहिल्या. यांपैकीं पहिल्या दोहोंविषयीं त्याचें काय मत होतें तें यापूर्वी प्रसंगवशात् सांगण्यांत आलेंच आहे कीं, त्या त्यास बिलकूल पसंत नसून पहिल्या व दुसऱ्या जॉर्ज राजास तो बोलण्याच्या ओघांत बेलाशक शिव्या देत असे. त्यापुढें तिसऱ्याच्या कारकीर्दीपासून त्याच्या मनांत जो फेर झाला, आणि वर्षासन व राजदर्शन यांच्या योगानें त्याची वृत्ति जी दृढ होऊन बसली, तिचाही पूर्वी उल्लेख केलाच आहे. हें मतांतर ज्या काळीं झालें तो काळ मोठा विलक्षण आणीबाणीचा होता. राजा पराकाष्ठेचा दुराग्रही व अपक्व बुद्धीचा, प्रधानमंडळ त्याच्याच तंत्रानें चालणारें व राजकारणांत अचतुर, आणि एकंदर प्रजा तर आपले योग्य अधिकार ओळखून त्यांत केसभरही मागें घ्यावयाचें नाहीं अशा निकरास येऊन पडलेली, अशी भयंकर स्थिति त्या वेळची होती. अशांत अमेरिकेंतील वसाहतवाल्यांचा व इंग्लंडचा तंटा जुंपला. वसाहतवाल्यांचें म्हणणें इतकेंच कीं, ज्यापक्षीं आम्हीं इंग्लंडची प्रजा म्हणून आमच्यावर करांचा बोजा तुम्ही लादतां त्यापक्षीं तिकडील लोकांप्रमाणें आमच्याकडून कांहीं सभासदही पार्लमेंटांत घेत चला. हें त्यांचें म्हणणें वाजवी होतें हें कोणासही सहज कळणारें आहे; व थोरला पिट, बर्क वगैरे शहाण्या मुत्सद्यांचाही सल्ला अमेरिकन लोकांशीं तडजोड पाडून तंटा मिटवून टाकण्याविषयींचाच होता. पण त्यांचें ऐकतो कोण ? पार्लमेंटांत त्यांनीं वल्गना कर कर केल्या व शेवटीं उगीच बसले. इकडे युद्धाची कडेकोट तयारी होऊन इंग्रजी फौज आपल्या वसाहतींवर चालून जाण्यास निघाली. वसाहतवाले तरी त्याच आंग्लभूमीचे पठ्ठे ! लढाईचा थाट पाहतांच कंबर बांधली व इंग्लंडची सत्ता मुळींच झुगारून देऊन 'अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य' या नांवानें आपला स्वातंत्र्याचा झेंडा उभारला. पुढें वॉशिंग्टनानें कोणत्या चातुर्यानें व हिमतीनें लढाई शेवटास नेली, व स्वतः स्थापलेल्या नव्या संस्थानाचा पहिला अधिपति होऊन तें उच्चपद कालेंकरून सोडून दिलें, व साऱ्या जगाची वाहवा मिळविली, हें

सर्वत्र विश्रुत आहेत. असो, तर या लढाईच्या संबंधानें वर सांगितलेला जो राज्यांतील बखेडा तो फारच माजला. युद्धांत इंग्लंडची धुळधाण उडून येवढें राज्यचें राज्य हातचें गेलें; यामुळें राजा व प्रधानमंडळ यांची अतिशयित नाचक्की झाली व लोकपक्षास तेज आलें. त्यांतून विल्कीज, जूनियस यांच्यासारखे लोकपक्षाचे कैवारी यांनीं तर आपल्या लेखांनीं लोकांस आपले हक्क पुरतेपणीं भासवून देऊन आपल्या प्रतिपक्षावर सारखा धडाका चालविला होता. जॉन्सन्सारख्यांनींही राजपक्षाचें मंडन करण्याचा व वरील लेखांचें खंडन करण्याचा प्रयत्न चालविला होता.

आतां वरील स्थितीचें सादृश्य इकडे आमच्या देशांतही कसें दृष्टीस पडूं लागलें आहे हें सर्वांस माहीत आहेच. पाश्चात्य विद्येचा संस्कार इकडील लोकांस घडून तो नमुना जसा इकडे उतरत चालला आहे, त्याप्रमाणें त्याच्याबरोबर वर्तमानपत्राचा फैलाव, लौकिक प्रकरणांची चर्चा, सार्वजनिक सभा वगैरे प्रकारही सहजच सुरू झाले आहेत. वरील विद्येचें अध्ययन इकडे सर्वत्र चालू झालें आहे व आज वीस वर्षे तर युनिव्हर्सिटींतल्या मोठमोठ्या परीक्षांतून पसार झालेली मंडळी चोहोंकडे पसरली आहे, तेव्हां या कारणापासून वरील कार्य उद्भवावें हें सहजच आहे. गारगोटीवर आपण होऊन जर चकमक झाडली आणि तींतून झाडण्यासारखा बाहेर विस्तव पडला, तर त्याबद्दल कोणास आश्चर्य वाटेल काय ?

एलफिन्स्टन्, मालकम्, मनरो वगैरे राजकार्यधुरंधरांनीं येथील प्रभुत्व कोणत्या तऱ्हेनें संपादन केलें, व आपल्या राष्ट्राचा बोज जेणेंकरून राहील तशा रीतीनें एतद्देशीय लोकांशीं वर्तन ठेवून त्यांच्या ठायीं आपल्या परकी अंमलाविषयींही कोणत्या वृत्ति त्यांनीं उत्पन्न केल्या, त्याप्रमाणेंच बेंटिंक्, मेकॉले वगैरेंचे हिंदुस्थानाच्या राज्याविषयीं कोणकोणते स्तुत्य हेतु होते, हें सर्व अलीकडील मंडळीच्या कधीं स्वप्नांतही येत नसेल ! या विषयावर पूर्ण विवेचन करून या देशाची राज्यरीती सुधारण्यास काय काय गोष्टी अवश्य आहेत, सध्यांचा जो प्रकार चालू आहे त्यापासून राज्यकर्त्यांचें व प्रजेचें असें उभयपक्षींही कोणतें अहित होत आहे वगैरे दर्शविण्याचा यत्न केल्यास फारच विस्तार होणार आहे; यास्तव वरील दिग्दर्शन केलें येवढेंच बस् आहे. वरील विषय वस्तुतः वर्तमानपत्रांचा असून त्यांतून

त्यांची चळवळ निरंतर चालू असतेच. तर सरतेशेवटीं वरील सारांशावरून आमच्या देशबंधूंनीं हा बोध घ्यावा कीं, इंग्लंडांतील लोकांनीं सतत प्रयत्न करून आपले हक्क जसे वरचेवर सरकारचे कानावर घातले, त्याप्रमाणें स्वदेशाच्या उन्नत्यर्थ त्यांनींही कंबर बांधावी हें बरें. **पाश्चात्य विद्येचा परिपाक आमच्या ठायीं इतके लवकर इतका दृष्टीस पडूं लागला आहे या गोष्टीचा आमच्या राज्यकर्त्यांस आनंद व अभिमानच वाटला पाहिजे. बापाचें ओझें दोईचें खांद्यावर घेण्याचा जर पुत्रावर प्रसंग आपला किंवा शिष्य गुरूच्या योग्यतेस येण्याचा जर सुमार दिसूं लागला तर दोघांसही या गोष्टीचा खेद वाटावा का आपल्या श्रमाची फलार्थता वाटावी?** तर या न्यायानें पाहिलें असतां आमच्या देशांत वर्तमानपत्रें, सार्वजनिक सभा इत्यादि रूपांनीं जो उद्योग चालू झाला आहे त्याचें सर्वांनीं अभिनंदनच करणें योग्य आहे. आमच्या देशहितेच्छूंनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ज्या देशांत जॉन्सन्, बर्क यांच्यासारखी मंडळी निपजली, व जेथें आजही ब्राइट, फॉसेट यांच्यासारखे महात्मे पुरुष नांदत आहेत, तेथपर्यंत इकडील गाऱ्हाणीं पोंचलीं असतां केवळ अरण्यरुदित केल्याप्रमाणें होईल असें नाहीं, तर कालेंकरून तरी त्यांच्या श्रमांस यश येईलच येईल!

प्रस्तुत चरित्राचे सर्व भाग येथें संपूर्ण झाले. दोन वर्षांपूर्वी बॉसवेलकृत 'चरित्र' समग्र वाचलें असतां आम्हांस सुचलें कीं, जॉन्सन्चें चरित्र एतद्देशीय वाचकांस समग्र कथन केलें असतां पुष्कळ तऱ्हेचा फायदा होण्यासारखा आहे तो कोणकोणता हें यापूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. आतां हा आमचा मूळ संकल्प कितपत सिद्धीस गेला असेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. तरी आम्हीं केलेल्या दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांपैकीं जे कोणी इंग्रजी जाणणारे असतील त्यांस वर सांगितलेला इंग्रजी ग्रंथ वाचण्याची जर इच्छा होईल व केवळ मराठी जाणणारांस चरित्रनायकाचें व त्यांच्या राष्ट्राचें बरेंच स्वरूप ध्यानांत येऊन महत्व प्राप्त होण्यास कोणकोणते अमोलिक गुण अंगीं असावे लागतात हें जर स्पष्टपणीं दिसून येईल, तर येवढें सविस्तर चरित्र लिहिण्याच्या श्रमांचें पुष्कळ साफल्य झालें असें आम्ही समजूं.

समाप्त.

# टीपा.

पुढील टीपा वगैरे देतांना मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचे श्रम वांचविण्याचा नसून ते वाढविण्याचा आहे. आपलें ज्ञान आपण होऊन वाढविण्याची प्रबळ इच्छा त्यांस व्हावी आणि त्या इच्छेप्रमाणें त्यांनीं करें चालावें हें दाखविण्यासाठींच पुढील यत्न आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें एक छोटेखं चरित्र या पुस्तकास जोडलें आहे. तथापि त्यांचें जें सविस्तर आणि सुरस चरित्र त्यांचे बंधु रा. लक्ष्मण कृष्ण चिपळोणकर बी. ए. यांनीं १८९४ त प्रसिद्ध केलें आहे, तें सर्वांनीं अवश्य वाचावें. हें चरित्र लिहिणारे लक्ष्मणराव विष्णुशास्त्र्यांचे धाकटे बंधु आणि विष्णुशास्त्र्यांविषयीं त्यांचा भक्तिभाव फार मोठा, त्यांनीं बॉस्वेलकृत जॉन्सन्-चरित्रासारख्या इंग्रजी चरित्रग्रंथाचें अनुकरण करून निःपक्षपातपणानें विष्णुशास्त्र्यांचे गुण आणि दोष यांची माहिती दिली आहे. मधून मधून पुष्कळ मौजेच्या आख्यायिका घातल्याकारणानें हें चरित्र फार चटकदार झालें आहे.

शास्त्रीबोवांची मृत्युतिथी जाहीर रीतीनें साजरी करण्याचें पुण्यकृत्य 'सार्वजनिक-प्रवर्तक मंडळी' पुण्यांत पुष्कळ दिवस करीत आहे. या मंडळीच्या उत्तेजनामुळें लक्ष्मणरावांनीं वर उल्लेखिलेलें चरित्र लिहून तयार केलें. ही मंडळी दरसाल शास्त्रीबोवांचे पुण्यतिथीचे दिवशीं कोणा विद्वानाचें व्याख्यान करविते. या प्रसंगाचीं कांहीं व्याख्यानें फार महत्वाचीं उतरलेलीं आहेत. पैकीं कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं दिलेलें एक व्याख्यान हल्लीं निराळें छापलेलें मिळतें. त्याचप्रमाणें रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनीं आपला 'निबंधमालेचें स्वरूप व कार्य, या नांवाचा निबंध स्वतंत्रपणें छापून काढलेला आहे, तो विद्यार्थ्यांनीं अवश्य वाचावा. अलीकडे रा. ग. त्र्यं. मांडखोलकर यांनींही विष्णु कृष्ण चिपळोणकर यांचेविषयीं चिकित्सा एका स्वतंत्र पुस्तकांत केलेली आहे.

रा. पांगारकर यांचा निबंध विद्यार्थ्यांस विशेष उपयुक्त आहे. यांत निबंधमालेच्या ८४ अंकांत कोणकोणते विषय आलेले आहेत त्यांची माहिती [ प्र. पृ. ९, ] देऊन निबंधमालेंत दिसून येणाऱ्या [१] बहुश्रुतपणा [२] मार्मिकता [३] विनोद, या गुणांचें चांगलें स्पष्टीकरण [ पृ. ४९ ] केलें आहे. या गुणांचें भरीला [४] ओजस्विता किंवा जोरदारपणा [ ५ ] तळमळ [ ६ ] उत्साह [७] सहृदयता इत्यादि गुण घातले म्हणजे शास्त्रीबोवांची मूर्ति आपणांसमोर उभी राहते.

निबंधमालेंतील जॉन्सन्च्या चरित्रासंबंधानें रा. पांगारकर म्हणतातः—

" जॉन्सनचें चरित्र हा निबंध मात्र सर्वोत्कृष्ट उतरला आहे. चरित्र लिहिण्याची ही अर्वाचीन तऱ्हा आमच्या लोकांस याच निबंधानें प्रथम दाखवून दिली. जॉन्सनच्या वेळीं इंग्लंडांत जशी परिस्थिति होती तशीच आमच्याकडे प्रस्तुत काळीं आहे. तेव्हां अशा स्थितींत मराठी भाषेचा भाग्योत्कर्ष करूं पाहणाऱ्या होतकरू तरुणांस कित्ता घेण्यास योग्य अशा या थोर पुरुषाचें चरित्र शास्त्रीबोवांनीं निवडून काढलें हें योग्य केलें. जॉन्सनचें गुणदोष व त्याच्या चरित्रापासून आमच्या लोकांनीं घेण्यासारखा बोध हे भाग प्रत्येक तरुणानें अवश्य वाचावे ! ! " [ पृ. ३२ ]

रा. ल. कृ. चिपळोणकर हे शास्त्रीबोवांच्या चरित्रांत जॉन्सन्-चरित्रावर पुढीलप्रमाणें अभिप्राय लिहितातः—

" या सालाचे ( १८७७ ) निबंधमालेचे अंकांतील मुख्य विषय जॉन्सन्चें चरित्र हा होय. या विषयावर एकंदर आठ अंक (३३-३४-३५-३७-३९-४०-४१-४३ ) आहेत...या वेळेपासून विष्णुशास्त्री यांची लिहिण्याची शक्ति अधिकाधिक वाढत चालली होती. जॉन्सनचें चरित्र हा निबंध एकंदरींत अनेक कारणांनीं उत्तम साधला आहे. याची भाषा इतर निबंधांप्रमाणें साधी व मार्मिक अशी आहेच, परंतु त्यांतील विशेष हा कीं,...प्रस्तुत निबंध अगदीं शांतवृत्तीचा दिसतो...आपले कॉलेजांतून तयार आलेली विद्वान् मंडळी--ज्यांचेवर देशोन्नतीचा बोजा मुख्यत्वें करून आहे--त्यांनीं देशोन्नतीचें प्रधान अंग जें देशभाषा प्रगल्भ दशेस आणणें त्या कामीं जॉन्सन् याचें स्तुत्य उदाहरण घेऊन कसे सतत परिश्रम केले पाहिजेत याबद्दल त्यांस मोठ्या कळकळीचा व वक्तृत्वानें पूर्ण भरलेला असा

उपदेश विष्णुशास्त्री यांनी केला आहे; तो इतका उत्कृष्ट आहे कीं, प्रत्येक हितकरू विद्वान् मनुष्यानें तो आपले हृदयफलकावर लिहून ठेवण्यासारखा आहे. हा निबंध वाचीत असतां पुष्कळ ठिकाणीं चरित्रनायकाच्या जीवनवृत्तांतील गोष्टी व त्याचीं मतें सांगत असतां विष्णुशास्त्री यांची **पूर्ण तदात्मक वृत्ति** झालेली आढळते !!" उदाहरणार्थ, १. सरमास्तर यांशीं न पटल्यामुळें चाकरीला लाथ मारून जाणें, २. रिकाम्या छानछुकींत पैसा व्यर्थ न खर्चणें, ३. आईबापांपासून आलेलीं धर्ममतें स्वीकारून त्यानेंच सदाचरण, परमार्थ आणि धार्मिकता साधणें, ४. आपली ग्रंथरचना देशाच्या विपत्तिकाळांत केवळ निरपेक्ष बुद्धीनेंच केली पाहिजे, या बाबीत शास्त्रीबोवा आणि जॉन्सन् यांचें फार साम्य आढळून येतें, आणि म्हणूनच त्याचें वर्णन करितांना शास्त्रीबोवा तदाकार झालेले दिसतात. ( पृ. १६७-१७४ ].

**विष्णुशास्त्री यांची भाषापद्धति व वाङ्मयसेवा**-या विषयासंबंधानें त्यांचे चरित्रकार बंधू रा. ल. कृ. चिपळोणकर यांनीं पुढें [ पृ. २१८ ] एके ठिकाणीं जें लिहिलें आहे तें मननीय आहे. त्यांचे मतें शास्त्रीबोवांची भाषा बाळमित्रकर्त्यांचे प्रमाणें साधीं मराठी नव्हती किंवा जुन्या शास्त्र्यांचे प्रमाणें बोजड संस्कृत शब्दांनीं अथवा नव्या इंग्रजी विद्वानांचे प्रमाणें इंग्रजी वळणावर गेलेली अशीही नव्हती. तर आपल्या भाषेचें स्वरूप शुद्ध मराठी ठेवून तींत सोपें सुंदरसे संस्कृत शब्द घालून ती रमणीय करण्याचा जो धडा कृष्णशास्त्री यांनीं घालून दिला होता तोच कित्ता पुढें ठेवून विष्णुशास्त्री एक पायरी वर चढले. त्यांनीं इंग्रजी ग्रंथापासून व **विशेषतः मेकॉलेसाहेब** यापासूनच आवेशयुक्त व चटकदार वर्णन करण्याची व प्रसंगोपात निरनिराळ्या मनोवृत्ति, हास्य, विनोद, पूज्यभाव, तिरस्कार, प्रेम, व द्वेष इत्यादि हुबेहुब उठवून देऊन वाचकांची अंतःकरणें उचंबळून देण्याची हातोटी उचललेली होती व म्हणूनच विष्णुशास्त्री यांस कित्येक मार्मिक लोकांनीं※ ' सवाई शास्त्रीबोवा ' हें जें नांव दिलें तें यथार्थ आहे.

※ओक वगैरे विद्वानांनीं कृष्णशास्त्री यांस मराठी जॉन्सन् म्हटलें आहे. पण वरील न्यायानें विष्णुशास्त्री हे सवाई जॉन्सन् म्हणावे लागतील! परंतु विष्णुशास्त्री यांचें विचारक्रांतीचें कार्य आणि जॉनसनचे कार्य यांत फार अंतर आहे. यास्तव असल्या तुलना सावधगिरीनेंच कराव्या आणि मार्मिकपणानेंच समजाव्या लागतात.

"विष्णुशास्त्री यांचे ग्रंथ जे इतके लोकप्रिय झाले आहेत त्याचें मुख्य कारण त्यांची शुद्ध, चटकदार व निरनिराळे रस उभे करणारी भाषा ही होय. ज्या कित्येक लोकांना विष्णुशास्त्री यांचीं धर्म, राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था वगैरे विषयांवरील मतें* मान्य नाहींत त्यांस त्यांची निबंधमाला जी आवडते ती केवळ तींतील भाषाशुद्धता व स्वारस्य यांवरूनच. विष्णुशास्त्री यांनीं आपलें नांव बरेंच दिवस मागें राहण्याचीं जीं अनेक साधनें--निबंधमाला, न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा वगैरे--करून ठेविलीं आहेत त्या सर्वांत त्यांचें नांव अधिक काळ चालण्याला त्यांनीं मराठी भाषेंत जे नवीन भाषाप्रकार सुरू केले व जेणेंकरून ती विद्वान् लोकांचे सेवेस अधिक पात्र झाली आहे, ते अधिक कारणीभूत होतील असें आम्हांस वाटतें. जेव्हां निबंधमालेंतील भाषा-जी हल्लीं येवढी शुद्ध व सुबोध मानिली जात आहे ती-कालांतरानें ज्ञानेश्वरींतील भाषेप्रमाणें दुर्बोध अशी वाटेल. जेव्हां हल्लीं धर्म, राजकारण, समाजव्यवस्था इत्यादि विषयांवरील त्यांचीं व त्यांचे प्रतिपक्षांचीं मतें हीं दोन्हीही लोक विसरून जातील, जेव्हां निबंधमालेपेक्षां भाषा-सरणी, विचारसरणी, विषययोजना इत्यादि गोष्टींसंबंधानें अधिक सरस असे अनेक विषयांवर ग्रंथ होऊन महाराष्ट्र भाषा चांगले प्रगल्भ दशेस येईल, त्या वेळीं सुद्धां महाराष्ट्रभाषाभिज्ञ पंडित हे ज्या अल्पवयस्क विद्वानानें मराठी भाषेचा, तींतील कवितेचा, तिचे इतर शाखांचा, आस्थेनें अभ्यास करून आपले वयाचे तिशीचाळी-शींतच तींत वर सांगितलेले नवीन भाषाप्रकार सुरू करून तीस एवढें निराळें रूप आणून दिलें त्याचें नांव प्रीतीनें घेतील यांत संशय नाहीं." [पृ. ३१८-३२०]

---

*या वर्गापैकीं रा. रा. भि. जोशी हे लिहितात—विष्णुशास्त्री यांनीं मराठी लिहिण्यांत इंग्रजी भाषेची तऱ्हा उचलली आहे. त्यांची मराठी भाषा उत्तम इंग्रजीप्रमाणें स्वतंत्र, प्रौढ, झोंकदार, आवेशयुक्त व रसभरित आहे. त्यांनीं संस्कृतांतून निवडक असे प्रौढ शब्द घतले आहेत. आणि त्यांचा उपयोग करण्याची किता दाखविला आहे. त्यांतच चांगलीं अवतरणें, निर्देश आणि दृष्टांत आहेत तसेंच संस्कृतांतून आणि इंग्रजी-मधून भाषेंत शोभतील असे अनेक नवे नवे विचार आणि रचना आणल्या आहेत. त्यांचें निरूपण चित्ताकर्षक असतें, आणि एखाद्या विषयाचें प्रतिपादन करितांना तें स्वतः आणि वाचक उच्च, प्रौढ विचारांत गढून जाऊन दोघांचीहि वर्णनामध्यें एकतानता होते. यांनीं इंग्रजींतून आणि संस्कृतांतून उत्तम प्रकारचे वाङ्मय-पुष्पांचे घोंस निवडून काढून ते मराठींत गुंफून दिले आहेत. ज्यांत मतभेदाला कारण नाहीं असे त्यांचे लेख मनो-वेधक, उच्च भाषेंत असून त्यांत त्यांचें बुद्धिसर्वस्व प्रतिबिंबित झालें आहे आणि वाचक त्यांतील आशय, मतें आणि निर्णय यांचें तत्कालच ग्रहण करितो. (म. वा. चि. पृ. ५८)

—"जॉन्सन्" टीपांचें कूपन—

यापुढील टीपांचा भाग छापून होतांच सदर कूपन दाखविणाराला फुकट मिळेल.

बाँबे बुक डेपो,
मुंबई.

विश्वनाथ गणेश आणि मंडळी,
पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 3055
REFBK-0003055

हें पुस्तक वामन वासुदेव आलितकर. बी. ए.
यांनी भारतसेवक छापखाना. ३२५,
सदाशिव पेठ, पुणें, येथें छापलें.